म. ग्रं. सं. ठाणे

विषय

ग्रहालय क्रमांक

लेखक गो. रा.

सन

पुस्तकाचें नांव पाठ आणि

ना.प्र. २०८

२९७ १८६६

प्र. सं. ११६०

The Department of Public Instruction. Bombay.

PAUL AND VIRGINIA.

A TALE.

TRANSLATED INTO MARATHI

BY

GOVIND SHANKAR SHÁSTRI BÁPAT,
SANSKRIT TUTOR, AHMADNAGAR HIGH SCHOOL.

3,000 COPIES.

(Sanctioned as a Prize-Book.)

Registered for Copy-right under Government of India's Act No. XXV. of 1867.

Bombay
GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1875.

All Rights reserved.

Price 7 Annas.

BOMBAY:
PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA

मुंबई इलाक्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

पाल आणि व्हर्जिनिया

हो गोष्ट

ईंग्रजी वरून महाराष्ट्र भाषेंत

गोविन्द शङ्कर शास्त्री बापट

यांनीं लिहिली.

३००० प्रती.

(बक्षिसासाठीं मंजूर केलें असे.)

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आकटा प्रमाणें नोंदिली असे.

मुंबई.

गवर्नमेंत सेंत्रल बुक डिपो.

सन १८७५ इसवी.

(ह्या पुस्तकासंबंधी सर्व अधिकार सरकारानें स्वाधीन ठेविले आहेत.)

किंमत सात आणे.

मुंबईमध्यें
एज्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

प्रस्तावना.

पाल आणि व्हर्जिनिया ही गोष्ट मूळ फ्रेंचभाषेंत लिहिलेली आहे. तिचें भाषांतर इंग्रजी भाषेंत आहे, त्या-वरून हें मराठी पुस्तक तयार केलें आहे. ही गोष्ट दुःख-परिणामी आहे. हींत करूणरस ओतप्रोत भरलेला आहे. अशा दुःखपरिणामी गोष्टी आपल्या देशांत लिहिण्याची चाल नाहीं. संस्कृत भाषेंत करूणरसप्रधान नाटकें वगैरे आहेत. तथापि त्या सर्वांचा शेवट गोड झालेला आहे. कांहीं वर्षांमागें मराठी भाषेंत सवाईमाधवरावाचें नाटक प्रसिद्ध झालें. हें लहानसें नाटक मात्र दुःखपरिणामी आहे. प्राचीन काळच्या ग्रीक व रोमन लोकांत दुःखपरिणामी नाटकें वगैरे लिहिण्याची चाल असे. त्यावरूनच यूरो-पांतील देशांत ही चाल आली आहे. ही चाल शूर लोकां-मध्यें फार असते असें दिसतें. आपले लोक कोमल अन्तः-करणाचे असल्यामुळें त्यांनीं असले ग्रन्थ लिहिले नसावे असें कित्येक विद्वानांचें मत आहे.

या गोष्टीचें भाषांतर शब्दशः केलें नाहीं. ज्या रीतीनें लिहिलें असतां मराठी वाचकांस गोड वाटेल असें वाटलें, त्या रीतीनें लिहिलें आहे. 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' या म्हणी-प्रमाणें रुचिवैचित्र्यामुळें भाषांतराविषयीं कदाचित् भिन्न

भिन्न मतें पडतील. तथापि मूळ ग्रन्थांतील रस न जाऊं देण्याविषयीं प्रयत्न केला आहे. सफल कितपत झाला आहे याचा निर्णय करणें सुज्ञ वाचकांकडे आहे. गोष्टींतील पात्रांचीं विशेष नामें कायम ठेवून स्थलांचीं वगैरे अन्वर्थ विशेष नामें होतीं तीं मात्र भाषांतर करून लिहिलीं आहेत. आणि हीं मूळचीं नांवें टिपमध्यें सांगितलीं आहेत.

गो. शं. बा.

अहमदनगर, तारीख १० फेब्रुवारी १८७४.

पाल आणि व्हर्जिनिया.

हिंदीमहासागरांत *मॉरिशिअस ह्मणून एक बेट आहे. हें बेट पूर्वी फ्रेंच लोकांकडे होतें. तेथें फ्रान्सदेशांतील पुष्कळ लहान मोठे लोक येऊन वसाहती करीत. या बेटांत †लुइसबंदर ह्मणून एक शहर आहे. त्याजवळ एक डोंगर आहे. त्याच्या पूर्वबाजूस एक लहानसें मैदान आहे. तेथें पूर्वी कोणीं लागवड केली होती, असें दिसतें. तेथें मोडून विध्वस्त झालेल्या दोन झोंपड्या दृष्टीस पडतात. हें मैदान एका खिंडीच्या मध्यभागीं आहे. या खिंडीच्या दोन्ही बाजूंस मोठाले कडे तुटलेले असून, उत्तरेकडे मात्र बाहेर पडण्यास लहानशी वाट आहे. या मैदानाच्या डाव्या बाजूस एक डोंगर आहे, त्यास ‡प्रेक्षणोच्चस्थल असें नांव दिलेलें आहे. कारण, समुद्रांत लांब गलबत असून, त्याचें शीड क्षितिजावर आलें ह्मणजे येथून दृष्टीस पडतें. व गलबत बंदरांत येऊं लागलें ह्मणजे, इशाऱ्याकरितां येथेंच बावटा उभारतात. या डोंगराच्या पायथ्याशींच लुइसबंदर हें शहर आहे. उजव्या बाजूस एक मोठा रस्ता

* हें बेट पहिल्यानें डच लोकांस सन १५९५ यावर्षी सांपडलें. त्यावेळेस त्यांच्या देशांत मॉरिस नांवाचा राजा होता, त्याच्या नांवावरून या बेटास त्यांनीं हें नांव दिलें. हें सन १८१० या वर्षी इंग्लिशांनीं फ्रेंच लोकांपासून घेतलें. यांत सुमारें ३५०००० लोक आहेत. यांपैकीं सुमारें अर्ध्यापेक्षां अधिक हिंदुस्थानाकडून गेलेले मजूर आहेत. येथें साखर फार पिकते.

† Port Louis. ‡ Height of Discovery.

आहे, तो तहत *जंबीरबन ह्मणून एक सुंदर झाडी आहे, तेथपर्यंत जातो. या झाडीच्या मध्यभागीं मोठें विस्तीर्ण एक मैदान आहे. त्याच्या मध्यभागीं एक सुंदर, उंच ख्रिस्तीलोकांचें देवालय आहे, त्यास जंबीरबनचें देवालय असें ह्मणतात. या देवालयाच्या सभोंवतीं दुतर्फा कळकांचीं बेटें लावून, सुंदर मार्ग केलेले आहेत. तेथून कोणीकडे पाहिलें तरी, चोहोंकडे लांबचलांब बेटाच्या शेवटापर्यंत झाडीच लागलेली आहे, असें दिसतें. तेथून जवळच पुढें उपसागर दिसावयास लागतो, त्यास †थडग्याचा उपसागर असें ह्मणतात. त्याच्याच जरा उजव्या बाजूस एक भूशिर आहे त्यास ‡दुर्भाग्यभूशिर असें नांव दिलें आहे. त्याच्या पलीकडे मोठा प्रचंड लाटांनीं भरलेला समुद्र दिसतो आणि मधून मधून कोठें कोठें ओसाड बेटें दिसतात. त्यांपैकीं एकास §प्रयत्नाधार असें नांव दिलें आहे. हें पाहिलें ह्मणजे जसा काय पाण्यांत बुरूजच बांधिला आहे, असें दिसतें.

या खिंडीच्या तोंडाशीं गेलें ह्मणजे नानाप्रकारच्या चमत्कारिक वस्तु दिसूं लागतात. वाऱ्यानें डोंगरावरच्या व भोंवतालच्या अरण्यांतील झाडांचीं पानें हालून, गुणगुण शब्द ऐकूं येतो, आणि मोठमोठ्या लाटा येऊन दूरच्या खडकावर थाड्थाड् आपटतात, यांचा प्रतिध्वनि कानीं पडतो; परंतु त्या उध्वस्त झालेल्या झोपड्यांजवळ चोहोंकडे अगदीं सामसूम आहे. किल्ल्याच्या तटांसारखे उंच खडक मात्र चोहोंकडे दिसतात; बाकी दुसरें कांहीं एक दिसत नाहीं; खडकांच्या पायथ्यांशीं भेगांतन मोठमोठीं झुडपें वाढलेलीं

* Shaddock Grove.
† Bay of the Tomb.
‡ Cape of Misfortune.
§ Point of Endeavour.

आहेत, व कोठें कोठें त्यांच्या भव्य गगनचुंबित शिखरांवर सुद्धां झाडें असून, तेथें मेघ विश्रांति घेत आहेत, असें दिसतें. या उच्च शिखरांवर वृष्टि होऊं लागली ह्मणजे हिरवे व तपकिरी रंगांचे उतरते डोंगरांचे कडे इन्द्रधनुष्यांप्रमाणें चकचकूं लागतात; आणि पायथ्याशीं लहानशी नदी आहे, तिला मोठा पूर येतो. या नदीस *तालव्यजनी असें ह्मणतात.

या एकान्तस्थलीं जिकडे तिकडे पूर्ण स्तब्धता असते. जल, वायु, इत्यादि पंचमहाभूतें अगदीं शांत असतात. ताडांच्या लांबलांब सांवळ्या वाऱ्यानें हळुहळु हेलकावेत असतात, तरी वारा नसल्यामुळें त्यांपासून आवाज उत्पन्न होत नाहीं. मध्यान्हीं सूर्य आला ह्मणजे मात्र मन्द प्रकाश दरीच्या मध्यभागीं पडतो. परंतु प्रातःकाळीं सूर्योदय होऊन, भोंवतालच्या गिरिशिखरांवर किरण पडले ह्मणजे तीं नीलवर्ण आकाशांत सुवर्णाप्रमाणें चमकूं लागतात!

हा देखावा पाहण्याची मला फार आवड असे. कारण, येथें माझी, वनशोभा व एकांतवास, यांचें सुख, भोगण्याची हौस फिटे. एके दिवशीं त्या मोडक्या झोपड्यांजवळ बसून, विचारपूर्वक त्यांकडे पहात होतों. इतक्यांत एक वृद्ध मनुष्य तेथें येऊन पोहोंचला. या बेटांतील जुन्या लोकांच्या चालीप्रमाणें त्याचा पोषाक होता. तो अनवाणीच असून, त्यानें टेंकावयास हातांत एक टेंभुरणीचा सोटगा घेतला होता. त्याचे केंस पिकले होते; परंतु चेहरा भव्य व मनोवेधक होता. मीं मोठ्या सन्मानानें त्यास सलाम केला. तेव्हां त्यानेंही परतून मला सलाम केला. कांहीं वेळ लक्ष-

* River of Fan-palms.

पूर्वक मजकडे पाहून, मी वसलों होतों, त्याच उंचवस्थावर येऊन बसला. ही सलगी पाहून खालीं लिहिल्याप्रमाणें मी त्याशीं बोलूं लागलों.

"बाबा, ह्या मोडक्या झोंपड्या कोणाच्या होत्या, हें मला सांगाल काय?" तो वृद्ध बुवा ह्मणाला, "मुला, त्या मोडक्या झोंपड्या आणि ती ओसाड जमीन दोन बायांची होती. ह्या गोष्टीस वीस वर्षें झालीं. त्यांस या एकान्तस्थळीं मोठें सुख वाटत असे, त्यांचा इतिहास मोठा गहिंवर आणण्यासारखा आहे; पण, कोणा हिंदुस्थानास जाणाऱ्या यूरोपियन मनुष्यास क्षणभर थांबून, या भिकार मनुष्यांचा इतिहास ऐकण्याची गरज पडली आहे! दरिद्री आणि उपेक्षित मनुष्यास सुख होत असेल हें कोणास वाटणार आहे! बड्या लोकांचा इतिहास ऐकण्यास लोकांस मौज वाटते. परंतु, वास्तविक पाहतां त्या माहितीचा फारच थोडा उपयोग असतो" मी पुनः ह्मणालों, "बाबा, तुमच्या भाषणावरून असें वाटतें कीं, तुह्मांस मनुष्यस्वभावाची पुष्कळ माहिती आहे. मी तुह्मांपाशीं विनंती करितों कीं, तुह्मांस फुरसत असेल तर पूर्वीं या अरण्यांत रहाणाऱ्यांचा वृत्तांत मला सांगा. आणि मी तुह्मांस खचित सागतों कीं लोकस्थितीविषयी ज्यांच्या भलभलत्याच समजुती झाल्या आहेत अशा मनुष्यांस सुद्धां सद्गुण आणि साधेपणा यांचें सुख मनांत आलें ह्मणजे आनंद होतो."

तो ह्मातारा मनुष्य हातावर डोकें टेकून उगाच बसला. तेव्हां असें दिसलें कीं, तो जसा काय पूर्वीं घडलेल्या गोष्टीचें स्मरणच करीत आहे; कांहीं वेळानें तो गोष्ट सांगूं लागला.

"**मानशुअर दी लातूर**, ह्मणून एक तरूण मनुष्य **फ्रान्स** देशांतील **नार्मंडी** प्रांतांत राहत होता. त्यानें

फ्रेंच बादशाहीच्या फौजेंत चाकरी मिळावी ह्मणून पुष्कळ उद्योग केला; परंतु, सफळ झाला नाहीं. व त्याच्या कुटुंबापासूनही त्यास कांहीं आश्रय मिळेना. तेव्हां या बेटांत येऊन राहण्याचा त्यानें निश्चय केला. तो येथें सन १७२६ सांत आला. त्याच्या बरोबर त्याची तरुण स्त्री होती. या उभयतोंची परस्परांवर फार प्रीति असे. **नार्मंडी** प्रांतांतीलच एका प्राचीन श्रीमान् घराण्यांतील ही मुलगी होती. परंतु या संबंधापासून त्यास कांहीं लाभ झाला नाहीं. कारण, हा गरीब घराण्यांत जन्मलेला असल्यामुळें ह्यास मुलगी देण्याचा तिच्या वडिलांचा मानस नसतां, तिनें यास वरिलें. **मानशुअर दी लातूर** हा आपल्या बायकोस **लुइसबंदर** येथें ठेवून शेतकीच्या कामासाठीं कांहीं गुलाम खरेदी करण्याकरितां **मादागास्कर** येथ जाण्यास गलबतांत बसला. **अक्टोबर** महिन्याच्या सुमारास तेथें जाऊन उतरला. यवेळेस तेथील हवा फार वाईट असते. तेथें उतरल्यावर; तेथला भयंकर ताप लागून तो थोडेच दिवसांत मरण पावला. हा ताप तेथें वर्षांतून सहा महिने असतो, यामुळें तेथें वसाहत करण्यास यूरोपियन्न लोकांस नेहमीं मोठी पंचाईत पडते. त्याची सर्व मालमत्ता लोकांनीं चोरिली. त्याची नूतन वैधव्य प्राप्त झालेली बायको त्या वेळेस गरोदर होती; तिला या परमुलुखांत कोणाचाच आश्रय राहिला नाहीं, व जवळ कांहीं अर्थ नसून कोणाची ओळखही नव्हती. फक्त एक **हबशी** देशांतील दासी मात्र तिच्या जवळ होती. ज्या प्राण्यावर प्राणाच्या पलिकडे प्रीति करीत होता, तो तिला सोडून परलोकीं गेला; आतां तिला लोकांकडे जाऊन आश्रय मागण्याचा फार संकोच वाटे. यामुळें तिनें धैर्य धरून, आ-

पल्या दासीचे मदतीनें लहानशा जमिनीची लागवड करून, उदरनिर्वाह करण्याचा बेत केला. या बेटांत वसाहत करणाऱ्यांस जमीन पाहिजे तेथें मिळे; परंतु, सुपीक आणि व्यापारास सोईचे प्रदेश तिनें सोडून दिले. आणि या डोंगराच्या कोपऱ्यांत येऊन राहण्याचा निश्चय केला. कारण, तिला असें वाटे कीं, आपण अशा एकांत स्थलीं जाऊन, अज्ञात रहावें कीं, आपणास कोणी भेटणार नाहीं. दुःख प्राप्त झालें ह्मणजे, एकीकडे जाऊन बसावें, हा मनुष्यांचा स्वभावच आहे. याकरितां तीं एखाद्या ओसाड अरण्यांत रहावयास जातात. जसें काय त्यांस वाटतें कीं, पर्वत हा एक दुःखें टाळण्याचा किल्लाच आहे; आणि तेथील सृष्टीची शांतता पाहून आपला आत्मा शांत होईल. ईश्वर कोणाची उपेक्षा करीत नाहीं; निर्वाहाकरितां प्रार्थना केली ह्मणजे तो कांहींतरी कृपा करितोच. त्याच्याच कृपेनें **लातूरबाईला** मित्ररत्न मिळालें होतें. ही चीज ऐश्वर्यानें अथवा वडिलार्जितानें मिळावयाची नाहीं."

"ज्या जागीं राहण्यास **लातूरबाई** आली, तेथें पूर्वीच एक सुशील व ममताळू बाई राहत होती. तिला तेथें येऊन एक वर्ष झालें होतें. ती **ब्रिटनी** प्रांतांतील एका शेतकऱ्याची मुलगी होती. तिचें नांव **मार्गारेट** असें होतें. हिजवर आईबापांची फार प्रीति असे व तिनेंही त्यांच्याजवळ राहून, जन्मपर्यंत सुखानें काळ घालविला असता; परंतु एका गृहस्थानें तिला वरण्याविषयीं वचन दिलें; त्यावरून, पोरपणांतील भोळवटपणामुळें त्याच्या नादीं लागली. *कांहीं

* यूरोपखंडांत स्त्रीपुरुषें वयांत आल्यावर आपल्या देशांतील प्राचीन काळच्या गांधर्वविवाहाप्रमाणें स्वसंमतीनें विवाह करतात; यामुळें कित्येक वेळां असे प्रसंग येतात.

दिवसांनीं गरोदर राहिल्यामुळें लवकरच त्यानें तिला सोडून दिलें. बरें, प्रथम फितावून असें कर्म केलें तर, बालकाच्या निर्वाहाची तजवीज करावयाची होती. परंतु, त्या दुष्टानें तसेंही केलें नाहीं. तेव्हां मार्गारेट हिनें अपकीर्ति टाळण्याकरितां देशत्याग करून, जेथें आपला अपराध कोणास माहीत होणार नाहीं, अशा एकाद्या स्वदेशापासून दूरच्या वसाहतींत जाऊन राहण्याचा निश्चय केला. येथें आल्यावर तिनें कांहीं कर्ज काढून एक म्हातारा शिद्दी गुलाम विकत घेतला. आणि त्याच्या मदतीनें या प्रदेशांत लहानसा मळा लावून राहिली. येथेंच लातूरबाई आपल्या दासी बरोबर आली, आणि पाहते तों मार्गारेट आपल्या बालकास स्तनपान देत आहे. कांहीं अंशीं आपल्या सारख्याच दुर्दशेंत पडलेल्या मनुष्यास पाहून, जरा शांत होऊन, तिनें आपली पूर्व स्थिति आणि सांप्रतची दुर्दशा यांचा वृत्तांत थोडक्यांत सांगितला. तो ऐकून मार्गारेट हिला फारच कळवळा आला. आपल्याविषयीं तिच्या मनांत मोठेपणा रहावा, हें मनांत न आणितां, आपल्यावर तिचा विश्वास उत्पन्न व्हावा, अशा हेतूनें तिनें कांहींएक चोरून न ठेवितां आपल्या चुकीचा व त्यापासून घडलेल्या अपराधाचा वृत्तांत सांगितला. ती ह्मणाली 'मला शिक्षा झाली हें योग्यच आहे. पण, बाई त्वां सद्गुणी असून, दुःखी असावें काय?' असें बोलून मोठा सुस्कारा टाकून, ह्मणाली 'तूं या झोंपडींत स्वस्थ राहा. तूं माझी मैत्रीण आहेस.' लातूरबाई या आदरसत्कारानें सद्गदित होऊन तिला दोन्ही हातांनीं कवटाळून ह्मणाली 'खरोखर, आतां, ईश्वर माझ्या सर्व दुःखांचा अंत करणार. कारण,

त्यानें तुला आत्मापेक्षां मजवर अधिक प्रीति करण्याची बुद्धि दिली."

"मार्गारेटची माझी ओळख होती. माझें घर येथून दोन कोस लांब पलिकडच्या टेंकडीजवळ आहे, तरी मी आपणास तिचा शेजारीच मानीत होतों. यूरोपांतल्या शहरांत एक गल्ली अथवा, दोन चार घरें मध्यें असलीं म्हणजे आप्तसुद्धां परकी वाटूं लागतात. परंतु नव्या वसाहतींच्या ठिकाणीं अरण्यें, पर्वत, हीं मध्यें असलीं तरी. आह्मी एकमेकांस शेजारी समजतों. व विशेषेंकरून ही गोष्ट हिंदुस्थानाकडून इकडे लोक येत नव्हते, तेव्हां फार होती. फक्त शेजार हेंच मित्रत्व वाढण्यास कारण होत असे. आणि दुसऱ्याचा आदरसत्कार म्हणजे केवळ आपलें कर्तव्य म्हणून करावयाचा असें नसे, तर, ह्यांत मोठा आनंद वाटे. मार्गारेटला सोबत मिळाली असें ऐकतांच, तिच्या आणि तिच्या पाहुण्याच्या उपयोगीं पडावें, म्हणून मी त्वरेनें तेथें गेलों."

"फार रूपवान मनुष्य पाहिलें म्हणजे आपणांस आनंद होतो; आणि त्यासच जर खिन्नवदन पाहिलें, तर, अधिक कळवळा उत्पन्न होतो. अशीच गोष्ट लातूरबाईची होती. तिचा बांधा मनोवेधक होता. तिचा चेहरा अगदीं खिन्न होता; तथापि त्यावरून तिचा थोरपणा स्पष्ट दिसत होता. तिचा प्रसूतिकाळ अगदीं जवळ आला होता. त्यांच्या मुलांच्या भावी हिताकरितां मीं त्यांस असें सांगितलें कीं, या एकीकडच्या दरींत सुमारें वीस एकर जमीन आहे, ती तुह्मी उभयतां वांटून घ्या. नाहीं तर दुसरा एकादा वसाहत करणारा ती बळकावून बसेल. त्यांनी तें काम मजवरच सों-

पिलें. मीं या जमिनीचे दोन भाग सारखे करून दिले. एक भाग या दरीच्या वरच्या बाजूकडे होता; याची हद्द जेथें **तालव्यजनी** नदीचा उगम आहे, [illegible] अभ्रचुंबित खडकाच्या टोंकापासून तों पर्वताच्या माथ्याशीं तुटलेला कडा आहे, त्यापावेतों होती. या कड्यास ***तोफेचें तोंड** असें ह्मणतात. कारण, त्यासारखा त्याचा आकार आहे. दरीच्या त्या जंगली प्रदेशांत वाट सुद्धां सांपडत नाहीं; पाण्याच्या लोंढ्यांनीं मोठमोठ्या धोंडी जिकडे तिकडे पडल्या आहेत, आणि त्यांमधून पुष्कळ ओढे वाहत आहेत; व मोठमोठे वृक्ष वाढून किर्र झाडी झाली आहे. दुसऱ्या भागाची हद्द **तालव्यजनी** नदीच्या कांठानें लागत येऊन, आपण बसलों आहों येथपर्यंत होती. येथून ही नदी वाहत जाऊन, या दोन टेंकडांचे मधून जाऊन पलीकडच्या समुद्रास मिळते. येथें पहिल्यानें कुरण होतें. हें तुमच्या ध्यानांत आलेंच असेल. हा भाग फार खडबडीत नाहीं; तथापि सुपीक नाहीं. कारण, पावसाळ्यांत येथें दलदल होऊन जाते; आणि उन्हाळ्यांत जमीन इतकी टणक होते कीं, कुदळीनें सुद्धां फुटावयाची नाहीं. याप्रमाणें जमिनीचे भाग केले. आणि त्यांस पाहिजे तो पसंत करण्यास सांगितलें. वरच्या बाजूचा भाग **लातूर**बाईनें घेतला. आणि इकडचा भाग **मार्गारेट**नें पसंत केला. दोघीही आपल्या इच्छेप्रमाणें झाल्यामुळें खुष झाल्या. त्यांनीं मला विनंति करून सांगितलें कीं, दोघींच्या झोंपड्यांची जागा अगदीं जवळ जवळ असावी, ह्मणजे नेहमीं परस्परांस ममतेनें बोलतां चालतां व हितगुजाच्या गोष्टी सांगतां येतील. **मार्गारेट**ची

* Cannon's mouth.

झोपडी दरीच्या मध्यभागीं तिच्या मळ्याच्या हद्दीवरच होती. तिच्याजवळ लातूरबाईकरितां मीं दुसरी झोपडी बांधिली. याप्रमाणें दोघींलाही आपापल्या जमिनींत राहून परस्पर शेजाराचें सुख मिळे. मीं स्वतः डोंगरांतून दगड आणून भोंवतालीं गडगे घातले, आणि समुद्रकिनाऱ्यावरून ताडांच्या सांवळ्या आणून झोपड्या बांधिल्या. आतां तुह्मांस यांचे दरवाजे वगैरे कोणीकडे होते हें कांहीं उमगणार नाहीं. हाय हाय! मला त्यांच्या पुष्कळ गोष्टींचें स्मरण होत आहे. कालचक्रांत मोठमोठ्या राज्यांचा चुराडा होऊन विस्मरण होतें; परंतु या ओसाडींतील मित्रत्वाचें अद्यापि, मला विस्मरण होत नाहीं. आणि असें वाटतें कीं, जीव जाईपर्यंत मला हें स्मरण दुःख देणार."

"झोपडी बांधून थोडे दिवस झाले नाहींत तोंच **लातूरबाई** प्रसूत झाली. तिला मुलगी झाली. **मार्गारेट** हिला मुलगा होता; त्याचा * बाप्तिस्मा वगैरे मींच केला होता. त्याचें नांव **पाल** ठेविलें होतें. मला आणि आपल्या मैत्रिणीला, मुलीचा संस्कार करण्यास **लातूरबाईनें** सांगितलें. तिचें नांव **व्हर्जिनिया** असें ठेविलें. **मार्गारेट** ह्मणाली, ती सदाचरणी आणि सुखी होईल. सदाचरणाचा मार्ग सोडल्यामुळेंच मला दुःख प्राप्त झालें."

"**लातूरबाई** बाळंतपणांतून उठण्यापूर्वींच मळ्यांत कांहीं कांहीं पदार्थ उत्पन्न होऊं लागले होते. मीही कधीं कधीं त्यांचे मळे सुधारण्याकरितां श्रम करीत असें. पण मुख्यत्वेंकरून त्यांच्या दोन गुलामांच्या सतत श्रमामुळें त्यांत लौकरच पीक होऊं लागलें. **मार्गारेटचा** गुलाम **डोमिंगो**

---

* ख्रिस्तिधर्मांत घेण्याचा संस्कार.

हा म्हातारा होता; तरी भला धट्टाकट्टा आणि जोरदार असे. तो थोडें शिकलेला असून स्वभावतः चतुर होता. दोघीं-च्याही वांट्यांत जेथें सुपीक जमीन असेल तेथें तो लागवड करीत असे. आणि जेथें जें धान्य चांगलें होईल असें वाटे तेथें तें पेरीत असे; जेथें जमीन सुमाराची असे, तेथें तो मका पेरी; ज़रा सुपीक असे तेथें गहूं लावी: आणि पाण-थळ असे, तेथें भात लावी. खडकाच्या पायथ्याशीं तो भोंप-ळ्याचीं व कांकडीचीं अळीं घाली; त्यांचे विस्तीर्ण वेल वर जाऊन, खडकास आच्छादून टाकीत. सुखट जमीन असे तेथें तो बटाटे लावी. उंचवट्यांवरून कापशीचीं झाडें लावी; आणि चिकणमाती असे तेथें ऊंस लावी. टेंकड्यांवरून तो कांहीं बुंदाचीं झाडें लावी. त्यांपासून फार चांगली काफी पिके. झोंपडीच्या भोंवतालीं आणि नदीच्या कांठीं केळी लाविल्या होत्या. त्यांस मोठमोठ्या डांगा येत, आणि बारा महिने नेहमीं केळवंडी पिकत. त्यानें एका बाजूला आप-ल्याकरितां तंबाकूचीं झाडें लाविलीं होतीं. तो केव्हां केव्हां रानांत सर्पण आणण्या करितां जाई; व कधीं कधीं मधून मधून खडक असत ते फोडून टाकून जागा साफ करी. **मार्गारेट**वर ह्याची फार भक्ति होती. व तशीच **लातूर**-बाईवरही होती. कारण, **व्हर्जिनिया** जन्मली तेव्हां तिची दासी **मेरी** हिच्याशीं यानें लग्न लाविलें होतें. तो बाय-कोविषयीं फार आथक होता. **मेरी, मादागास्कर** येथें जन्मली होती. ती लहानसान वस्तु करण्यामध्यें कुशल असे. तिला टोपली आणि गवताच्या हंतऱ्या विणतां येत. ती चपल व स्वच्छ असून विश्वासू होती. स्वयंपाक कर-ण्यांचें व कोंबडीं वगैरे पाळण्याचें काम तिजकडे होतें.

व कधीं कधीं कांहीं थोड्या निर्वाहापेक्षां जास्त वस्तु झाल्या असतां त्या विकण्यास तिला लुइसबन्दर एथें जावें लागे. वर सांगितलेल्या माणसांशिवाय आणखी म्हटलें तर तेथें दोन बकरीं मात्र होतीं. तीं मुलांचीं खेळगडी असत. शिवाय एक कुत्रा होता तो रात्रीस पाहारा करी. यावरून त्या दोन ठिकाणांच्या उत्पन्नाची, व तेथें राहिलेल्या कुटुंबांची, पूर्ण माहिती तुह्मांस होईल."

"लाटूरबाई आणि तिची मैत्रीण या दोघी सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्या निर्वाहाकरितां कापूस पिंजून, त्याचें सूत काढीत. ज्या वस्तु त्यांस तेथें उत्पन्न करितां येईनात त्यांपैकीं त्यांस कांहीं मिळत नसे. ह्यामुळें त्यांस नेहमी अनवाणीच फिरावें लागे. रविवारीं प्रार्थनेस जाण्याच्या वेळेस मात्र पायांत जोडे घालीत. रविवारीं फार लोकर त्या जंबीरबनच्या देवळांत प्रार्थनेस जात. तें पलीकडे जंबीरबनचें देऊळ तुह्मांस दिसतच असेल. तें लुईसबंदरापेक्षां फार लांब आहे; तरी त्या शहरांत कधीं गेल्या नाहींत; कारण, त्यांच्या आंगावर बंगाली गोणपाटाचे कपडे असत; त्यामुळें त्यांस वाटे कीं, शहरांत आपला कोणी अपमान करील. कारण, बहुतकरून असले कपडे गुलामांच्या आंगावर असतात. परंतु ऐश्वर्याच्या बाह्य डामडौलाची व कुटुंबांतील सुखाची कशानें बरोबरी होणार आहे?"

"जगांत दुसऱ्या ठिकाणीं त्यांस सुखप्राप्ति झाली नाहीं, यामुळें त्यांची आपल्या झोपड्यांवर, अधिकच प्रीति असे. डोंगरावरून मरी आणि डॉमिंगो यांनीं आपल्या धनिणीस जंबीरबनाकडून परत येतांना पाहिलें ह्मणजे, लागलींच तीं दोघें त्यांस चढणीच्या ठिकाणीं हात देण्याकरितां खालीं

धांवत येत; व त्यांस पाहिलें ह्मणजे दोघांस मोठा आनंद होई. परत आल्यावर घरांत पाहिलें ह्मणजे जिकडे तिकडे नीट वेतवांत व व्यवस्था केलेली असे, यामुळें श्रमपरिहार होऊन असें वाटे कीं, आपले चाकर ममतेनें आपली सेवा करितात. दोघींची एकसारखी स्थिति असल्यामुळें, नेहमी वहिणींसारख्या वागून ताई ताई ह्मणून त्या एकमेकींशीं ममतेनें बोलत असत. त्यांचे मनोरथ, हित अनहित, सर्व सारखें होतें. त्या जेवणखाण एक ठिकाणीं करीत. सर्व संसार त्यांनीं एकत्रच केला होता. एकाद्या वेळेस कोणतेंही ऐहिक सुख मनांत येऊन दुःख होऊं लागलें म्हणजे कांहीं दाह्य वस्तु नाहींसें झालें असतां अग्निज्वाळा जशी गगनांत निघून जाते, त्याप्रमाणें सद्वर्त्तन, धर्माचरण हीं मनांत आणून त्या परलोकाकडे लक्ष देत."

"मार्गारेटवर सर्व संसाराचें काम टाकून लातूरबाई कधीं कधीं एकटीच फिरावयास जाई. आणि ह्या भव्य वनांतील देखाव्यामध्यें शोक करीत बसे. दुःखाचा पहिला प्रचंड उद्वेग निघून गेल्यावर अशा खिन्नतेपासून, मनुष्याच्या अंतःकरणास कांहींएक प्रकारचें समाधान वाटतें."

"मुलांवर त्या उभयतां आयांची फार प्रीति असे. दोन्हीही हतभाग्य समागमापासून उत्पन्न झालीं होतीं; त्यामुळें त्यांस पाहिलें ह्मणजे दोघींचें मित्रत्व अधिक दृढ होई. त्या मुलांचें लालनपालन करणें हें त्यांचें कर्तव्य होतें, तथापि त्यापासून त्यांस मोठें सुख होई. त्या आनंदानें दोघांसही एका न्हाणीमध्यें न्हाऊं घालीत; आणि एकाच पाळण्यामध्यें निजवीत, आणि जसें काय त्या उभयतांमध्यें पूर्ण बंधुत्वप्रीति उत्पन्न करावी ह्मणूनच परस्परांच्या बालकांस स्तनपान देत.

ल्ला तूरबाई ह्मणे, 'सखे, आपणा प्रत्येकीला दोन दोन मुलें आहेत; आणि प्रत्येक मुलास दोन आया झाल्या.' जसें पादळानें सर्व खांद्या मोडून गेल्यावर एकाच जातीच्या दोन झाडांच्या दोन खांद्यांवर दोन कळ्या राहतात. व त्या दोन्ही खांद्या मूळच्या झाडांपासून काढून दुसऱ्या झाडावर कलम केलें असतां फार उत्तम, मधुर, सुवासिक, फूल उत्पन्न होतें; त्याप्रमाणें कोणी आप्त न मिळाल्यामुळें, व एकमेकांच्या जननीचें स्तनपान केल्यामुळें मुलगामुलगी, बहीण-भाऊ, यांपेक्षां फार ममतेचा संबंध त्या बालकांमध्यें उत्पन्न झाला. तीं पाळण्यांत बसून खेळत, तेव्हांच त्यांच्या आया लग्नाचा बेत करूं लागत. विवाहसुखाच्या गोष्टी सांगून एकमेकींचें सांत्वन करीत असत. परंतु त्यामुळें वारंवार गहिंवर येऊन त्यांस रडूं येई. लग्न न झाल्यामुळें एकीचें दुर्दैव उद्भवलें. आणि दुसरीचें लग्न केल्यामुळें उद्भवलें, एक आपले योग्यतेपेक्षां मोठ्याचे नादीं लागून फसली; दुसरीची आपल्यापेक्षां कमी योग्यतेच्या मनुष्याशीं संबंध केल्यामुळें दुर्दशा झाली होती. परंतु त्यांस वाटे कीं, आपलीं मुलें या दुष्ट सुखनाशक लहानमोठेपणाच्या व्यर्थ गर्व वाहणाऱ्या अभिमानी यूरोपखंडापासून लांब आहेत; यामुळें परस्परांस सारखीं मानून अधिक सुखी होतील."

"त्या उभयतां बालकांची एकमेकांवर फार प्रीति जडली. **पाल** रडूं लागला म्हणजे, त्याच्या आईनें **व्हर्जिनिया** कडे बोट दाखवावें; ह्मणजे तो शांत होऊन लागलाच हंसूं लागे. **व्हर्जिनिया** हिला कांहीं झालें ह्मणजे, आयांस कळविण्या करितां **पाल** लागलाच रडून आकान्त करी. असें झालें ह्मणजे, **पाल** यास दुःख होतें, ह्मणून **व्हर्जिनिया** आपलें

रडेणें दाबून धरी. मी येथें येई, त्या वेळेस तीं येथल्या चालीप्रमाणें उघडींवाघडीं रांगत असत. कधीं कधीं तीं एकमेकांचे हात धरून डुलत डुलत चालत असत; तेव्हां तर तीं अश्विनी नक्षत्राच्या ताऱ्यांप्रमाणें दिसत. रात्रीस देखील ऐकमेकांपासून दूर होणें त्या बालकांस आवडत नसे. बहुतकरून तीं एकाच पाळण्यांत, गालाशीं गाल, उराशीं ऊर लावून, व एकमेकांवर हात टाकून निजत असत."

"तीं बोलूं लागलीं तेव्हां पहिल्यानें एकमेकांस 'भाऊ आणि ताई' हे बाळपणचे मधुर शब्द बोलण्यास शिकलीं. त्यांना थोडेंसें शिक्षण प्राप्त झालें; तेव्हां तर त्यांचें मित्रत्व फारच वाढलें. कारण, परस्परांच्या इच्छा जाणून तीं पूर्ण करूं लागलीं. न्याहारीचे वगैरे सर्व पदार्थ **व्हर्जिनिया**च तयार करी. ती गृहकृत्यांत कुशल होत चालली. तिनें श्रम करून कांहीं पदार्थ केला, आणि तो भावानें वाखाणिला ह्मणजे तिला आपल्या श्रमाचा परिहार झाला असें वाटे. **पाल** मोठा चपळ असे, तो नेहमीं बागेंत **डोमिंगो** बरोबर खणीत असे; व कधीं कधीं लहानशी कुऱ्हाड घेऊन रानांत जाई. आणि तेथें एखादें छानदार फूल, फळ, वगैरे झाडावर उंच ठिकाणीं दृष्टीस पडलें, तरी लागलाचें वर चढून, तें काढून, आपल्या बहिणीकरितां घरीं घेऊन येई."

"त्यांतील एक मूल कोणाच्या दृष्टीस पडलें, तर त्यानें लागलेंच समजावें कीं, दुसरें फार दूर नसेल. एके दिवशीं मी त्या डोंगरावरून खालीं उतरत होतों. पाऊस पडूं लागला ह्मणून, आपला अंगरखा डोक्यावर घेऊन **व्हर्जिनिया** बागेंतून घराकडे धांवत जात होती. मला वाटलें, ती एकटीच असेल, ह्मणून तिला साह्य करण्याकरितां मी गेलों.

परंतु पाहिलें तों, पाल याला हातीं धरून, त्याच आंगरख्यांत गुरंगटून घेऊन, ती चालली होती. दोघेंही आपण नवीच छत्री बनविली, ह्मणून हंसत चाललीं होतीं. वाऱ्यानें फुगलेल्या त्या झग्याच्या झोलाखालीं त्या सुंदर मुलांस पाहून, मला मोठी मौज वाटली. त्यांना लिहितां वाचतां मुळींच येत नसे. एकमेकांशीं गोडीगुलाबीनें खेळत असून मौजेनें रहावें, हाच कायतो त्यांचा अभ्यास. बाकी त्यांस जगांतील सर्व गोष्टी अज्ञात होत्या. भूतकाळच्या गोष्टींवर विचार करण्याची त्यांस पंचाईत नसे. व त्या दरीच्या पलीकडे काय आहे, याचीही चौकशी तीं करीत नसत. हें बेट एवढीच काय ती पृथ्वी, असें त्यांस वाटत होतें. त्यामुळें, त्यांच्या सर्व कल्पना संकुचित होत्या. एकमेकांशीं ममतेनें खेळावें व आयांच्या आज्ञेंत वागावें, यांतच त्यांचें मन गुंतलेलें असे. डोळेफोड करून निरूपयोगी शास्त्रें शिकण्याचे कष्ट करण्याची त्यांस गरज नव्हती. त्यांच्या अंतःकरणास कलंकाचा स्पर्श मुळींच नसल्यामुळें, त्यांस नीति शिकण्याची गरज नसे. चोरी करूंनये, असें त्यांस शिकविण्याची गरज नव्हती. कारण, जें त्यांस माहीत होतें, तें, सर्व त्यांचेंच होतें. मिताहार करावा असें त्यांच्या मनांत भरून देण्याची गरज नव्हती. कारण, निर्वाहा पुरतेंच त्यांस साधें अन्न खावयास मिळे. खोटें बोलूंनये असें त्यांस शिकविण्याची आवश्यकता नव्हती. कारण, लोकांस कळूंनये अशी त्यांची गुप्त गोष्ट कोणतीच नव्हती. मातापितरांवर प्रीति केली नाहीं, तर देव शिक्षा करितो, असें त्यांस भय घालण्याची गरजच नव्हती. कारण, आया त्यांजवर प्रीति करीत त्यामुळेंच त्यांच्या हृदयांत त्यांविषयीं पूर्ण

प्रेम उत्पन्न झालें होतें. धर्मावर श्रद्धा ठेवावी एवढेंच कायतें त्यांस धर्माचें शिक्षण मिळालेलें होतें. देवळांत जाऊन फार वेळ त्यांनीं देवाचें भजन केलें नाहीं, तरी, घरीं, दारीं, शेतांत, अरण्यांत, जेथें तीं असतील, त्या ठिकाणीं तीं हात जोडून भक्तिपूर्वक त्यास नमस्कार करीत. भक्ति आणि प्रीति या गुणांनीं त्यांचीं अंतःकरणें परिपूर्ण होतीं."

"निरभ्र दिवशीं अरुणोदयाच्या वेळेस आकाश स्वच्छ असतें, त्याप्रमाणें त्यांची वाल्यावस्था मोठ्या आनंदानें गेली. जरा समजूं लागलें, तेव्हां तीं आपल्या आयांस काम करण्यांत मदत करूं लागलीं. पहांटेस कोंबडा आरवल्यामुळें अरुणोदय झालासें कळलें ह्मणजे, व्हर्जिनिया लागलीच उठे आणि ताजें पाणीं आणण्याकरितां झऱ्यावर जाई, आणि परत आल्यावर न्याहारीची तयारी करूं लागे. सूर्योदय होऊन, पर्वतांच्या शिखरांवर प्रकाश पडला ह्मणजे, मार्गारेट आपल्या मुलास घेऊन लातूरबाईच्या घरीं जाई, आणि तेथें सर्व मिळून प्रातःस्मरण करून ईश्वराची प्रार्थना करीत. प्रार्थना झाल्यावर तीं झोपडीच्या बाहेर गवतावर केळीच्या झाडाखालीं, आगरांतच न्याहारी करावयास बसत. केळींची छाया हेंच त्यांचें छत असे; व नेहमीं केळीं पिकलेलीं असत त्यामुळें त्यांस रोज आयतेंच पक्वान्न होई; व केळीच्या लांबलांब आगोतल्या हीच त्यांचीं रूप्याचीं ताटें होतीं."

"खाण्यापिण्यास पुष्कळ चांगले पदार्थ मिळूं लागल्यामुळें तीं मुलें भराभर वाढून हृष्टपुष्ट दिसूं लागलीं. त्यांच्या मुखाकडे पाहिलें ह्मणजे असें वाटे कीं, त्यांचीं अंतःकरणें पवित्र व शांत आहेत."

"बारावें वर्ष लागलें तेव्हांच व्हर्जिनिया वयांत आल्या-

प्रमाणें दिसूं लागली. तिचे कुरळे व पुष्कळ केंस तिच्या मुखास फारच शोभा देत. शिवाय तिचे काळे कुळकुळीत डोळे व पोंवळ्यासारिखे ओंठ, यांच्या योगानें तर तिचें रूप फारच मोहक झालें होतें. बोलूं लागली म्हणजे तिचे डोळे मोठे पाणिदार दिसून जसे काय चमकतच आहेत असें वाटे. परंतु उगाच निमुटपणें वर पाहूं लागली म्हणजे असें वाटे कीं, कांहीं तरी हिच्या मनांत घोळत आहे, किंवा कोणत्यातरी गोष्टीनें ही उदास झाली आहे. **पाल** तर या वेळेस बराच चांगला ज्वान दिसूं लागला होता. तो **व्हर्जिनिया** हिच्यापेक्षां उंच असून, जरा काळसर होता. त्याचें नाक गरूडाच्या चोंचीसारखें होतें. त्याचे डोळे काळे असून फार पाणिदार होते. व त्याच्या पांपण्याचे केंस जरा लांब होते. यामुळें ते जरा शांत दिसत, नाहीं तर मोठे भयंकर दिसले असते."

"तो सर्वकाळ कांहींना कांहीं तरी कामांत असे. बहीण दृष्टीस पडली म्हणजे, मात्र तिच्या जवळ येऊन स्वस्थ बसे. जेवणावर बहुधा तीं एकमेकांशीं बोलत नसत. त्यांच्या हातापायांची नीटनेटकी ठेवण, बेताबातानें बसणें, हीं तुम्हीं पाहिलीं असतीं तर तुम्हांस वाटलें असतें कीं, मी स्वर्गांतील बालकेंच पाहत आहें. किंचित् गालांत हंसून एकानें दुसऱ्याकडे पाहिलें तर, दुसऱ्यानें स्मित करून त्याकडे पहावें, म्हणजे परस्परांशीं बोलण्यासारखेंच होई. त्यांची परस्परांवर स्वाभाविकच इतकी प्रीति असे कीं, एकमेकांचे मनोभाव कळविण्यास त्यांस शब्दांची सुद्धां गरज लागत नसे. या प्रकारेंकरून चन्द्राप्रमाणें आपली कन्या दिवसें दिवस मोठी होऊन, अधिकाधिक सुंदर दिसूं लागली; हे

पाहून, लातूरबाईच्या मनांत काळजी उत्पन्न झाली. ती नेहमी मला ह्मणे, 'मी मेल्यें तर माझ्या व्हर्जिनियाचें कसें होईल! तिच्या जवळ द्रव्य देखील नाहीं."

"फ्रान्सदेशामध्यें लातूरबाईची एक वृद्ध व हट्टवादी मावशी होती, ती मोठी श्रीमंत होती. लग्नाच्या कारणावरून ती लातूरबाईशीं इतकी क्रूरपणानें वागत असे कीं, कितीही दुःख प्राप्त झालें तरी, पाषाणहृदयमावशीचें दर्शन घ्यावयाचें नाहीं, असा लातूरबाईनें निश्चय केला होता. परंतु, मुलीविषयीं कळवळा उत्पन्न झाला, तेव्हां तरूणपणचा गर्व किंचित् कमी होऊं लागला. तिनें पत्र लिहून, आपला नवरा एकाएकीं मरण पावला; आपणास एक मुलगी झाली आहे. स्वदेशापासून फार लांब अशा ठिकाणीं, कोणाच्या आश्रयाशिवाय, तान्ह्यामुला सहवर्तमान मी मोठ्या संकटांत पडलें आहें; असें तिनें मावशीला कळविलें. परंतु पत्राचें कांहीं एक उत्तर आलें नाहीं. तिच्या अंगीं स्वभावतःच योग्य अभिमान असे; पण तो सर्व एकीकडे ठेवून, निंदा व निराशा यांचें भय न जुमानून, मावशीचा क्रूरपणा तिला माहित होता, व सद्गुणी पण हलक्या कुळांतल्या मनुष्याबरोबर लग्न केल्याबद्दल ती आपली क्षमा करणार नाहीं, हें ती समजत होती, तरी, व्हर्जिनिया हिजविषयीं तिच्या मनांत कांहीं तरी दया उत्पन्न करावी ह्मणून ती पुनःपुनः तिला पत्रें पाठवूं लागली, तरी पुष्कळ वर्षेंपर्यंत त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं."

"सन १७३८ ह्या वर्षी मानशुअर लाबरदोने हा येथें सुभेदार होता, त्या वेळेस त्यास येथें येऊन तीन वर्षे झालीं होतीं. एके दिवशीं लातूरबाईनें असें ऐकिलें कीं, सुभे-

दाराकडे तिच्या नांवाचें तिच्या मावशीकडून एक पत्र आलें आहे. तिच्याजवळ होता तशलाच साधा पोषाक करून, ती मोठ्या त्वरेनें लुइसबंदर येथें गेली. मुलीच्या ममतेमुळें पोषाकाचे वगैरे सर्व क्षुल्लक विचार एकीकडेसच राहिले. कोणताही एखादा विचार मनुष्याच्या मनांत घोळत असला ह्मणजे इतर गोष्टींकडे त्याचें लक्ष जात नाहीं."

"**लाबरदोने** यानें मावशीकडून आलेलें पत्र दिलें. त्यांत तिनें असें लिहिलें होतें कीं, 'अशा नीच लुचा मनुष्याशीं लग्न लाविल्याबद्दल तुला शिक्षा झाली, हें योग्यच आहे. अयोग्य कामवासनेला आपल्या आपणच दंड होतो. तुझा नवरा मेला, हा ईश्वरानेंच न्याय केला; असें ह्मटलें पाहिजे. **फ्रान्सदेशांत** राहून, स्वकुलाला कलंक लावण्यापेक्षां दूरच्या बेटांत जाऊन राहिलीस, हें त्वां चांगलें केलें. शेवटीं तुला इतकेंच कळवावयाचें कीं, तूं जेथें राहिली आहेस, तेथें आळशी मनुष्याशिवाय बाकी सर्व श्रीमंत झाले आहेत.' याप्रमाणें भाचीवर निंदेचा वर्षाव करून शेवटीं तिनें स्वतःचा स्तुतिपाठ केला होता, ती ह्मणाली, 'याप्रकारचीं लग्न केल्यापासून अवश्य प्राप्त होणारीं दुःखें, टाळण्याकरितां म्यां सतत कुमारिका राहण्याचा निश्चय केला आहे.' वास्तविक गोष्ट वेगळीच होती, ती फार महत्वाकांक्षी असे. बड्या दरबारी लोकांतील गृहस्थांपैकीं कोणाशीं लग्न करावें, असें तिच्या मनांत होतें. तिच्यापाशीं संपत्ति पुष्कळ होती, तरी स्वभाव वाईट व ती कुरूप असल्यामुळें तिचा मनोरथ पूर्ण झाला नाहीं."

"पत्राखालीं ताजाकलमांत तिनें असें लिहिलें होतें कीं, 'पूर्ण विचार करून मीं **मानशुअर लाबरदोने** यांजवळ

तुझी शिफारस केली आहे.' ही गोष्ट तिनें केली होती खरी, परंतु अशा रीतीनें कीं, त्यापासून शत्रूपेक्षांही आप्त भयंकर होतो. कारण, भाचीची दया आपणांस फार येते, असें बाहेरून दाखवून, आपण केलें हें योग्य आहे; असें दाखविण्याकरितां, तिच्या नानाप्रकारच्या खोट्या घडाड्या लिहिल्या होत्या."

"लातूरबाईला कोणीही चांगल्या तिऱ्हाईत मनुष्यानें पाहिलें तर, निजविषयीं त्याच्या मनांत सन्मान व कळवळा उत्पन्न झाल्याशिवाय राहात नसे. लावरदोने यानें तिजशीं शांतपणानें भाषण केलें. जेव्हां तिनें आपल्या मुलीची सर्व दुर्दशा सांगितली, तेव्हां तो ह्मणाला, 'बरें, पाहूं काय होईल तें. दुःखपरिहार करण्यास पुष्कळ मनुष्यें सांपडतील, तूं एवढ्या श्रीमंत नातलगाचा अपमान कशास करितेस. कारण, तुजकडूनही अपराध घडला आहे.' "

"लातूरबाई निराश होऊन आपल्या झोंपडीकडे परत आली. निराश होऊन दुःखानें तिचें काळीज धडधड उडत होतें. घरीं आल्यावर खुरचीवर बसली, आणि मावशीचें पत्र टेबलावर आपटून, आपल्या मैत्रिणीस ह्मणाली, 'हें अकरा वर्षें आशा करीत बसल्याचें फळ.' त्या सर्व मनुष्यांमध्यें लातूरबाईला मात्र वाचितां येत होतें. तिनेंच पुनः तें पत्र मोठ्यानें वाचिलें. तिचें वाचणें संपलें नाहीं तोंच, **मार्गारेट** ह्मणाली, 'आपणांस तुझ्या त्या मावशीचें काय करावयाचें आहे! ईश्वर आह्मांस विसरला आहे काय! तोच आमचा पिता होय: आजपर्यंत आपण सुखी नाहीं काय! मग तूं असा शोक कां करतेस! तुला धैर्य नाहीं.' लातूरबाई ढळढळां अश्रु ढाळीत होती; असें पाहून दोन्ही

हातांनीं तिला कवटाळून, 'सखे, माझे प्रिय मैत्रिणी,' असें ह्मणत आहे इतक्यांत गहिंवर येऊन तिचाही कंठ दाटून गेला."

"हा दुःखकारक प्रसंग पाहून, **व्हर्जिनिया** आईचा एक हात व दुसरा **मार्गारेट**चा हात आपल्या हातांनीं उराशीं घट्ट धरून मोठ्यानीं रडूं लागली. **पाल**, यास हें काय झालें आहे, व यांत कोणाचा अपराध आहे, हें कांहींच कळेना. तो रागानें डोळे लाल करून हातपाय आपटूं लागला. गडबड ऐकून **डोमिंगो** व **मेरी** हींही तेथें आलीं. 'सखे, बाई, आई, रडूं नको.' अशा शब्दांच्या कल्लोळांनीं ती लहानशी खोपटी दणदणून गेली."

"शेवटीं हीं ममतेचीं भाषणें ऐकून, **लातूरबाई**चा शोक कमी झाला. **पाल** आणि **व्हर्जिनिया** यांस हातांत धरून कवटाळून ह्मणाली, तुमच्यामुळें मला इतकें दुःख झालें आहे; तरी, माझ्या सर्व सुखाचें मूळ तुह्मीच आहां. प्रिय मुलांनो, दुर्दैव मला दुरून बाण मारीत आहे, तथापि माझ्या भोंवताली सर्व सुखच आहे. ती काय ह्मणते हें, **पाल** आणि **व्हर्जिनिया** यांस कांहींच कळेना. पण ती शांत झाली, असें त्यांनीं पाहिलें तेव्हां, तीं हंसूं लागून तिचे मुके घेऊं लागलीं. वसंतऋतूमध्यें जसें एकाएकीं एखादें वादळ होतें, परंतु तें शांत झाल्यावर, पुनः पहिल्यापेक्षां जास्त शोभा येते. त्याप्रमाणें तेथील रडारड नाहींशी होऊन, जिकडे तिकडे शांतता झाली. **लातूरबाई** कुटुंबामध्यें शांत दिसे. तथापि, कधीं कधीं मजजवळ शोकाचा उद्गार काढीत असे. दुःखानें तिचें हृदय अगदीं करपून गेलें होतें."

"या उभयतां मुलांचा चांगुलपणा दिवसेंदिवस अधिक प्रसिद्धीस येऊं लागला. एका रविवारीं सकाळींच त्यांच्या आया जंबीरवनच्या देवळांत प्रार्थना करावयास गेल्या होत्या, त्या वेळेस डोंगरावरे झाडींत एक शिद्रीण त्यांच्या दृष्टीस पडली; ती इतकी कृश झाली होती कीं, तिचा केवळ अस्थिपंजर मात्र राहिला होता. आंगावर वस्त्र ह्मटलें तर एक कंबरे भोंवतालीं गुंडाळलेली जीर्ण गोणपाटाची चिंधी मात्र होती. **व्हर्जिनिया** न्याहारीचे पदार्थ करण्याच्या गडबडींत होती; तेथें येऊन तिच्या पायांवर लोटांगण घालून, ती ह्मणाली 'बाई, मुली, या गरीब दासीवर दया कर. मी एक महिनाभर या डोंगरांतून फिरत आहें; भुकेनें अगदीं अर्धमेली झालें आहें; पारधी आणि त्यांचे कुत्रे नेहमीं माझ्या पाठीस लागतच आहेत; *काळनदीच्या कांठीं मोठा एक सावकार राहतो तो माझा धनी. त्यानें माझे फार हाल केले, ह्मणून मी त्यापासून पळालें.' असें ह्मणून तिनें आंगावरील वळ दाखविले. ती ह्मणाली, 'मी जीव देण्यास जात होतें; पण, तुह्मी एथें राहतां असें ऐकून, मला वाटलें कीं, कांहीं चांगलेही गोरेलोक येथें राहतात, याकरितां जीव देणें चांगलें नाहीं.'

व्हर्जिनिया, गहिंवर येऊन ह्मणाली, 'बाई, धीर धर, तूं मोठी हतभाग्य आहेस. हें खा.' असें ह्मणून, तयार केलेली न्याहारी तिनें तिजपुढें ठेविली; ती त्या बिचाऱ्या दासीनें एकाक्षणांत बकाबक खाऊन टाकिली. तिची क्षुधा शांत झाली तेव्हां, **व्हर्जिनिया** तिला ह्मणाली, 'हे अनाथ बाई, तुझ्या धन्याकडे जाऊन तुजकरितां मी क्षमा मागूं काय?

* Black River.

तुझी दशा पाहून खरोखर त्याला दया येईल. मला वाट दाखवितेस काय?' ती गरीब शिद्दीण ह्मणाली, 'बाईसाहेब, आपण जाल तिकडे मी पाठीमागून येते. आपण देवमनुष्य आहां.' व्हर्जिनिया हिनें भावास हांक मारून आपले बरोबर येण्यास त्याची विनवणी केली. वाट दाखविण्यास शिद्दीण पुढें चालूं लागली. वाट फार घोटाळ्याची व विकट होती. वाटेनें डोंगर, जंगलें, नद्या, पुष्कळ लागल्या. शेवटीं कड्याच्या खालीं उतरून, तीं काळनदीच्या कांठीं जाऊन पोहोंचलीं. तेथें त्यांनीं एक मोठा बाग व त्याच्या मध्यें एक सुंदर वाडा पाहिला. तेथें पुष्कळ गुलाम काम करीत होते. त्यांचा धनी तोंडामध्यें विडी धरून, व हातांत छडी घेऊन, त्यांमध्यें फिरत होता. तो उंच, सडपातळ, काळसर, असा असून त्याचे डोळे खोल गेले होते, व भिंवया एकासएक मिळाल्या होत्या. पाल याचा हात धरून व्हर्जिनिया त्यांच्या जवळ गेली, आणि गहिंवर येऊन ह्मणाली, 'या गरीब दासीस क्षमा करा. देव तुह्मांस प्रसन्न होईल.' ती दासी कांपत कांपत मागें उभी राहिली होती."

"या मुलांच्या आंगावर भिकार पोषाक असल्यामुळें, प्रथमतः या मनुष्यानें त्यांच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. परंतु जेव्हां त्यानें व्हर्जिनिया हिचें रूप व डोक्यावरील निळ्या टोपीच्या बाहेर आलेले कुरळे केंस हीं पाहिलीं. व तिचे गोड, मधुर, शब्द त्यानें ऐकिले; व हात जोडून, कांपत कांपत क्षमा-करा, असें ह्मणत आहे असें पाहिलें; तेव्हां तोंडांतून विडी काढून व छडी वर करून भयंकर शब्द करून ह्मणाला, 'देवाकरितां नाहीं; पण, तुजकरितां

हिला क्षमा करितों.' व्हर्जिनिया हिनें त्या दासीला धन्याकडे जाण्यास बोटानें खुणावून, लागलींच दूर धांव मारिली. आणि पालही तिचे मागून पळत गेला."

"ज्या डोंगरावरून खालीं उतरलीं होतीं, त्याच्या माथ्यावर जाऊन तीं एका झाडाखालीं बसलीं. श्रम, क्षुधा, तृषा, यांनीं तीं अगदीं व्याकूळ झालीं होतीं. कांहीं खाल्ल्याशिवायच तीं घरांतून बाहेर पडलीं होतीं. व सकाळपासून सात आठ कोस चाललीं. पाल, व्हर्जिनिया हिला ह्मणाला, 'ताई दुपार परतून गेली. मला खचीत ठाऊक आहे कीं, तुला तहान व भूक फार लागली आहे. आपणांस येथें खावयास कांहीं मिळणार नाहीं, पुनः डोंगराखालीं जाऊन, त्या दासीच्या धन्याजवळ कांहीं खावयास मागूं.' व्हर्जिनिया ह्मणाली, 'छेछे, मला त्याचें फार भय वाटतें. दुष्टाची भाकर खाणें ह्मणजे, तोंडांत दगड घातल्याप्रमाणें आहे.' असें आई कधीं कधीं ह्मणत असते; ह्याची तुला आठवण आहेना'? पाल ह्मणाला, 'तर मग ताई, आतां आपण काय करावें? या झाडांवर फळ देखील नाहीं. फार काय, पण तुला द्यावयास मला एकादी चिंच देखील मिळत नाहीं.' तो इतकें बोलत आहे तों, त्यांनीं जवळच खडकावरून पाणीं पडत होतें त्याचा आवाज ऐकिला. तीं धांवत त्या स्वच्छ झऱ्याजवळ गेलीं. आणि तहान भागवून, त्याच्याजवळच कांहीं आहाळीवाचीं झाडें होतीं, त्यांवरून तीं आहाळीव गोळा करूं लागलीं. आणखी कांहीं चांगलें खावयास मिळावें ह्मणून रानांत फिरत होतीं, तों व्हर्जिनिया हिच्या दृष्टीस एक लहानसें ताडाचें झाड पडलें. पोट भरण्यास ताडाचीं फळें बरीं असतात. तें झाड तीस चाळीस

हात उंच होतें, परंतु जाड ह्मटलें तर मांडीएवढें असेल किंवा नसेल. ताडाचें लांकूड आंतून भुसभुशीत असतें; पण बाहेरून त्याची साल इतकी कठीण असते कीं तीवर कुऱ्हाडीची धार देखील मोडून जाते. पाल याजवळ तर चाकू देखील नव्हता. पाल यानें तें झाड जाळून खालीं पाडण्याचा बेत केला, पण दुसरी नवीच अडचण पडली, ती ही कीं, त्याजवळ विस्तव पाडण्यास चकमक नव्हती. या बेटांत सर्व ठिकाणीं खडक आहे, परंतु गारगोटी कोठें सांपडावयाची नाहीं. गरज पडली ह्मणजे मनुष्यास पाहिजे तितक्या युक्ति सुचतात. अत्यंत उपयोगी असे सर्व नवीन शोध संकटांत पडलेल्या मनुष्यांपासूनच प्राप्त झाले आहेत. शिद्दी लोकांच्या चालीप्रमाणें विस्तव पाडण्याचा पाल यानें बेत केला. त्यानें एक वाळलेले लांकूड घेऊन, अणकुचीच्या दगडानें त्याला भोंक पाडलें, आणि तें लांकूड पायांत धरून व दुसरें एक नुळकीदार लहानसें लांकूड त्यांत बसवून, हातांनीं भराभर फिरवूं लागला. तेव्हां घर्षणामुळें लागलाच धूर व ठिणग्या निघूं लागल्या. लागलीच वाळलेलें गवत व पातेरा घेऊन, झाडाच्या बुंधापाशीं पाल यानें विस्तव पेटविला, तेव्हां थोड्याच वेळानें झाड खालीं पडलें. ताडाच्या झांवळ्या फार कठीण असतात, त्यांत फळें असतात, तीं काढण्यास कठीण पडतें. परंतु पाल यानें आगटी करून झाडाचा शेंडाही जाळून टाकिल्यामुळें फळें आयतींच सांपडलीं. पाल आणि व्हर्जिनिया यांनीं कांहीं फळें हिरवींच खाल्लीं, व कांहीं भाजून खाल्लीं. दोन्ही त्यांस सारखींच गोड लागलीं. आपण प्रातःकाळीं परोपकाराचें कृत्य केलें, हें मनांत येऊन,

तीं आनंदानें फळें खात बसलीं होतीं. परंतु, फार वेळ झाल्यामुळें आया आपली काळजी करतील, हें मनांत येऊन, तीं फार दुःखित झालीं. व्हर्जिनिया पुनःपुन्हा घरच्या गोष्टी बोलूं लागली. खावयास मिळाल्यामुळें पाल यांस बरेंच अवसान आलें होतें. तो ह्मणाला, 'आपण खचीत लौकरच घरीं पोहोंचूं'."

"आपणास वाट माहीत नाहीं, व दाखविण्यासही कोणी नाहीं, याची खाणेंपिणें आटोपल्यावर त्यांस आठवण झाली. नव्या नव्या अडचणी येऊन पाल याचें अवसान खचत चाललें. तो ह्मणाला, 'आपल्या झोपड्यांवर उन्या दोन प्रहरीं चांगलें ऊन पडतें. तो पलीकडे तीन टेंकाडांचा डोंगर दिसतो त्यावरून आपणांस गेलें पाहिजे. आपण सकाळीं तिकडूनच आलों. ये, चला जाऊं' या पर्वतास *त्रिकूट पर्वत असें ह्मणतात. उत्तर बाजूला काळनदीचा उगम आहे. तेथून कड्यावरून पाल आणि व्हर्जिनिया हीं खालीं उतरूं लागलीं, आणि तासभर चालून नदीच्या कांठीं येऊन पोहोंचलीं."

"या बेटाच्या पुष्कळ भागांची अद्याप सुद्धां लोकांस पुरती माहिती नाहीं. यामुळें कित्येक डोंगरांस व नद्यांस अद्याप कोणीं नांवें दिलीं नाहींत. हीं मुलें ज्या नदीवर उभीं राहिलीं होतीं ती नदी धो, धो, धो, शब्द करीत खडकावरून वहात येते. यामुळें तिचें पाणीं नेहमी फेंसाळलेलें असतें. पाण्याचा शब्द ऐकूनच व्हर्जिनिया घाबरून गेली." पलीकडे जाण्यास नदीमध्यें तिच्यानें पाऊल घालवेना. पाल यानें तिला खांद्यावर घेतलें आणि नदीचा खळखळ शब्द न जुमा-

* Mountain of three peaks.

नतां पलीकडे जाऊं लागला. नदींत बुळबुळीत खडक होता. त्यावरून पाय निसरावयाचे, पण खांद्यावर ओझें असल्यामुळें पाऊल जोरानें टाकण्यास सांपडे.' तो व्हर्जिनिया हिला ह्मणाला, 'भिऊं नको, तूं बरोबर असल्यामुळें मला खूब बळ आलें आहे. काळनदीच्या कांठच्या मनुष्यानें त्या दासीला क्षमा केली नसती तर, मीं त्याशीं मारामारी केली असती.' व्हर्जिनिया ह्मणाली, 'काय, त्या दुष्ट मनुष्याशीं! मीं केवढ्या पंचाईतींत तुला पाडिलें आहे! कृपाळू परमेश्वरा, वाईट करण्याचें सोपें आहे; परंतु, चांगलें करणें किती कठीण आहे'."

"पाल नदी उतरून पलीकडे गेला. बहिणीला खांद्यावर घेऊन, तसेंच पुढें चालावें, असें त्याच्या मनांत होतें. त्रिकूट पर्वत तेथून अजून कोसभर राहिला होता. तिला घेऊन वर चढून जाईन, असें त्यास वाटत होतें, परंतु अगदीं थकल्यामुळें त्यानें आपलें ओझें खालीं उतरलें, आणि विश्रांति घेण्यास तिच्याजवळ बसला. तेव्हां व्हर्जिनिया त्यास ह्मणाली, 'दादा, दुपार परतून गेली. तुला थोडीशी ताकद आहे; परंतु मी अगदीं थकून गेलें. मला येथें ठेवून घरीं जा; आणि मातांचें सांत्वन कर' पाल ह्मणाला, 'मी तुला एकटी सोडून कधीं जाणार नाहीं. रात्र झाली तर मी विस्तव पेटवून, दुसरें ताडाचें झाड पाडीन; तुला फळें खावयास देईन. आणि वस्तीकरितां, झांवळ्याचें घरकूल करीन.' व्हर्जिनिया लौकर परहित करण्याच्या उत्सुकतेनें, पायांत जोडा घालण्यास सुद्धां विसरली होती. खडकावर ठेचा लागून तिचे पाय रक्तबंबाळ झाले होते. कांहीं विश्रांति घेतल्यावर तिनें नदीच्या कांठीं एक झाड होतें, त्याचीं

मऊ पानें काढिलीं; आणि आपल्या पायांस गुंडाळिलीं. पानांच्या गारव्यानें पाय जरा थंड झाल्यावर एका हातांत वेळूची काठी घेऊन, दुसरा हात **पाल** याचे खांद्यावर ठेवून ती चालूं लागली."

"तीं जंगलांतून हळूहळू **त्रिकूट** पर्वताकडे चाललीं होतीं, परंतु उंच उंच वृक्षांच्या गर्दीमुळें त्यांस डोंगर दिसेनासा झाला; व **सूर्य** मावळावयास गेल्यामुळें अंधार पडत चालला. तीं चालून चालून पुनः त्याच जाग्यावर परत येत. याप्रमाणें झाडांमधील नागमोडी सारख्या वाटेंत सांपडलीं. तींतून त्यांस बाहेर पडतां येईना. **व्हर्जिनिया** हिला खालीं बसावयास सांगून **पाल** हिकडे तिकडे बाहेर पडण्यास रस्ता पाहूं लागला. त्या जंगलाच्या घोंटाळ्यांत तो अर्धवेडा होऊन गेला होता. वाट शोधून काढण्याचा सर्व प्रयत्न व्यर्थ गेला. **त्रिकूट** पर्वत कोणीकडे आहे, हें पाहण्याकरितां तो एका उंच वृक्षावर चढला, परंतु अस्तास जाणाऱ्या **सूर्या**च्या किरणांनीं प्रकाशित अशा वृक्षशिखरांशिवाय त्यास, भोंवताली कांहींएक दिसेना."

"खिंडींतील रानांतून जिकडे तिकडे डोंगरांच्या सावल्या पडल्या होत्या. सन्ध्याकाळच्या वेळेस वारा अगदीं शांत झाला. त्या भयंकर एकांत-अरण्यांत अगदीं सामसूम झालें. मधून मधून, काळविटांचें ओरडणें मात्र कानीं पडे. कोणी तरी पारधी ऐकेल अशा आशेनें होईल तितका जोर करून **पाल** "या या, **व्हर्जिनिया** हिला मदत करण्यास या," असें ओरडूं लागला. परंतु, त्याच्याच ओरडण्याचा प्रतिध्वनि '**व्हर्जिनिया व्हर्जिनिया**, या, या,' याशिवाय, त्यास कांहीं ऐकूं येईना. शेवटीं श्रमानें व काळजीनें थकून तो झाडावरून खालीं उतरला. आणि अरण्यांत रात्र कशी घाल-

वावी याचा विचार करूं लागला. कोठें पाणी दृष्टीस पडेना, ताडाचें झाड सांपडेना. विस्तव पेटविण्यास वाळलेलीं काटकेंही मिळेनात; त्या वेळेस आपण किती अशक्त आहों, हें त्यास कळून तो रडूं लागला. व्हर्जिनिया ह्मणाली, 'दादा रडूं नको. तूं असें केलेंस तर, मी शोकानें मरून जाईन. तुला व आपल्या आयांला मीं या वेळेस संकटांत पाडिलें. आतां मला कळून आलें कीं, वडिलांच्या आज्ञेशिवाय चांगली गोष्ट सुद्धां करूं नये. अरेरे! मी किती अविचारी आहें!' असें ह्मणून तीही रडूं लागली; आणि पाल यास ह्मणाली, 'दादा, आपण देवाची प्रार्थना करूं. तो आपली विनंति ऐकेल.' त्यांची प्रार्थना संपली नाहीं तोंच त्यांनीं कुत्र्याचें भोंकणें ऐकिलें. पाल ह्मणाला, 'हरणाच्या पालथीवर आलेल्या कोणा पारध्याचा हा कुत्रा असावा.' असें ह्मणतो तो कुत्रा अधिक जोरानें भोंकूं लागला. व्हर्जिनिया ह्मणाली, 'हा खचींत आपला बांडा कुत्रा आहे. होय, मीं त्याचा शब्द ओळखिला. तर मग आपल्या डोंगराच्याच पायथ्याशीं आपण अगदीं घराजवळ आलों आहों काय?' इतक्यांत बांड्या भोंकत भोंकत त्यांच्या जवळ येऊन पोहोंचला, आणि त्यांस चाटूं लागला. तीं आश्चर्यानें अगदीं चकित झालीं. तों इतक्यांत डोमिंगोही धांवत त्यांजवळ आला. आणि आनंदाश्रु ढाळूं लागला. हा ह्मातारा विश्वासू चाकर दृष्टीस पडतांच तींही रडूं लागलीं. त्यांच्या तोंडांतून शब्द सुद्धां उमटेना. जरा दम खाऊन डोमिंगो ह्मणाला, 'मुलांनो, आज तुह्मीं आयांना केवढ्या संकटांत पाडिलें आहे! मजबरोबर त्या देवळांतून परत आल्या, आणि तुह्मी घरांत नाहीं असें पाहून चकित झाल्या. मेरी कांहीं

अंतरावर काम करीत होती, तिलाही तुह्मी कोठें गेलां हें समजलें नाहीं. तुह्मांला कोठें शोधावें, हें मला कांहींच कळेना. मीं सर्व मळा धुंडून काढिला, शेवटीं मीं तुमचे कांहीं जुने कपडे घेतले आणि बांड्यास दाखविले. त्या बिचाऱ्यास जसें कांय मी काय ह्मणतों हें समजलेंच. कारण, तो लागलांच हुंगूं लागून तुमच्या वाटेचा माग काढूं लागला; आणि शेंपूट हालवीत हालवीत काळनदीकडे मला घेऊन चालला. तेथें त्या बागवाल्यानें मला सांगितलें कीं, 'मुलें शिद्धिणीला घेऊन येथें आलीं होतीं. मीं त्यांच्या भिडेस्तव तिची क्षमा केली.' पण काय उपयोग त्या क्षमेचा. त्यानें तिजकडे बोट दाखविलें, तेव्हां मुसक्या बांधून व गळ्यांत एक लोखंडाचा सांखळदंड अडकवून लांकडाच्या खुंटापाशीं तिला बांधून ठेविलें होतें.' "

"तेथून बांड्यानें वाट हुंगित हुंगित काळनदीच्या उगमाच्या कड्यावर मला आणिलें. तेथें तो मोठ्या जोरानें भोंकूं लागला; तेथें झऱ्याच्या कांठीं एक ताडाचें झाड पडलें होतें; आणि विस्तव अद्याप धुमसत होता; शेवटीं मला तो येथें घेऊन आला. आपण त्रिकूट पर्वताच्या पायथ्याशीं आहों. येथून आपलें घर अजून चार कोस लांब आहे. नंतर त्यानें भाकरी व कांहीं फळें त्यांस खावयास दिलीं. त्यांच्या आयांनीं एक मोठा कुंड्या भोपळा भरून, लिंबाचें सरबत, साखर घालून जायफळाचा वास लावून पाठविलें होतें. तेंही त्यांस प्यावयास दिलें. त्या गरीब दासीचें स्मरण झालें, व आपल्या आयांस कांळजींत पडल्याचें मनांत आलें, तेव्हां व्हार्जिनिया सुस्कारा टाकून पुनः पुनः 'हित करणें किती कठिण आहे,' असें ह्मणूं लागली."

"**पाल** आणि **व्हर्जिनिया** हीं भाकर खाऊं लागलीं; तों **डोमिंगो** यानें विस्तव पेटविला. रात्र होऊन काळोख पडला होता. खडकावर एक प्रकारचीं झाडें उगवतात, तीं ओलीं असलीं तरी पेटतात; तीं कांहीं आणून **डोमिंगोनें** एक चूड बनविली. तीं पुढें जाण्यास निघालीं तों, दुसरीच पंचाईत पडली. ती अशी कीं, **पाल** आणि **व्हर्जिनिया** यांच्यानें चालेवना. सुजून त्यांच्या पायांची आग होऊं लागली. रात्रीस तेथेंच रहावें, अथवा त्यांस तेथेंच ठेवून कोणी मनुष्य पहावयास जावें, अशा विचारांत **डोमिंगो** पडला. तो ह्मणाला, 'मी तुह्मां दोघांस खांद्यावर घेऊन चालत असें, ते दिवस कोठें गेले! आतां, तुह्मी मोठीं झालां व मी ह्मातारा झालों.' तो अशा घोंटाळ्यांत पडला आहे तों कांहीं अंतरावर शिद्दी लोकांची एक लहानशी टोळी दृष्टीस पडली. त्या टोळीचा मुख्य, **पाल** आणि **व्हर्जिनिया** यांच्याजवळ येऊन ह्मणाला, 'भिऊं नका, तुह्मीं चांगले लोक आहां. आज सकाळीं **काळनदीवर** आमच्या जातीची एक बाई घेऊन जात होतां, तें आह्मीं पाहिलें. तुह्मी त्या दुष्ट धन्याजवळ तिजकरितां क्षमा मागण्यास गेलां होतां, त्याबद्दल आह्मी तुह्मास खांद्यावर घेऊन घरीं पोंहोंचवितों.' लागलीच त्यानें खूण केल्याबरोबर चार शिद्दी पुढें आले. आणि झाडांच्या खांद्यांची डोली बनवून तींत, **पाल** आणि **व्हर्जिनिया** यांस बसवून खांद्यावर घेऊन, आनंदानें त्यांस आशीर्वाद देत चालूं लागले. **डोमिंगो** पुढें चूड घेऊन चालला; **व्हर्जिनिया** हिला या गोष्टीचा मोठा चमत्कार वाटून, ती, **पाल** यास ह्मणाली, 'दादा, सत्कृत्याचें फळ दिल्याशिवाय, देव कधीं राहत नाहीं.'"

"मध्यरात्रीस डोंगराच्या पायथ्याशीं येऊन पोंहोंचलें.

तेथें पुष्कळ आगन्या त्यांच्या दृष्टीस पडल्या. वर चढूं लागले नाहीं तोंच, 'आमचीं मुलें आलीं काय?' असा शब्द त्यांचे कानीं पडला. तेव्हां लागलीच, 'होय आह्मी आलों' अशी सर्वांनीं एकदम आरोळी दिली, इतक्यांत हातांत कांकडे घेऊन मेरी व त्यांच्या आया तेथें आल्या. लातूरबाई ह्मणाली, 'दुर्दैवी मुलांनो, तुह्मी कोठें गेलां होतां? आह्मांला केवढ्या पंचाईतींत आज तुह्मीं पाडिलें,' व्हर्जिनिया ह्मणाली, 'आह्मी काळनदीवर त्या शिद्दी दासीला क्षमा मागण्यास गेलों होतों. ती अगदीं भुकेनें मरत होती ह्मणून आज सकाळीं मीं तिला आमची न्याहारी खावयास दिली, यामुळेंच हे शिद्दीलोक आह्मांस पोंचवावयास आले.' लातूरबाईच्यानें पुढें कांहीं बोलवेना, तिनें मुलीला पोटाशीं कवटाळून धरिलें; व्हर्जिनिया आईच्या अश्रूंनीं भिजून गेल्यामुळें ह्मणाली, 'माझे सर्व श्रम त्वां नाहींतसे केले,' मार्गारेटही मोठ्या आनंदानें पाल यास मांडीवर घेऊन ह्मणाली, 'शाबास मुला, तूंही आज चांगली गोष्ट केली,' झोपडींत पोहोंचल्यावर त्यांनीं त्या शिद्दीलोकांस पोटभर जेवायास घातलें. नंतर ते, 'या गोरेलोकांचें ईश्वर कल्याण करो' अशी प्रार्थना करून रानांत गेले."

"सदा सर्वकाळ त्या कुटुंबांमध्यें शांतता व सुख असे. महत्वाकांक्षा, हेवा, इत्यादिकांनीं त्यांचें मन अगदीं उद्विग्न होत नसे. यूरोपियन लोकांच्या इतर वसाहती प्रमाणेंच या बेटांतही कोणाची एखादी वाईट गोष्ट असली ह्मणजे तेव्हांच प्रसिद्ध होते. परंतु यांचे सद्गुण, किंबहुना यांचीं नांवें देखील कोणांस माहीत नव्हतीं. जंबीरबनाकडे जातांना एखाद्या वाटसरानें, 'या दोन झोपड्यांत कोण राहतो?'

असें मैदानांत राहणाऱ्या एकाद्या मनुष्यास विचारिलें तर, ज्यांस त्यांची माहिती नव्हती, त्यांनींसुद्धां असें सांगावें कीं, 'तीं चांगलीं माणसें आहेत.'. जसें एकादें गुलाबाचें वगैरे सुगंधी पुष्प कांऱ्यांच्या झुडुपांत गुप्त राहिल्यामुळें दिसलें नाहीं, तरी त्याचा सुगंध लांबवर जातो, त्याप्रमाणें यांच्या कोणाशीं परिचय नव्हता तरी हीं सद्गुणी आहेत, इतकें लोकांस माहीत होतें."

"परोपकार करणें हेंच काय तें आपल्या जीविताचें फळ आहे, असें त्या सुंदर कुटुंबांतील माणसांस वाटत असे. एकांतवासानें परोपकारवासना कमी होऊन, मनुष्य द्वाष्ट होतो. तसें न होतां त्यांचीं अंतःकरणें अधिकच प्रेमळ झालीं होतीं. सृष्टींतील ईश्वराच्या कृत्यांचे विचारानें त्यांचें मन सर्वदां आनंदमय असे. अशा ओसाड प्रदेशांत सुद्धां परमेश्वरानें आपणांस कोणत्या गोष्टीची उणीव पाडिली नाहीं, याकरितां तीं नेहमीं ईश्वराची पूजा करून त्याचे आभार मानीत. याप्रमाणें तीं त्या मनोरंजक, व सर्वदा अभिनव अशा वनस्थलामध्यें आनंदानें रहात असत."

"यूरोपांतील मुलें पंधरा वर्षांच्या वयांत जितकीं बुद्धिमान् व सशक्त असतात त्यांपेक्षां पाल बाराव्या वर्षींच अधिक बुद्धिमान् व शरीरानें दृढ असे. डोमिंगोनें लाविलेल्या बागेला त्यानें फारच शोभा आणिली होती. तो डोमिंगोबरोबर जवळच्या रानांत जाऊन तेथून, लिंबी, नारिंग्या, चिंच, वगैरे झाडांच्या हुंड्या आणून लावी. हीं झाडें वाटोळीं व नेहमीं हिरवीं गार असल्यामुळें, मोठी मौज दिसे. तसेंच तो खजुराचीं झाडें लावी; त्यामुळें, त्यांस ओला छानदार मुवासिक खजूर खावयास मिळे. मोठमोठीं झाडें सांपडतील

तीं तो बागेच्या कुंपणामध्यें लावी. तशींच कित्येक वर्ष-दोन वर्षांनीं फुलें, फळें, येणाऱ्या झाडांच्या बिया आणून लावी. त्यानें अगस्त्याचीं झाडें लाविलीं होतीं; त्यांच्या फुलांचे घोंस स्फटिकांच्या झुबक्यां सारखे लोंबूं लागले ह्मणजे मोठी मौज दिसे. तशींच त्यानें कांहीं इराणांतलीं सुंदर झाडें लाविलीं होतीं. त्यांच्या करड्या रंगाच्या खांद्या आकाशांत उंच गेल्यामुळें, मोठी शोभा आली होती. तशींच खांबासारखीं सरळ व शेंड्याकडे फळांनीं भरलेलीं अशीं पोपयांचीं झाडें आणि त्यांवर छत्रीसारखीं पानें, हीं देखील मोठीं खुबीदार दिसत."

"आंबे, पेरू, डाळिंबी, अंजीरी, नारिंगी, वगैरे पुष्कळ फळझाडें त्यानें लाविलीं होतीं. या बहुतेक झाडांपासून त्यांस सावली होऊन फळेंही पुष्कळ मिळत. बागेंत भरकड जमीन होती, त्या ठिकाणींसुद्धां त्यानें मेहनतीनें पुष्कळ झाडांची मौज केली होती. काळ्या उंच उंच खडकांवरून त्रिधारी निवडुंगें, कोरफडी, वगैरे वाढलेल्या असत; सर्व झाडें अशा खुबीनें लाविलीं होतीं कीं, एके ठिकाणीं उभें राहिलें ह्मणजे सर्व बाग दृष्टीस पडे. लवणाच्या मध्यभागीं अगदीं लहान लहान झाडें लाविलीं होतीं; त्यांच्यामागें किंचित् वाढलेले असे फुलांचे ताटवे वगैरे, त्यांच्यामागें साधारण उंचीचीं झाडें; व शेवटीं त्यांच्या मागें हद्दीवर मोठमोठाले गगनचुंबित वृक्ष, याप्रमाणें व्यवस्था केलेला हा वर्तुलाकार हिरवागार बाग, एखादे, एकावरएक बसावयास केलेल्या नाटकगृहाप्रमाणें दिसत असे. मधून मधून, फुलें व फळें, शेतें आणि कुंपणें, यांची मजा दिसत असे. तो आपल्या आवडीप्रमाणें झाडें लावी, तथापि, जेथें जीं हो-

ण्यासारखीं तेथें तींच लावी. मोठें उंच वाढणारे वृक्ष उंचवट्यां-वर लावी; व ज्यांस नेहमीं पाणीं पाहिजे अशीं झाडें असतील त्यांस ओढ्याच्या कांठीं लावी. यामुळें सर्वच झाडें चांगलीं होत. डोंगरावरून धो धो धो पाणीं वहात येऊन, खोल जाग्यांतून कित्येक ठिकाणीं स्वच्छ आणि लहान लहान तळीं पुष्कळ होत. व कित्येक ठिकाणीं पाणीं पसरून, आरशाच्या भिंगासारखें चमकूं लागून, त्यांत फुललेलीं झाडें, उंच उंच खडक व नीलवर्ण आकाश, यांचीं चकचकीत प्रतिबिंबें पडत; त्यामुळें फार सुंदर देखावा होत असे."

"अगेंतील जागा उंचसखल होती, तथापि सर्व ठिकाणीं सहज जातां येई. याकरितां आह्मीं सर्वांनीं त्यास सांगितलें होतें. व त्यास आह्मी लागेल ती मदत देत असूं. त्यानें खिं-डीच्या आंतून सभोंवतीं रस्ता बांधून काढिला होता. व त्यामधून लहान लहान वाटा मध्यें जाण्यास ठेविल्या होत्या. उंचसखल जागा होती. तेथें सुद्धां साफ वाटा करून, व लहान-साहान झाडें लावून. त्यानें शोभा आणिली होती. त्या आ-लीकडल्या वाटेंत डोंगरावरून पडलेले दगडांचे ढीग दिस-तात, असले दगड या बेटांत पुष्कळ ठिकाणीं आहेत. हे दगड गोळा करून तो मधून मधून लहान लहान बुरूज करी; आणि त्यांच्या खालीं माती घालून तेथें जाई, जुई, मोगरा, शेवंती, यांचे वेल लावी; त्यामुळें थोड्याच वेळांत ते बुरूज हिरवेगार होत, आणि त्यांवर फुलें आलीं ह्मणजे फारच मौज दिसे. "ओढ्याच्या कांठीं मोठमोठाले वृक्ष होते. त्यांची छाया इतकी गर्द असे कीं, तींत सूर्याचे किरण सुद्धां प्र-वेश करीत नसत. तेथें गेलें ह्मणजे ही एक घुमटासारखी गुहाच आहे असें वाटे. येथें उन्हाळ्याच्या दिवसांत येऊन

बसलें ह्मणजे गार वाटून मोठा आनंद होतअसे. या रस्याचे पलीकडे झाडी आहे; तिच्या मध्यभागीं एक लहानसा चिमणबाग असे. त्यांत पुष्कळ प्रकारचीं फळें असत. तसेंच एका बाजूला शेत, व दुसऱ्या बाजूला भाजीपाल्याचा मळा, त्यानें लाविला होता. झाडीच्या त्या बाजूस गेलें ह्मणजे झोंपड्या दृष्टीस पडत. तेथून तें पलीकडील उंच गगनचुंबित गिरिशिखर दिसत आहे, त्याच्या कड्यावर तळापर्यंत बाभळी, कंकरी, वगैरे झाडांची दाटी असे. त्यामुळें भर दोनप्रहरीं सुद्धां खालची कांहीं एक वस्तु दिसत नसे. त्याच्याच पलीकडे एक डोंगराचा सुळकंडा पुढें आला आहे; त्यावर उभें राहिलें ह्मणजे सर्व दरीची शोभा एकदम दिसे. तेथून समुद्रही साफ दिसतो, यामुळें तेथें उभें राहून आह्मी यूरोपांतून येणारें किंवा तिकडे जाणारें गलबत पहात असूं. या जागीं त्या दोन्ही कुटुंबांतील माणसें संध्याकाळीं संधिप्रकाशाच्या वेळेस हवा खाण्यास बसत असत. त्या वेळेस फुलांचा घमघमाट, व झऱ्यांचा झुळझुळ आवाज, यांपासून मोठा आनंद होई."

"या दरींतील कित्येक रमणीय स्थळांस जीं सुंदर नांवें दिलीं होतीं, त्यांची फारच मौज वाटे. मीं घराहून येऊं लागलों ह्मणजे लांब दूर असलों तरी, आतां ज्या डोंगराविषयीं बोलत होतों, तेथून त्यांस दिसे, ह्मणून त्याचें नांव त्यांनीं **मित्रप्रेक्षण** असें ठेविलें होतें. समुद्रांत गलबत दिसूं लागलें ह्मणजे लोक जवळच्या डोंगरावर बावटा उभारीत; हें **पाल** आणि **व्हर्जिनिया** यांनीं पाहिलें होतें. त्यांनीं मौजेनें त्या टेंकडीवर एक वेळू पुरला होता. मी दृष्टीस पडलों ह्मणजे जसें काय इशाऱ्याकरितां ह्मणून तीं त्याच्या

शेंड्यास आपला लहानसा रुमाल बांधीत. हें पाहून माझ्या मनांत आलें कीं, या गोष्टीचें स्मारक कांहीं तरी त्या वेळूवर लिहून ठेवावें. मी प्रवास करीं, त्या वेळेस, पुतळा, थडगें, वगैरे पूर्वकाळाचें स्मारक पाहिलें म्हणजे मला मौज वाटे. परंतु एखादा खोदींव जुना लेख आढळला म्हणजे मला फारच आनंद होई. मला असें वाटे कीं, युगांचीं युगें गेलीं तरी, त्या वेळेपासून हा दगड मनुष्यवाणीनें अरण्यांत मनुष्याशीं बोलतच आहे; आणि त्यास सांगत आहे कीं, मी एकटा आहें असें तूं समजूं नको; दुसरीं मनुष्येंही याच जागीं तुजप्रमाणेंच सुखदुःखांचा अनुभव घेत होतीं; व विचार करीत होतीं. ज्या देशाचें आतां कांहीं राहिलें नाहीं अशा देशाविषयीं लेख असला तर हजारों वर्षांपूर्वींचें वृत्त तो आपणांस कळवितो. व त्यामुळें असें वाटतें कीं, तो देश अमरच आहे. कारण, त्यांतील राज्य नाहींसें झालें तरी, मनुष्याचे विचार अद्याप राहिले आहेत."

नंतर पाल आणि व्हर्जिनिया यांच्या निशाणाच्या वांशावर, मीं चाकूनें खालीं लिहिलेल्या ओळी खोदिल्या.

'बाळें तुह्मी नित्य राहतां; या वनीं'
'स्वर्गीं देवां ऐसें सुख मानूनि, मनीं'

"बाभळीचा मोठा वृक्ष होता, त्याच्या सावलींत पाल कधीं कधीं समुद्र खवळला म्हणजे लाटांची मौज पाहण्यास बसत असे. तेथें खालीं लिहिलेला लेख कोरला.

'आहेस आनंदी सदां तूं बाळ'
'वनिं प्रिया सुखें जाई तुझा काळ'

लानूरबाईच्या दरवाज्यापुढें सर्व माणसें बसत असत. तेथें,

'आहे येथें सदा सर्व शुद्ध भाव'
'पापा जेथें नाहीं तिळमात्र ठाव'

या ओळी लिहिल्या. निशाणाच्या बांबूवरचा लेख पाहून **व्हर्जिनिया** ह्मणाली; येवढें डौलदार भाषण कशास पाहिजे, त्यापेक्षां,

'उद्योगानें सदा भागवावी तन'
'असावावें शांत शुद्धभावें मन'

असें लिहावें, हेंच मला बरें वाटतें. भोंवतालच्या सर्व वस्तूंवर त्या सुखी कुटुंबांतील माणसांचा स्नेहभाव होता. साधारण वस्तूंस देखील त्यांनीं कर्णमधुर अशीं नावें दिलीं होतीं. केळी व नारिंगी लावून एक सुंदर हिरवीगार जागा केलेली होती; त्या ठिकाणीं **पाल** आणि **व्हर्जिनिया** हीं खेळत असत. त्या जाग्यास **समागम** असें नांव दिलें होतें. एक मोठा जुना वृक्ष होता; त्याच्या छायेंत बसून **लातूरबाई** व **मार्गारेट** ह्या आपल्या दुर्दैवाच्या गोष्टी सांगत असत, त्यास **अश्रुमार्जन** असें नांव दिलें होतें. विलायती वाटाणे वगैरे लावलेल्या जागा होत्या त्यांस स्वदेशसूचक, अशीं **ब्रितनी** व **नार्मंदी** नांवें दिलीं होतीं. आपल्या धनिणी-प्रमाणें, **डोमिंगो** व **मेरी** हीं वेळूच्या बेटाखालीं टोपल्या वगैरे विणीत बसत, त्या जाग्यास त्यांनीं **आफ्रिकाखंडांतील** आपल्या जन्मभूमीचीं स्मारक **आंगोला**, **फुलपान्ती** अशीं नांवें दिलीं. याप्रमाणें उभयतां कुटुंबांच्या श्रमानें तेथें त्यांच्या स्वदेशांतील वस्तु उत्पन्न होत; त्या पाहून, स्वदेशापासून फार दूर परदेशांत राहण्याच्या दुःखाचा किंचित् विसर पडून मन शांत होई. हाय हाय! तीं झाडें, तीं तळीं, ते बुरूज, माझ्या दृष्टीस पडत तेव्हां, त्यांचीं अन्वर्थ सुंदर नांवें

ऐकून मला मोठी मौज वाटे; पण आतां काय उपयोग? तीं सर्व विदीर्ण व विशीर्ण होऊन गेलीं आहेत. भूत गोष्टींचीं स्मारक अशा *ग्रीस देशांतील मैदानाप्रमाणें, त्यांपासून नष्ट वस्तूंचें स्मरण होऊन मनांत गहिंवर मात्र येतो."

"यूरोपांतील इष्टमित्रांची उदासीनता, व येथील स्थलाची आनंददायक भव्य शोभा, या गोष्टींनीं देखील लातूरबाईच्या मनांतील स्वदेशभक्ति कमी झाली नाहीं. येथील झाडांपासून त्यांस पाहिजे तीं रुचिकर फळें पुष्कळ मिळत; तरी, जेथें ती लहानाची मोठी झाली; व जेथें तिचा बाळपणचा सुखकारक काळ गेला, तेथील झाडें पाहून तिला विशेष आनंद होई."

"या खिंडींतील सर्व स्थलांत व्हर्जिनिया हिचा विश्रामबाग हें स्थल फारच सुंदर होतें. मित्रप्रेक्षण नांवाच्या टेंकाडाच्या खालच्या बाजूस लहानशी जागा आहे, तेथें झऱ्याच्या पाण्यामुळें लहानशी दलदल होऊन तिच्या भोंवतालीं उंच उंच गवत वाढलें आहे. मला कोणी हिंदुस्थानांतील नारळ दिला, तो मी मार्गारेटला दिला. प्रसूत झाली तेव्हां, पाल याच्या जन्मकाळाच्या स्मरणार्थ तिनें तो या दलदलीच्या जागीं रुजत घातला. याच हेतूनें व्हर्जिनिया हिच्या जन्माच्या वेळेस लातूरबाईनेंहीं एक नारळ लाविला. हे दोन्ही नारळ रुजून दोन सुरेख माड झाले. हेच काय ते या दोन कुटुंबांचे स्मारक कागद पत्र होते.

---

* माराथान, थर्मापली, वगैरे प्रसिद्ध जागा ग्रीसदेशांत आहेत. त्या ठिकाणीं, मोठमोठे पराक्रम ग्रीक लोकांनीं प्राचीन काळीं केले. त्यास अनुलक्षून ही उपमा दिली आहे.

एकास **पालवृक्ष**, व दुसऱ्यास **व्हर्जिनियावृक्ष** अशीं नांवें त्यांनीं ठेविलीं होतीं. त्यां मुलांप्रमाणेंच ते दोन्ही माड वाढत गेले. व त्यांप्रमाणेंच एक उंच व एक जरा सखल असे असत. बारा वर्षांनीं ते त्यांच्या झोंपड्यांपेक्षां जरा उंच झाले. त्यांचीं खोडें मोठीं होऊन, जवळ जवळ येत चाललीं. त्याच्या सांवळ्या पाणोळ्यावर लोंबत असत. त्यांची छाया पडून त्या स्थळास फारच शोभा आली होती. त्या दोन झाडांशिवाय ती जागा आपोआप झालेल्या रान झाडांनीं सुशोभित होती तशीच होती. तेथील खडक चमत्कारिक उदी रंगाचा असे; त्यावर, *"**वामाल्क**" या नावाचीं लहान लहान हिरव्या पिंवळ्या रंगाचीं झाडें असत; यामुळें त्यास फारच शोभा येई. तशींच जांबळ्या, हिरव्या रंगाचीं गोंडेदार झाडें वाऱ्यांत हेलकावत असत; त्यांचीही मोठी मौज दिसे. पलीकडे जवळच पांढऱ्या शुभ्र व लाल भडक फुलझाडांचे ताटवे लागलेले असत. त्यांचीं फुलें पोंवळ्यासारखीं उन्हांत चमकत असत. मरवा, पाच, यांसारखीं वासाचीं झाडें लाविलीं होतीं; त्यांचा चोहोंकडे सुवास चालत असे. पर्वताच्या उंच कड्यांवर मोठमोठाले वृक्ष असत; त्यांचे खांद्यांचा विस्तार खालीं लोंबत असे. तो जसा काय चित्रविचित्र हिरव्या छताच्या झालरीप्रमाणें दिसे. या शोभेस भुलून समुद्रावरचे पक्षी रात्रीस राहण्यास तेथें येत. **सूर्यास्ताची** वेळ आली म्हणजे चमत्कारिक चित्रविचित्र रंगाचे उंच उडणारे अनेक पक्षी किनाऱ्यावर दिसूं लागत. **व्हर्जिनिया** विश्रांति घेण्यास नेहेमीं या सुशोभित स्थलीं झऱ्याजवळ बसत असे. बहुतकरून ती खडका-

---

* Plants of Maiden-hair.

च्या कंगोऱ्यावर शेळ्या चरावयास सोडून, नारळीच्या झाडांखालीं बसून त्यांस पहात असे. ही जागा **व्हर्जिनिया** हिला फार आवडते असें पाहून, **पाल** यानें जवळच्या रानांतून पुष्कळ पक्ष्यांचीं घरटीं तेथें आणिलीं. तेव्हां पक्षी सहजच आपले पिलांकरितां तेथें येऊन राहूं लागले **व्हर्जिनिया** नेमलेल्या वेळीं त्यांस साळी, मका, वगैरे धान्यें खावयास घाली. **व्हर्जिनिया** दिसूं लागली ह्मणजे, लागलीच पाचेसारखे हिरवेगार राघु, पारवे, साळुंक्या, कवडे, टिटव्या, वगैरे चित्रविचित्र रंगाचे व सुन्दर पिसाऱ्याचे आणि सुस्वर गायन करणारे अनेक पक्षी कोंबडीच्या पिलांप्रमाणें एकदम **ताळव्यजनी** नदीवरील घरटीं सोडून तिच्याकडे येऊं लागत. यांचें खेळणें, दाणे टिपणें, व बागडणें, हीं पाहून **पाल** आणि **व्हर्जिनिया** यांस मोठी मौज वाटे."

"याप्रमाणें तीं गोजिरवाणीं सुंदर बाळकें आपले बाळपणचे दिवस, सत्कर्मांत व परोपकारांत घालवीत असत. कित्येक वेळां याच जागीं त्यांच्या आयांनीं त्यांस कवटाळून त्यांच्या सद्गुणांपासून आपणांस ह्मातारपणीं झालेल्या समाधानाबद्दल ईश्वराचे उपकार मानिले आहेत! यांचे सद्गुण पाहून हीं मोठ्या ऊर्जित दशेस येणार आहेत, असें पाहून त्यांस किती आनंद होत असे! किती वेळ मीं त्या खडकाचे सावलीस बसून, त्यांजबरोबर वनभोजनाची मौज अनुभविली आहे! या भोजनाकरितां, प्राण्यांची हत्या करावी लागत नसे. दुधानें भरलेले भोपळे व केळीच्या पानांवर वाढलेल्या तांदळाच्या पिठाच्या पोळ्या, आणि आंबे, नारिंगें, खजूर, डाळिंबें, अननस, वगैरे फळांनीं भरलेल्या टोपल्या नेहमीं तयार असत.

हे आमच्या जेवणांतील पदार्थ दिसण्यांत सुंदर, खाण्यास रुचकर, व शरीरास पुष्टिकारक असत."

"भोजनाच्या पदार्थांप्रमाणेंच आमचें संभाषणही सात्विक असे. पाल आपल्या च्यालू व पुढें योजलेल्या कामांच्या गोष्टी सांगत असे. आपल्या मंडळीचें कोणत्या रीतीनें सुख वाढेल, त्याच्या तजविजी तो नेहमीं करीत असे. कधीं त्याला वाटे, येथें वाट खडबडीत आहे; ह्मणजे तेथें वाट साफ करी. कधीं मंडळी बसावयाची जागाच चांगली करूं लागे; कधीं कधीं त्याला वाटे कीं, ह्या वेलींच्या मंडपाची सावली चांगली नाहीं, दुसरा तयार करावा, ह्मणजे व्हर्जिनिया हिला बरें वाटेल."

"पावसाळ्यामध्यें दोन्ही कुटुंबांचीं माणसें एकाच कुटुंबांत रहात. आणि गवताच्या हांतऱ्या व बांबूंच्या टोपल्या विणीत बसत. विळे, कोयते, कुदळ्या, खोरीं, खुरपीं, वगैरे आउतें नीट व्यवस्थेनें भिंतीशीं लाविलेलीं असत, आणि त्यांजवळच त्यांच्या श्रमांचीं फळें, ह्मणजे भाताचीं पोतीं, पेंढ्या, केळ्यांच्या पांड्या हीं ठेवलेलीं असत. घरांत पदार्थ पुष्कळ असले ह्मणजे कांहीं परी कराव्या असें वाटणें, हें मनुष्यास साहजिकच आहे. यामुळें लातूरबाई व मार्गारेट यांनीं उसांचा रस, नारिंगें, महाळुंगें, वगैरे जिनसांचीं सरबतें व पौष्टिक पांक करण्यास, व्हर्जिनिया हिला शिकविलें होतें. रात्र झाली ह्मणजे दिवा लावून, तीं एके ठिकाणींच जेवावयास बसत. जेवण झाल्यावर लातूरबाई किंवा मार्गारेट कोणीतरी गोष्टी सांगूं लागे. त्या बेटांतील राहणाऱ्या दरवडेखोरांनीं वाटसरांस लुटण्याच्या व कधीं कधीं मोठें वादळ होऊन गलबत फुटून, ओताड बेटांच्या खडकांस

लागलेल्या माणसांच्या भयंकर गोष्टी सांगत. त्या गोष्टी तीं मुलें मोठ्या उत्सुकतेनें मन लावून ऐकत; आणि अशा दुर्दैवी लोकांवर परोपकार करण्याचा प्रसंग आपणांस यावा ह्मणून, ईश्वराची मनोभावानें प्रार्थना करीत. शेवटीं तीं सकाळच्या प्रहरीं लवकर ताजींतवानीं होऊन पुनः एकमेकांस भेटण्याच्या इच्छेनें आपापल्या जागीं निजावयास जात. एखाद्या वेळेस रात्रीस झोपड्यांवर पाऊस मोठ्या सपाट्यानें धो धो पडूं लागे, व कधीं कधीं लांब खडकावर थाड् थाड् लाटा आपटत, त्यांचा आवाज ऐकूं येऊं लागे, अशा वेळेस आपणास सुरक्षित ठेविल्याबद्दल **परमेश्वराची** स्तुति करून तीं निजावयास जात."

"एखादे वेळेस **लातूरबाई** *बैबलाच्या जुन्या अथवा नव्या करारांतील मनोवेधक ऐतिहासिक चुटके वाचीत असे. श्रोत्यांस धर्मसंबंधी गोष्टींचा विचार करण्यासारखी बुद्धि नव्हती. सृष्टिक्रमाप्रमाणें वागावें, आणि **ईश्वराच्या** आज्ञेंत रहावें या दोन गोष्टींत तीं सर्व शास्त्रांचा समावेश करीत. अमुक वार सुखोपभोगाकरितां, व अमुक भक्तीकरितां, असा दिवसांचा विभाग त्यांनीं केला नव्हता. त्यांस सर्व दिवस सणासारखेच होते. सर्व **सृष्टि** हेंच त्यांचें देवालय. यांतच तीं सर्वज्ञ आणि प्राणिमात्रांस सुखदात्या **परमेश्वराची** प्रार्थना करीत. **परमेश्वराची** लीला अगाध आहे, असें मनांत आलें ह्मणजे झालेलीं सर्व दुःखें नष्ट होऊन, मनाचें सांत्वन होई, व वर्तमानस्थितींत राहण्यास धैर्य येई; आणि पुढें तोच आपलें कल्याण करील अशी आशा वाटे. संकटांत पडल्यामुळें असे स्वाभाविक विचार त्या बायांस व त्यांच्या मुलांस आपल्या

* ख्रिस्तिधर्माचें पुस्तक.

आपण सुचूं लागले. दुःखाच्या वेळेस आपणांस आश्रयदाते हेच आहेत."

"जसें एखाद्या वेळेस आकाश स्वच्छ दिसून एकाएकीं ढग येऊन, दशदिशा उदास दिसूं लागतात, त्याप्रमाणें भोळ्या शाल्यीच्या मनांत सुद्धां संसारदुःखाचा प्रवेश होऊन, तो अगदीं खिन्न होतो; त्याप्रमाणें ह्या कुटुंबांतील एखादा मनुष्याची स्थिति झाली ह्मणजे, सुखदुःख मानीव आहे, इत्यादि कोटिक्रम न करतां चार समंजस गोष्टी सांगून, त्याची मनोव्यथा इतर माणसें दूर करीत. अशा प्रसंगीं मार्गारेट आपल्या आनंदवृत्तीनें दुसऱ्याचें दुःख शमवी. लातूरबाई धर्माच्या गोष्टी सांगे. व्हर्जिनिया लाडी गोडी करून बोलूं लागे. पाल याची निष्कपट सात्विक वृत्ति पाहून, दुसऱ्याचे मनाची खिन्नता कमी होई. मेरी आणि डोमिंगो हीं सुद्धां कोणी दुःखी दृष्टीस पडलें ह्मणजे, त्यांस साहाय्य करायास जात, आणि त्याबरोबर रडूं लागत. जशीं वेली व लहान लहान झाडें वेगळीं असलीं ह्मणजे वाऱ्यानें उपटून जातात; परंतु, एकमेकांत गुंतून जाळें झालें ह्मणजे मोठें वादळ सुद्धां सहन करतात, त्याप्रमाणें या कुटुंबांची स्थिति होती."

"पाऊस, वारा, वगैरे नसला ह्मणजे तीं जंबीरवनच्या देवळांत जात. त्या देवळाचा उंच घुमट तो पलीकडे दिसत आहे. प्रार्थना झाल्यावर गोरगरीब त्यांपाशीं येत; एखादा हतभाग्य मनुष्य यांस सल्ला मसलत विचारी; एखादे वेळेस लहान मूल, 'माझी आई दुखणेकरीण आहे, तिची प्रकृति पहा,' ह्मणून सांगे. त्यांच्या जवळ नेहमीं लहान सहान दुखण्यावरील टाण्याटुण्याच्या औषधांचा बटवा असे; व त्यांचा

स्वभाव चांगला असल्यामुळें थोडेंसें काम केलें तरी, लोकांस मोठा उपकार वाटे. सर्वांपेक्षां त्यांपासून लोकांस मोठा लाभ होई, तो हा कीं, परदेशांत येऊन इष्टमित्रांस सोडून, फार दिवस राहिल्यामुळें, व रोगांनीं, एखाद्याचें मन खिन्न झालें असल्यास चार गोष्टी सांगून त्यास धैर्य देण्याच्या कामांतहीं माणसें कुशल होतीं. लातूरबाई अशा गांभीर्यानें देवाच्या गोष्टी सांगे कीं, एखाद्या रोगार्तानें त्या ऐकिल्या म्हणजे त्यास वाटे कीं, देव जसा काय आपल्यापुढें उभाच आहे. अशी कोणाची वाईट स्थिति पाहिली म्हणजे, व्हर्जिनिया डोळे पुशीत घरीं जाई; पण, परोपकार करण्याचा प्रसंग आपणास साधल्याबद्दल मनांत संतुष्ट असे. याप्रमाणें देवधर्म करून तीं परत आलीं म्हणजे एखादे वेळेस वळसा घेऊन त्या तुटलेल्या कड्याच्या वाटेनें माझ्या झोपडीकडे येत. तेथें आलीं म्हणजे आम्ही सर्व त्या ओढ्याच्या कांठीं जेवण करूं. हिंदुलोकांसारख्या या आमच्या साध्या वनभोजनांत कांहीं विशेष खुमारी यावी म्हणून मी कांहीं यूरोपांतील मिष्ट पदार्थही आणीत असें. हे ओढे येथें अगदीं लहान दिसतात, परंतु पुढें बऱ्याच मोठ्या नद्या होऊन समुद्रास मिळतात. कधीं कधीं आम्ही समुद्रकिनाऱ्यावर जाऊन यांच्या मुखांजवळ बसत असूं. जेवणाचे पदार्थ आम्ही बागेंतून आणूं. व कांहीं भर लागल्यास बंदरावरचेही घेत असूं. मखमाल, सूर्यकमल, वगैरे झाडांच्या सावलींत खडकावर बसलों म्हणजे पायथ्याशीं मोठमोठ्या लाटा धाड्धाड् आपटत; त्यांचा आवाज ऐकूं येई. व एखाद्या वेळेस समुद्रकांठीं राहणाऱ्या पक्ष्यांचा किलबिल शब्दही ऐकूं येई."

"जेवण झाल्यावर तीं दोन्ही मुलें गात असत, व एखादा

वेळेस नाचूं लागत. व्हर्जिनिया गाणीं, ओव्या वगैरे ह्मणे. त्यांत वनांत राहून गुरेंढोरें बाळगून, शेतभात पिकवून निर्वाह करणाऱ्या लोकांचें सुख, व असें सुख टाकून लोभानें जिवावरचीं संकटें सोसून, भयंकर समुद्रांत जलपर्यटन करणाऱ्या लोकांचें दुःख, ह्या गोष्टी वर्णिलेल्या असत. कधीं कधीं तीं दोघें शिद्दी लोकांच्या चालीप्रमाणें नाचूं लागत. शिद्दी लोकांचा नाच मनोवेधक असून, अगदीं साधा असल्यामुळें फार सुलभ आहे. तो यूरोपियन लोकांचीं मुलें सहज शिकतात. असला नाच बहुतकरून सर्व देशांतील लोकांस माहीत असतो. आई इतिहास वाचीत असतां कित्येक मनोवेधक गोष्टी व्हर्जिनिया हिनें ऐकिल्या होत्या; त्या ती फार उत्तम तऱ्हेनें प्रत्यक्ष करून दाखवी. डोमिंगो ढोलकें वाजवीत असे. एका पुस्तकामध्यें खालीं लिहिलेली गोष्ट होती. 'एका गृहस्थाची मुलगी ओढ्यावर पाणी आणण्यास गेली, तिला तेथें दोन धनगरांनीं दटावून दांडगेपणानें परत जाण्यास सांगितलें. हें ऐकून तेथें एक तरुण गृहस्थ येऊन, त्यानें त्या धनगरांस ठोकिलें. आणि घडा भरून बाईच्या डोक्यावर ठेविला. हें पाहून त्या मुलीच्या बापानें त्या गृहस्थासच आपली मुलगी दिली.' ह्या गोष्टीचें सोंग हुबेहुब साधत असे. टामटूम वाजतांक्षणींच व्हर्जिनिया डोक्यावर घडा घेऊन पुढें येई. चोहींकडे हिरवेंगार गवत असल्यामुळें जमीन रंगभूमीसारखीच दिसे. तेथें आल्यावर ती भीतभीत ओढ्यावर पाणी आणावयास जाऊं लागे. डोमिंगो आणि मेरी धनगरांचें सोंग घेऊन पुढें येत आणि दांडगाई करून निष्ठुरपणानें, पाणी न घेऊं देतां तिला परत लावीत. हें पाहतांच पाल तिला साहाय्य करण्यास

येई. आणि धनगरांस मारून, परत लावून, घडा भरून **व्हर्जिनिया** हिच्या डोक्यावर देई. आणि तांबडीं फुलें तिच्या मस्तकावर ठेवीं, त्यामुळें ती फारच सुंदर दिसूं लागे. मीही त्यांच्या खेळांत मुलीच्या बापाचें सोंग घेऊन आपली मुलगी **पाल** यास देई."

"दुसऱ्या एका गोष्टीचा तीं खेळ करीत.' ती अशी होती कीं, एक बाई आपल्या नवऱ्याबरोबर पुष्कळ दिवस परदेशांत होती. दुर्दैवानें तेथें तिचा पति मरण पावला. नंतर ती आपल्या स्वदेशांत आली. परंतु तिला कोणी ओळखीचें सांपडेना. तेव्हां मी कोणत्या परदेशांत आलें कोणजाणें, असें तिला वाटूं लागलें. ती, एका शेतांत कोणी धान्य कापीत होतीं तेथें गेली, आणि कांहीं दाणे टिपूं लागली. तेव्हां मुख्य शेतकऱ्यानें तिची हकीकत विचारिली. तेव्हां तिनें भिऊन अडखळत अडखळत आपलें वर्तमान सांगितलें. तें ऐकून त्यास तिचा मोठा कळवळा आला. त्यानें कणसांनीं तिची ओंटी भरली आणि त्याकाळच्या देशचालीप्रमाणें आपल्या बरोबर तिला घेऊन गांवांतील वृद्ध मनुष्यांकडे जाऊन, मी हिला वरणार म्हणून सांगितलें. **व्हर्जिनिया** त्या विधवा बाईचें सोंग घेई; **डामिंगो** आणि **मेरी** शेत कापूं लागत; **व्हर्जिनिया** कणसें वेंचूं लागली म्हणजे **पाल** मोठ्या गांभीर्यानें तूं कोण वगैरे विचारी. तिनें भीत भीत अडखळत उत्तर दिल्यावर **पाल** कणसांनीं तिची ओंटी भरी. आणि तिला घेऊन आमच्यापुढें येऊन, हिजबरोबर लग्न करण्याचा माझा उद्देश आहे असें सांगे. या खेळाच्या वेळेस **लातूरबाईला** मोठा गहिंवर येई. आपल्या इष्टमित्रांनीं आपणांस टाकिलें, एकाएकीं वैधव्य प्राप्त झालें, आणि-

रेटनें आपलें आगतस्वागत उत्तम प्रकारें केलें, या सर्व गोष्टींचें एकदम स्मरण होऊन ती ढळढळां रडूं लागे. परंतु आतां हीं मुलें नवराबायको होऊन, आनंदांत काळ घालवितील अशी आशा वाटून, जरा स्वस्थ होई. अशा प्रसंगीं सर्व श्रोत्यांचीं अंतःकरणें करुणरसानें सद्गदित होऊन, ते ढळढळां अश्रु ढाळूं लागत."

"या गोष्टी सिरिया व पालस्तैन या प्रान्तांच्या इतिहासांतील होत्या. त्यांचीं नाटकें इतकीं हुबेहुब वाटत कीं, जर तुह्मी तीं पहावयास असतां, तर आपण त्या प्रांतांतच आहों असें तुह्मांस वाटलें असतें. आह्मांजवळ रंगभूमि, उजेड, यांची शोभा कमी होती असें नाहीं. हे खेळ करण्यास आह्मी रानांत एका गर्द झाडींत बसत असूं. तेथें मंडपासारखी छाया पडत असे. भोंवतालीं झाडींत बेण्यास वाटा होत्या, तेथें झाडांच्या खांद्या आडव्या जाऊन, सुंदर कमानी झाल्या होत्या. त्यामुळें त्यांस मंडपाच्या खिडक्यांसारखी शोभा येत असे. दोन प्रहर उलटल्यावर, सूर्य क्षितिजाकडे जाऊं लागला ह्मणजे चोंहींकडे झाडांच्या सावलींत लांबलांब उन्हाचे कवडसे पडले ह्मणजे, लांबच लांब प्रकाशस्तंभ दिसत, त्यामुळें, फारच उत्तम शोभा येत असे. एखादे वेळेस झाडींतून सूर्यबिंब पूर्ण दिसूं लागलें ह्मणजे मोठी मौज दिसे. कित्येक झाडांचीं पानें हिरवींगार पाचेसारखीं चमकत. कित्येकांवर संध्याकाळच्या कोंवळ्या उन्हाची केशरी झांक पडली ह्मणजे, नानातऱ्हेच्या चित्रविचित्र रंगांची शोभा येई. झाडांच्या शेवाळलेल्या उदी रंगाच्या खोडांवर किरणांची छटा पडली ह्मणजे, जसे काय हे पंचरसी धातूचे चकचकीत खांबच नाटकगृहास लाविले आहेत असें दिसे. साव-

लीमुळें संध्याकाळ झालीसें वाटून, पक्षी झाडांवर आपापल्या घरट्यांतून जात; त्यांस ही शोभा एकाएकीं पाहून, **सूर्योदय** झालासा वाटून, किलबिल किलबिल शब्द करून जशी काय **सूर्याची** स्तुति करूं लागत. अशा गमती करितां करितांच एकाएकीं रात्र होई. परंतु हवा स्वच्छ असून गारवा नसला ह्मणजे आह्मी तेथेंच निजत असूं. आह्मांस चोराचिरट्याचें भय अगदीं नसे. दुसऱ्या दिवशीं आपापल्या घरीं गेल्यावर पहावें, तों घरांतलें सामान जसें होतें तसेंच असे. त्या वेळेस या बेटांत व्यापार वगैरे विशेष नसे. त्या वेळेस एथें इतका सांवनगा व परस्परांवर विश्वास असे कीं, कित्येक घरांच्या दारांस कड्या देखील नव्हत्या. कुलूप तर कोणाला माहीत देखील नव्हतें."

"**पाल** आणि **व्हर्जिनिया** यांजवळ घड्याळ, पंचांग रोजखर्डा, इतिहास अथवा शास्त्राचें पुस्तक वगैरे कांहींएक नव्हतें. कालमान व आयुष्यांतील भिन्न भिन्न अवस्था हीं त्यांस सृष्ट पदार्थांवरूनच कळत असत. दिवस किती आला हें त्यांस झाडांच्या सावलीवरूनच कळे; फुलांच्या व फळांच्या भरावरून ऋतुभेद कळे; व शेतांच्या पिकावरून किती वर्षें झालीं हें त्यांस सांगतां येई. या वर सांगितलेल्या साधेपणानें त्यांचें संभाषण फारच मौजेचें दिसे. **व्हर्जिनिया** ह्मणे, केळींच्या सावल्या बुडाशीं आल्या, जेवणाची वेळ झाली. चिंचेचीं पानें मिटूं लागलीं, संध्याकाळ झाली. 'तूं आमच्या घरीं कधीं येशील?' असें खेळगड्यांनीं विचारिलें ह्मणजे ती ह्मणे, 'गुऱ्हाळ लागलें ह्मणजे येईन.' सोबत्यांनीं ह्मणावें 'त्या वेळेस तूं आलीस तर मोठी मौज होईल.' 'तुला आणि **पाल** यास कितवें वर्ष लागलें?' असें कोणीं विचारिलें

ह्मणजे ती सांगे, 'ओढ्यावरच्या मोठ्या माडा इतकीं दादाला वर्षे आहेत, आणि मला धाकट्या नारळी इतकीं आहेत. माझ्या जन्मापासून बारा वेळ आंबे लागले, व नारिंगीस चोविसदां फुलें आलीं. झाडें हीं त्यांचीं भांवडेंच आहेत, असें वाटे. आपल्यां आयांच्या गोष्टींशिवाय त्यांस इतिहासांतील गोष्टी माहीत नव्हत्या. झाडांस फळें फुलें येणें हें काय तें त्यांचें ज्योतिष; परोपकार करणें व ईश्वर ठेवील त्याप्रमाणें रहाणें, हें तत्वज्ञान; यांशिवाय त्यांस कांहीं माहीत नव्हतें."

"याप्रमाणें तीं सात्विक मुलें बरींच मोठीं झालीं. काळजीनें त्यांचें अन्तःकरण करपलें नव्हतें. अधाशीपणानें त्यांची प्रकृति बिघडली नव्हती. प्रीति, सात्विकपणा, भक्ति, यांनीं त्यांचा अंतरात्मा भरलेला असे. त्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर, बोलण्याचालण्यांत, बसण्याउठण्यांत, बुद्धिमान्पणा दिसत असे. तीं उभयतां या तारुण्यविकासाच्या वेळेस फारच सुंदर दिसत असत; आणि बहिणभांवडांप्रमाणें सात्विकपणानें एकमेकांशीं संभाषण करीत. **व्हर्जिनिया** सौम्य, नम्र, आणि भाविक, होती. **पाल** मोठा गम्भीर दिसे; तरी लहान मुलाप्रमाणें अगदीं साधा असे."

"एखाद्या वेळेस **पाल** काम करून आल्यावर थकून एकटा **व्हर्जिनिया** हिजपाशीं बसला ह्मणजे तिला ह्मणे 'मी थकलों असलों तरी, तुला पाहिल्याबरोबर माझे सर्व श्रम नाहींतसे होतात. डोंगराच्या शिखरावरून तुला खिंडीमध्यें पाहिलें ह्मणजे, विकास पावणाऱ्या गुलाबाच्या फुलाप्रमाणें तूं सुंदर दिसतेस. घरीं आईकडे जाऊं लागलीस ह्मणजें, पिलांकडे त्वरेनें जाणाऱ्या पक्ष्यांपेक्षां तुझी फार मौज वाटते.

झाडांतून तूं दिसत नाहींशी झालीस तरी तुझ्या अंगावरून आलेला वारा, तूं जेथें बसली होतीस ती जागा, यांपासूनच मला कांहीं एक प्रकारचा आनंद होतो. याचें कारण सुद्धां मला कळत नाहीं. तुझ्याजवळ आलों ह्मणजे माझें सर्व नखशिखांत शरीर आनंदानें प्रफुल्लित होतें. तुझ्या डोळ्यांपेक्षां शरदृतूंतील निर्मेघ निळ्या आकाशाची सुद्धां शोभा उणी आहे. तुझ्या मंजुळ भाषणापुढें कोकिळेच्या मधुर ध्वनीची कांहींच मातबरी नाहीं. तुझ्या अंगाला नुस्तें बोट लाविलें तरी माझ्या सर्वांगास आनंदानें कम्प सुटतो. त्या दिवशीं आपण त्रिकूट डोंगराजवळ नदींतून दगडांवरून गेलों, त्याची तुला आठवण आहे काय? नदीच्या कांठीं पोंहोंचण्यापूर्वींच मी अगदीं दमून गेलों होतों. परंतु तुला खांद्यावर घेतांक्षणींच मला पक्ष्यांप्रमाणें पंख फुटल्यासारखें वाटलें. सांग मला कोणत्या मन्त्रानें त्वां इतकें मोहित करून टाकिलें आहे? केवळ तूं आपल्या शहाणपणानेंच काय? असें ह्मणावें तर आपल्या आया आपणा दोघांपेक्षांही अधिक शहाण्या आहेत. तुझ्या लाडीगोडीनें व गोंजारण्यानें काय? आपल्या आया तर मला मांडीवर घेऊन, तुझ्यापेक्षां पुष्कळ वेळां माझे मुके घेतात. व मला कंवटाळून धरितात." मला वाटतें कीं, केवळ तुझ्या चांगुलपणानेंच मी इतका भुलून गेलों आहें. त्या गरीब भटकणाऱ्या दासीस क्षमा मागण्याकरितां तूं अनवाणी काळनदीवर गेलीस, तें, मी कधीं विसरणार नाहीं. घे, माझे लाडके ताई, ही नारिंगाची फुललेली डाहाळी. मीं ही रानांतून तोडून आणिली आहे. ही रात्रीस आपल्या उशाशीं ठेव, ही घे मधाची पोळी, खा यांतला मध, ही तुजकरितां मीं खडकावर चढून काढिली!

आहे. पण ये आधीं माझ्या मांडीवर बैस. ह्मणजे मी स्वस्थ होईन.' ह्या गोष्टी त्यानेंच मला शेंकडों वेळां सांगितल्या होत्या."

"असें भाषण ऐकून व्हर्जिनिया ह्मणे 'माझ्या लाडक्या दादा, प्रातःकाळीं सूर्योदय होऊन गिरिशिखरांवरील किरणांचें तेज पाहून, जो आनंद होतो त्यापेक्षांही तुला पाहिलें ह्मणजे, मला अधिक आनंद होतो. मला माझी आई आवडते व तुझीही आवडते. पण त्या तुझे लाड करितात हें पाहून, त्यांविषयीं माझी प्रीति फारच वृद्धिंगत होते. त्या माझे मुके घेऊं लागल्या ह्मणजे जो मला आनंद होतो, त्यापेक्षांही तुझे मुके घेऊं लागल्या ह्मणजे माझ्या अंतःकरणास फार सुख होतें. तूं मला विचारितोस कीं, मी तुजवर प्रीति कां करितें. एकेठिकाणीं लहानाचीं मोठीं झालेलीं सर्व मुलें एकमेकांवर कां प्रीति करितात? पहा, आपल्या पक्ष्यांकडे. एका घरट्यांत वाढलेलीं पांखरें आह्मांप्रमाणेंच एकमेकांवर प्रीति करितात. आह्मांप्रमाणेंच तीं नेहमीं एकेठिकाणीं असतात. ऐक, कशीं तीं या झाडावरून त्या झाडावर एकमेकांस उत्तर देत आहेत. यांप्रमाणें, डोंगरावरून तुझ्या मुरलीचा मधुर ध्वनि माझ्या कानीं पडला ह्मणजे, मीही दरींतून तोच सूर वाजवूं लागतें. खरोखर ह्मटलें तर त्या दिवशीं तूं मजकरितां त्या दासीच्या धन्याशीं लढण्यास तयार झालास; त्या वेळेपासून तूं मला फारच आवडूं लागलास. तेव्हांपासून मीं आपल्या मनांत कितीदां ह्मटलें आहे' कीं, 'माझा दादा किती दयाळू आहे! तो बरोबर नसता तर मी त्या दिवशीं भयानें मेलेंच असतें. मी आपल्या व तुझ्या आईकरितां, तुजकरितां व आपल्या गरीब चा-

करांकरितां रोज देवाची प्रार्थना करितें. परंतु तुझें नांव घेतांक्षणींच, माझ्या अन्तःकरणांतील भक्तीचा आविर्भाव वाढूं लागतो; तुला तिळमात्र दुःख होऊंनये ह्मणून मी मनोभावानें ईश्वराची विनवणी करितें. मजकरितां फुलें, फळें, आणण्याकरितां कशाला तूं इतका लांब जातोस; आणि उंचावर चढतोस! तुला किती तरी श्रम झाले आहेत!' असें बोलून ती हातांतील पांढऱ्या रूमालानें त्याच्या कपाळावरील घाम पुसून टाकीत असे."

"कांहीं दिवस लोटल्यावर व्हर्जिनिया हिचें मन आधींनीं व्यग्र झाल्यासारखें दिसूं लागलें. तिच्या छानदार काळ्या डोळ्यांचें पाणीं उतरूं लागलें; गालांची टवटवी मोडूं लागली; सर्व शरीर म्लान दिसूं लागलें; प्रसन्नता व हास्य हीं तर तिच्या मुखावरून नाहींतशींच झालीं. कांहीं कारण नसतां एकाएकीं तिनें आनंदी झाल्यासारखें करावें व एकाएकीं खिन्न व्हावें. आपले लहानपणचे खेळ तिनें सर्व टाकून दिले. घरांतील लहानसहान कामें करण्याचें तिनें सोडून दिलें. घरांतल्या माणसांपासून दूर जाऊन, झाडींत एकांतस्थलीं ती स्वस्थपणा येण्याकरितां बसूं लागली. परंतु कोठेंही तिला चैन पडेना. एखादे वेळेस पाल दृष्टीस पडला ह्मणजे लाडीगोडीनें त्याकडे जाऊं लागे. परंतु जवळ पोंहोंचल्यावर कांहीं बोलणार तोंच तिची बोबडी वळे. तिच्या फिकया पडलेल्या गालांवर लज्जेची छाया दिसूं लागली. पाल याजकडे तिच्यानें रेखून पाहवेना. पाल तिला ह्मणे 'गवत उगवून खडक हिरवेगार दिसूं लागले, तूं येऊं लागलीस ह्मणजे आपले पक्षी गाऊं लागतात; आपल्या भोंवतालीं सर्व वस्तु आनंदित दिसतात; पण, तूं मात्र

दुःखी आहेस. पोटाशीं धरून तिचें सांत्वन करण्यास तो यत्न करी; परंतु ती लागलीच तोंड चुकवून कांपत कांपत आईकडे धांवत जाई. पाल याच्या गोंजारण्यानें तिच्या खिन्न अंतःकरणांत मोठाच गहिंवर येई. पाल यास या नव्या चमत्कारिक लहरींचें कांहींच कारण कळेना.

"उष्णकटिबंधांत एकादे वेळेस उन्हाळा कडक होऊन सर्व पदार्थांचा सत्यनाश होऊन जातो. तसला उन्हाळा या बेटांत होऊं लागला. दिसेंबर महिना संपून मकरराशीस सूर्य गेला ह्मणजे, तीन वार पर्यंत मोरिशिअस बेटांत सूर्याचे किरण लम्बरूपानें पडतात. दक्षिण वारा नेहमीं वाहत असतो, तो या वेळेस बंद होतो. रस्त्यांतून मोठमोठ्या उंच वाहुटळींचे स्तंभ आकाशांत गरगर फिरूं लागतात. सर्व ठिकाणीं जमिनीला मोठमोठ्या भेगी पडतात. गवताची जळून खाक होते, डोंगरांतून कढत कढत वाफा निघूं लागतात; ओढे, नद्या, बहुतकरून वाळून जातात. संध्याकाळच्या वेळेस मैदानांतून ऊनऊन वाफा निघूं लागल्यामुळें आग लागली असें वाटूं लागतें. वातावरण उष्ण झाल्यामुळें रात्रीस सुद्धां गार वारा येत नाहीं. चन्द्र सुद्धां रक्तासारखा लाल दिसून धुक्यामुळें, क्षितिजाजवळ उदयाच्या वेळेस विलक्षण भव्य दिसतो. डोंगरांच्या पायथ्यांजवळ थकल्यामुळें मानाटाकलेलीं गुरें वाऱ्याकरितां, आकाशाकडे तोंडें करून धापा टाकूं लागतात, आणि दुःखाच्या हंबरड्यांनीं दरी गाजवून टाकितात. त्यांचा गुराखी सुद्धां गारवा यावा ह्मणून जमिनीवर पडतो. परंतु, उन्हानें जमीन सुद्धां होरपळलेली असते. हवेंत अगोदरच दम कोंडतो व त्यांत आणखी मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या रक्तानें,

तृषा शांत करण्यास पाहणारे जीव जंतू घों घों शब्द करूं लागतात."

"अशा उन्हाळ्याच्या एका रात्रीस **व्हर्जिनिया** हिला अगदीं चैन पडेनासें झालें. बसे, उठे, निजे, परंतु कोणत्याही तऱ्हेनें आराम होईना. शेवटीं उठून चांदण्याच्या उजेडानें पाणवठ्याकडे जाऊं लागली. इतका उन्हाळा होता तरी तेथें काळ्या खडकावरून रुप्याच्या सांखळीसारखे एक दोन झरे वाहत होते. त्यांकडे पाहून, तिला अंमळ बरें वाटलें. नंतर ती पाण्यांत जाऊन उभी राहिली. तेव्हां सर्वांग गार होऊन ताजीतवानी झाली. तेव्हां हजारों आनंदाचे तरंग तिच्या मनांत उठूं लागले.

"लहानपणीं तिची आई आणि **मार्गारेट** ह्या दोघी, तिला आणि **पाल** याला एके ठिकाणीं बसवून, या जागीं आंघोळ घालीत असत. नंतर **पाल** यानें ही जागा केवळ तिजकरितांच तयार केली. पाणवठा खोल खणून त्याच्या तळाखालीं वाळू घातली, आणि भोंवतालीं सुवासिक झाडें लाविलीं. तिच्या आणि तिच्या भावाच्या जन्मकाळीं लाविलेलीं नारळींचीं झाडें पाण्यांत प्रतिबिंबित झालेलीं तिनें पाहिलीं. तिच्या आंगावर त्यांची छाया पडली होती. वरतीं पाहिलें तेव्हां, त्यांच्या हिरव्यागार सांवळ्या व नारळ एकमेकांत गुरपटलेले तिच्या दृष्टीस पडले. तिला वाटलें कीं, **पाल** याचें मित्रत्व या सुगन्धापेक्षां मधुर, या झऱ्याच्या पाण्यापेक्षां स्वच्छ, या नारळीच्या झाडापेक्षां बळकट होय. असें मनांत येऊन तिनें मोठा सुस्कारा टाकिला. एवढ्या रात्रीस चोंहींकडे सामसूम असून मी एकीकडे रानांत एकटी आलें असें मनांत येऊन, ती अस्वस्थ झाली. एकाएकीं

भयानें दचकून तिनें आईकडे धांव मारिली. ती जागा तिला मोठी भयंकर वाटली. तें पाणी ग्रीष्म ऋतूंतील सूर्यकिरणांपेक्षांही तिला कढत लागूं लागलें. आईकडे जाऊन मी स्वस्थ होईन असें तिला वाटलें. आपली मनोव्यथा आईपाशीं सांगावी असें वाटून, ती पुनःपुन्हा आईचा हात धरी. पाल याचें नांव कंठापर्यंत ती आणी, परंतु अंतःकरण दुःखित असल्यामुळें तिच्यानें ओंठांतून बाहेर काढवेना. अशा वेळेस ती आईच्या हृदयावर मस्तक ठेवून ढळढळां रडूं लागे, आणि आईचें सर्वांग अश्रूंनीं भिजवून टाकी.

"लातूरबाईला तिच्या मनोव्यथेचें कारण आपोआप कळलें होतें. परंतु, त्याविषयीं तिजपाशीं कांहीं बोलावें हें तिला योग्य वाटलें नाहीं. ती ह्मणाली, 'मुली, ईश्वराची प्रार्थना कर. त्याच्या इच्छामात्रेंकरून मानवांस आरोग्य व आयुष्य प्राप्त होतें. तूं स्वर्गसुखास पात्र आहेस किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां, तो तुझी परीक्षा करीत आहे. केवळ सदाचरणानें वागण्याकरितां त्यानें आह्मांस उत्पन्न केलें आहे, हें लक्षांत ठेव.' "

"अतिशय उष्णता असल्यामुळें समुद्रांतून वाफा निघून सर्व बेटभर पसरल्यामुळें वर छतच लाविलें आहे काय, असें दिसूं लागलें. पर्वतांच्या शिखरांवर या वाफांची गर्दी झाल्यानें, तेथें केवळ धुक्यासारखेंच दिसूं लागलें. मधून मधून विस्तवाच्या ठिणग्या व किटाळें निघत. नंतर लागलीच कांहीं वेळानें मोठी थोरली मेघगर्जना होऊन, रानें, मैदानें, दऱ्या, हीं सर्व दणाणून गेलीं. पाण्याच्या धबधब्याप्रमाणें मोठ्या झपाट्यानें पाऊस पडूं लागला; डोंगरांच्या कड्यां-

वरून फेंसाळलेले ओढे धो, धो, धो, खालीं वाहूं लागले' दरीचा तळ समुद्राप्रमाणें दिसूं लागला. भोंवतालीं पाणीं जमल्यामुळें झोंपड्या लहानशा बेटांसारख्या दिसत. दरीच्या तोंडाजवळचे खडक पाणीं अडविण्याकरितां, घातलेल्या बांधाप्रमाणें दिसत; त्यांच्या पलीकडून खळखळ पाणीं वहात असे; त्यांतून माती, झाडें, धोंडे भराभर वाहून जात."

"या प्रसंगीं लाटूरबाईच्या घरांत बसून सर्व माणसें देवाची प्रार्थना करीत होतीं. वाऱ्याच्या भयंकर सोसाट्यानें झोंपड्यांचीं छपरें तटातट फाटून जात; वीज तर इतकी वारंवार चमकत असे कीं, दारें खिडक्या, घट्ट लाविल्या होत्या तरी, सतत उजेडामुळें बाहेरच्या सर्व वस्तु स्पष्ट दिसत. डॉमिंगोला बरोबर घेऊन वादळाचा वेग न जुमानितां मोठ्या धैर्यानें पाल एका झोपडींतून दुसऱ्या झोपडींत खेपा घाली. 'येथें कुडाला धिरा दे, तेथें मेढ नीट कर,' असें तो करीत असे; आणि आतां लवकरच वादळ नाहींसें होईल असें सांगून, सर्वांचें भय कमी करण्यास प्रयत्न करी. याप्रमाणें झाल्यावर संध्याकाळच्या वेळेस पाऊस बंद झाला. वारा नेहमींप्रमाणें दक्षिणेकडे वाहूं लागला. तुफानाच्या वेळेचे मोठमोठे ढग होते ते, ईशान्येकडे जाऊन नाहींतसे होऊं चालले. आणि अस्तमानाच्या वेळेस सूर्याचें बिंब क्षितिजाजवळ चकचकीत दिसूं लागलें."

वादळ गेल्यावर प्रथम आपला विश्रामबाग जाऊन पहावा, अशी व्हर्जिनिया हिला इच्छा झाली. पाल भीत भीत जवळ गेला आणि मी तुला सोबत येतों असें ह्मणाला. 'ये' असें तिनें हंसून ह्मटल्यावर तीं उभतां झोपडींतून बाहेर गेलीं. आकाश स्वच्छ होऊन हवा चांगली झाली होती.

इकडे तिकडे डोंगरावरून लहानसहान, पाण्याच्या जोरानें फेंसाळलेले ओहोळ वाहून गेले होते. त्यांतून पांढऱ्या वाफा निघत होत्या. पाण्याच्या जोरानें जमीन झुरून जिकडे तिकडे खळग्या पडून सर्व बाग नासून गेली. फळझाडांच्या मुळ्या बाहेर पडल्या. कुरणें वाळूच्या ढिगांनीं आच्छादित झालीं. व्हर्जिनिया हिच्या आंघोळीचा हौद भरून गेला. दोन्ही नारळींचीं झाडें मात्र उभीं असून टवटवीत दिसत होतीं. पण, त्यांच्या भोंवतालीं गवत, वेलींचे मंडप-पक्षी वगैरे कांहीं राहिलें नाहीं. एक दोन कोकीळपक्षी मात्र जवळच्या खडकावर, आपलीं पिलें नाहींतशीं झाल्या-मुळें करुणस्वरानें शोक करीत होते.

"हा सर्व विध्वंस पाहून व्हर्जिनिया पाल यास ह्मणाली, 'त्वां पक्षी येथें आणिले आणि वादळानें मारून टाकिले. त्वां ही बाग लाविली. परंतु, आतां तींत कांहीं उरलें नाहीं. यावरून असें दिसतें कीं, पृथ्वीवरील सर्व वस्तु नश्वर आहेत, स्वर्ग मात्र निर्विकार आहे.' पाल ह्मणाला 'काय करूं, स्वर्गांतली एखादी वस्तु मजजवळ असती तर मीं तुला दिली असती. पण, मजजवळ ऐहिक देखील कांहीं वस्तु नाहीं.' व्हर्जिनिया किंचित् लज्जित होऊन ह्मणाली, 'कां तुझ्याजवळ सेन्ट्पालचें* चित्र आहे.' हे शब्द बोलत आहे तोंच धांव मारून तो तें आणण्यास आपल्या आईच्या झोपडीकडे गेला. या चित्रावर पाल साधूची लहानशी प्रतिमा काढिली होती. मार्गारिट मोठी भक्तिमान् असे; तिनें लहानपणीं हें चित्र आपल्या गळ्यांत बांधिलें होतें. पुढे प्रसत

* सेन्ट् म्हणजे साधु. सेंटपाल ह्मणून एक मोठा ख्रिस्ती साधु होता. रोमनक्याथलिक लोक त्याची पूजा करितात.

झाल्यावर मुलाच्या गळ्यांत घातलें.' जगांत कोणी मित्र नसल्यामुळें, गर्भारपणीं ती या परोपकारी साधूच्या प्रतिमेचें चिन्तन करीत असे; यामुळें तिला असें वाटे कीं, आपल्या मुलामध्यें या साधूचें कांहीं तरी सादृश्य आलें असावें. या करितांच तिनें मुलाचें नांव **पाल** ठेवून त्या साधूला आपला मुलगा अर्पण केला.' **व्हर्जिनिया, पाल** याच्या हातांतून हें चित्र घेऊन गहिंवरानें ह्मणाली, 'दादा, माझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत मी हें सोडणार नाहीं; आणि जगांत जी एक वस्तु तुजपाशीं होती ती त्वां मला दिली; हेंही मी कधीं विसरणार नाहीं. हें मित्रत्वाचें भाषण ऐकून, व ही आकस्मिक लाडीगोडी व कोमलपणा पाहून, तिला आलिंगन देण्याचें **पाल** यानें मनांत आणिलें, तोंच ती पाखरासारखी भरदिशीं उडी मारून पळून गेली. **पाल** यास मोठें आश्चर्य वाटलें." अशा विलक्षण वर्तनाचें कारण त्यास कांहींच कळेना."

"कांहीं दिवसांनीं **मार्गारेट लानूरबाईस** ह्मणाली, 'लग्न लावून आपल्या मुलांचें ऐक्य दृढ कां करूं नये? तीं परस्परांवर फार प्रीति करितात.' **लानूरबाई** ह्मणाली, 'तीं फार लहान आहेत; व फार गरीब. ज्यांचें पालनपोषण करण्यास सामर्थ्य नाहीं अशीं दुर्दैवी मुलें **व्हर्जिनिया** हिच्या उदरीं जन्मल्यास आपणांस केवढें दुःख होणार आहे! तुझा शिद्दी **डोमिंगो** हा फार ह्मातारा झाला आहे. त्याच्यानें आतां श्रम होणें कठीण, व **मेरी** अगदीं अशक्त आहे. मजविषयीं ह्मणशील तर या पंधरा वर्षांत मी फार अशक्त झालें. उष्ण हवेंत जरा लवकर येते. त्यांत आणखीं दुःखाचा भार असल्यावर मग काय विचारावें! आमची सर्व आशा काय

एकट्या पालावर आहे. त्याला अंमळ मोठा होऊं दे. आमचें पालन करण्यासारखी त्यास शक्ति आली पाहिजे. हल्लीं आह्मी, आला दिवस कसातरी हातानें लोटितों. हें तुला माहीत आहेच; परंतु, कांहीं दिवस व्यापाराकरितां पाल त्यास हिंदुस्थानाकडे पाठविल्यास गुलाम विकत घेण्यापुरते त्यास पैसे मिळतील. तो परत आल्यावर आपण व्हर्जिनिया बरोबर त्याचें लग्न लावूं. मला पक्कें माहीत आहे कीं, तुझ्या मुलाप्रमाणें जगांतील कोणत्याही मनुष्यापासून तिला सुख व्हावयाचें नाहीं. आपण याविषयीं आपल्या शेजाऱ्यास विचारूं.' "

"वर सांगितल्याप्रमाणें मला त्यांनीं सल्ला विचारला. माझेंही त्याप्रमाणेंच मत पडलें. मीं त्यांस सांगितलें, हिंदी-महासागर शांत आहे. चांगली वेळ पाहून निघालें असतां बहुतकरून सफर करण्यास दीड महिन्यापेक्षां जास्त वेळ लागत नाहीं. माझ्या शेजारीं व्यापारी आहेत, त्यांची व पाल याची गांठ घालून देईन. त्या सर्वांस पाल फार आवडतो. कच्चा कापूस, एबनी, राळ, वगैरे कांहीं पदार्थ त्याच्या बरोबर दिले तर, तिकडे हे सर्व पदार्थ चांगल्या दरानें खपतील. आपणांस तर त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. यंत्रें नसल्यामुळें आपणांस कापसाच्या सरक्या काढितां येत नाहींत. एबनीचें तर आपण सर्पण करितों. राळ आपणांस रानांत हवी तितकी सांपडते. मानशुअर लाबरदोने यांपासूनही सफर करण्यास परवानगी आणण्याचें मीं कबूल केलें. परंतु, ही गोष्ट पूर्वी पाल यास सांगावी असा म्यां विचार केला. मोठ्या मनुष्याप्रमाणें जेव्हां त्या मुलानें मला शहाणपणानें उत्तर दिलें तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटलें. तो ह्मणाला,

'या अनिश्चित द्रव्यसंपादनांच्या मार्गांकरितां आपलीं माणसें सोडून जाण्यास मला कां सांगतां? जमिनीची लागवड करण्यापेक्षां दुसरा कोणताही व्यापार अधिक फायद्याचा आहे काय? यापासून कधीं कधीं पन्नासपट, शंभरपट नफा होतो. आह्मांस व्यापार करण्याची इच्छाच असेल तर आपल्या येथील माल शहरांत नेऊन विकावा ह्मणजे झालें. हिंदुस्थानाकडेच गेलें पाहिजे असें नाहीं. आमच्या आया मला सांगतात कीं, **डोमिंगो** ह्मातारपणानें अशक्त झाला. पण मी सशक्त नाहीं काय? मला दररोज अधिक बळ येत आहे. माझ्या पाठीमागें एखादें संकट आलें तर! सर्वांपेक्षां ही पंचाईत कीं, **व्हर्जिनिया** आधींच आजारी आहे. तिला कांहीं बरें वाईट झालें ह्मणजे कसें होईल? छेः मी कधींही त्यांस सोडून जाण्याचें मनांत आणणार नाहीं.' "

"हें उत्तर ऐकून मी अगदीं घोंटाळ्यांत पडलों. कारण, **व्हर्जिनिया** हिची स्थिति कशी झाली आहे, हें मला **लातूर**बाईनें कळविलें होतें. या मुलांस कांहीं दिवस एकमेकांपासून दूर करावें, अशी तिची इच्छा होती. यांपैकीं कोणतीच गोष्ट **पाल** यास सांगण्यास मला धैर्य येईना."

"या वेळींचें एक गलबत **फ्रान्स** देशांतून आलें." त्यावर मावशीकडून **लातूर**बाईला एक पत्र आलें. मोठें जिवावरचें दुखणें येऊन ती अगदीं क्षीण झाली होती. आतां मी फार दिवस वांचत नाहीं, असें तिला वाटूं लागलें. ह्मातारपणामुळें औषधोपचारापासून सुद्धां गुण येत नाहींसा झाला. त्यामुळें तिच्या कठोर हृदयांत किंचित् द्रव उत्पन्न झाला आपल्या भाचीला परत **फ्रान्स** देशांत आणावें असें तिला वाटूं लागलें. तिनें **लातूर**बाईला असें लिहिलें

कीं, अशक्तपणामुळें तुझ्यानें येववत नसेल तर, व्हर्जिनिया हिला तरी पाठवून दे. चांगली विद्या शिकवून व श्रीमान् वराशीं लग्न करवून आपल्या सर्व ऐश्वर्याची तिला मी वारस करणार; असें तिनें शपथपूर्वक कळविलें. हें पत्र वाचतांच सर्वांस पराकाष्ठेचें दुःख झालें. डोमिंगो आणि मेरी हीं तर रडूं लागलीं. पाल चकित होऊन स्तब्ध बसला. त्याचा राग हृदयांत मावेनासें दिसूं लागलें; व्हर्जिनिया एकाग्र दृष्टीनें आईच्या तोंडाकडे पाहूं लागली. परंतु तिच्या तोंडांतून शब्द उमटेना."

"मार्गारेट लातूरबाईला ह्मणाली, 'तर मग तूं आतां आह्मांला सोडणार ना?' "

"लातूरबाई—'नाहीं बरें, मी आपल्या मैत्रिणीला आणि आपल्या लाडक्या मुलाला केधीं सोडणार नाहीं. मी तुज-बरोबर राहिल्यें आहें. तुझ्या जवळ मी मरेन. तुझ्या ममते-शिवाय मला दुसरें कोणतेंही सुख माहीत नाहीं. माझी प्रकृति अशक्त झाली, याचें कारण पूर्वीं झालेले हाल होत. नातेवाईक माणसांच्या क्रूरत्वानें, आणि पतीच्या मरणानें, दुःखानें माझें अंतःकरण करपून गेलें होतें; परंतु, या झोप-डींत तुझ्या समागमानें सुख होऊन मला पुष्कळ समाधान झालें. स्वदेशांत राहून वाडवडिलांचें सर्व ऐश्वर्य मला प्राप्त झालें असतें, तरी मला असें सुख झालें नसतें.' "

"हें सांत्वन करणारें भाषण ऐकून सर्वांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. लातूरबाईच्या गळ्यास मिठी मारून पाल ह्मणाला, 'मी तुला सोडून हिंदुस्थानाकडे जाणार नाहीं. आई, आह्मी सर्व तुजकरितां श्रम करूं. तुला कशाची उणीव पडूं देणार नाहीं.' परंतु सर्व माणसांपेक्षां व्हर्जिनिया

हिच्या मनांत फारच आनंद झाला. ती आपला आनंद बाहेर दाखवीत नसे; तरी तिची प्रकृति उल्हासयुक्त दिसूं लागली. सर्व दिवसभर तिचें हास्ययुक्त मुख पाहून, हिचें मन शांत झालें, अशी खात्री होऊन सर्वांस मोठा संतोष झाला.' "

"दुसऱ्या दिवशीं **सूर्योदय** झाल्यावर न्याहारीच्या पूर्वीं तीं नेहमीं प्रमाणें देवाची प्रार्थना करीत होतीं, इतक्यांत **डोमिंगो** येऊन सांगूं लागला कीं, 'दोन चाकर बरोबर घेऊन घोड्यावर बसलेला एक गृहस्थ आपल्या कडेकडे येत आहे.' हा गृहस्थ **मानशुअर लाबरदोने** होता. ही मंडळी न्याहारीच्या तयारींत आहे तों तो झोंपडींत आला. देशचाली प्रमाणें **व्हर्जिनिया** हिनें न्याहारीस कांफी, तांदळांची पेज, तयार केली होती, व त्याबरोबर गोराडू वगैरे कन्द शिजविले होते, आणि तोंडीं लावण्यास नारळाची चटणी केली होती. जेवायास थाळ्यांबद्दल मोठमोठीं केळींचीं पानें घेतलीं होतीं. आणि वाट्यांबद्दल कालवणाच शिंपा घेतल्या होत्या. झोंपड्यांचा गांवठीपणा पाहून सुभेदारास आश्चर्य वाटलें. तो **लातूरबाई**कडे वळून ह्मणाला, 'सरकारी काम पुष्कळ असल्यामुळें मला लोकांची गांठ घेण्यास फुरसत नसते. तरी, तुमचा समाचार मला अवश्य घेतला पाहिजे. तुमची मावशी **पारीस** शहरीं आहेना? ती मोठ्या घराण्यांतली असून गांठी श्रीमान् आहे. तुह्मी लौकर तिला भेटण्यास जावें; अशी तिची इच्छा आहे. ती आपल्या सर्व मालमत्तेचें वारीसपत्र तुह्मांस देणार आहे.' "

"**लातूरबाई**नें सांगितलें कीं, 'माझी प्रकृति फार अशक्त झाली आहे. एवढ्या लांबची सफर सोसण्यास मला सामर्थ्य नाहीं.' "

"सुभेदार—'कसेंही असलें तरी निदान या सुंदर मुलीला मोठ्या ऐश्वर्याचा लाभ होणार आहे, तो नाहींसा करणें हा तुह्मीं मोठा अन्याय केलासा होईल. मी तुह्मांस स्पष्ट सांगतों कीं, तुमच्या मावशीनें आपल्या वजनानें, तुह्मास परत गेलेंच पाहिजे अशी तजवीज केली आहे. मला सरकारी पत्र आलें आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, गरज पडल्यास म्यां आपले अधिकाराच्या जोरानें देखील तुमची येथून रवानगी करावी. परंतु माझी अशी इच्छा आहे कीं, या बेटांतील लोकांस सुखी करण्यास मात्र आपल्या अधिकाराची योजना करावी. याकरितां मला अशी आशा आहे कीं, तुह्मीच विचार करून कांहीं वर्षें तरी येथून जाण्यास तयार व्हाल. कारण, तुमची मुलगी या जगांत योग्यतेस येणें, व तुह्मांस जन्मभर सुख होणें, या गोष्टी त्यावर अवलंबून आहेत. आपण या बेटांत कशास येतों? द्रव्य मिळविण्याकरितां नव्हे काय? तर मग स्वदेशीं परत जाऊन मिळविणें हें चागलें नव्हे काय?' "

"नंतर त्यांच्या चाकरानें आणिलेली एक मोठी रुपयांची थैली तिजपुढें ठेविली. आणि ह्मणाला, 'मुलीच्या रवानगीच्या खर्चास ही तुमच्या मावशीनें पाठविली आहे.' संकटकाळीं सुद्धां आपली मदत न मागितल्याबद्दल तो जरा खोंचून बोलला; परंतु, त्यानें तिच्या विलक्षण धैर्याची स्तुतिही केली. हें ऐकून **पाल** सुभेदारास ह्मणाला, 'महाराज, माझ्या आईनें मदती करितां आपणास विनंति केली होती. पण तिकडे आपण दुर्लक्ष केलें.' "

सुभेदार—(लातूरबाईस) 'तुह्मांस आणखी दुसरें मूल आहे काय?'

लातूरबाई—'नाहीं, हा माझ्या मैत्रिणीचा मुलगा. पण तो व्हर्जिनिया सारखाच माझा लाडका आहे.'

सुभेदार—(पाल यास) 'मुला, मोठा होऊन लोकांत वागूं लागलास, ह्मणजे तुला कळेल कीं, वडे सरकारी कामदार दुर्दैवानें फसले जाऊन नम्र सद्गुणी मनुष्यांस मिळावयाचें तें त्यांच्या हातून कारस्थानी लुच्चा मनुष्यांस प्राप्त होतें.'

"लातूरबाईनें न्याहारी करण्याची विनंति केल्यावरून सुभेदारानें त्यांच्या पंक्तीस बसून थोडीशी काफी व पेज घेतली. झोंपडींतील नीटनेटकेपणा, कुटुंबांतील माणसांचें एकमेकांवर प्रेम, व चाकरांची स्वामिभक्ति, हीं पाहून त्यास मोठा आनंद होऊन ह्मणाला, 'येथें पडगे, पाळीं वगैरे लांकडी सामान माझ्या दृष्टीस पडत आहे; परंतु एथील मनुष्यांची मुखचर्या व अन्तःकरण सोन्यापेक्षां निर्मळ आहे.' सुभेदाराचें सौजन्य पाहून पाल यास फारच आनंद होऊन तो ह्मणाला, 'आपण थोर गृहस्थ आहां. आपणांशीं स्नेह करावा अशी माझी इच्छा आहे.' ही प्रेमभावाची प्रार्थना संतोषानें मान्य करून पाल यास हातांत धरून सुभेदार ह्मणाला, 'आपण खरोखर आजपासून मित्र आहों.' "

"जेवण झाल्यानंतर लातूरबाईस एकीकडे बोलावून सुभेदारानें सांगितलें कीं, 'तुमच्या मुलीस फ्रान्सदेशीं पाठविण्यास लौकरच चांगली संधि येणार आहे. एका गलबतावर आमची आप्तविषयी कोणी बाई जाणार आहे, तिलीं तुमच्या मुलीस संभाळून नेण्यास आह्मी सांगूं. थोडे दिवस मुलीचा वियोग होईल एवढ्या करितां, एवढ्या मोठ्या ऐश्वर्याचा त्याग करूं नका. तुमची मावशी दोन

त्र्यांपेक्षां जास्त वांचत नाहीं, असें तिच्याच मित्रापासून मीं ऐकिलें आहे. पुरता विचार करा. लक्ष्मी आपल्याकडे दररोज येत नाहीं. आपल्या मित्रांचा सल्ला घ्या. कोणीही समजूतदार मनुष्य माझ्या सारखेंच मत देईल.' लातूरबाई ह्मणाल्या, 'मुलीला सुख व्हावें, याशिवाय मला या जगांत दुसऱ्या कोणत्याही सुखाची इच्छा नाहीं. फ्रान्सदेशीं जावें किंवा न जावें, हें सर्व मी तिच्याच खुषीवर सोंपवितें.' "

"कांहीं वेळ पाल आणि व्हर्जिनिया या दोघांस एकमेकांपासून दूर करून त्यांचें लग्न लांबणीवर टाकावयाचें लातूरबाईच्या मनांत होतेंच. मुलीला एकीकडे बोलावून ती ह्मणाली, 'मुली, आपले चाकर फार ह्मातारे झाले; पाल अजून लहान आहे. मार्गारेट हिचाही वृद्धापकाळ जवळ आला, मला तर अगदींच शक्ति नाहीं, आणि जवळ पैसाही नाहीं. माझें बरें वाईट झालें तर, या अरण्यांत तुझी काय अवस्था होईल! मग तर तूं अगदीं एकटी होशील. तुला साहाय्य करण्यास कोणी मिळणार नाहीं. काळाचे दिवस ढकलण्याकरितां तुला सतत श्रम करावे लागतील. या गोष्टी मनांत आल्या ह्मणजे मला अपरंपार दुःख होतें.' हें ऐकून व्हर्जिनिया ह्मणाली, 'आह्मीं श्रम करावे ही देखील ईश्वराचीच योजना आहे. नेहमीं श्रम करावे आणि त्याची प्रार्थना करावी, हें त्यांच मला शिकविलें आहे. त्यानें आह्मांला आजपर्यंत कधीं सोडिलें नाहीं; व पुढेंही सोडणार नाहीं; विशेषेंकरून गरिबांवर त्याचें लक्ष फार असतें; हें त्वां मला वारंवार शिकविलें आहे. आई, मी तुला सोडून कधीं जाणार नाहीं.' लातूरबाईस मोठा गहिंवर येऊन ती ह्मणाली, 'तुला सुखी करून एक दिवस पाल याच्याशीं तुझें

लग्न करावें. याशिवाय माझा दुसरा कांहीं एक हेतु नाहीं. पाल तुझा भाऊ नव्हे. एव्हांच विचार कर. त्याला भाग्यवान् करण्याचें तुझ्या हातीं आहे.' "

*"तरुण स्त्रीची एखाद्यावर प्रीति बसली म्हणजे तिला वाटतें कीं, आपला मनोभाव दुसऱ्या कोणाला माहीत नाहीं. अंतःकरणाप्रमाणेंच आपल्या डोळ्यांवर ती पडदा ओढिते. परंतु, तो हळूच कोणीं युक्तीनें काढिला म्हणजे, मनांतील गुप्त अस्वस्थता एकाएकीं बन्धन तोडून बहिर पडते. असें झालें म्हणजे संकोचाचें गूढ नाहींसें करून, ती विश्वासानें वडिलांचें लालन करूं लागते. आईच्या प्रीतीची ही नवीन प्रचीति पाहून **व्हर्जिनिया** हिचें अंतःकरण सद्गदित झालें. तिनें आपल्या मनांतील अस्वस्थतेचें वृत्त आईस सांगितलें. ती म्हणाली, 'माझ्या अंतःकरणास किती दुःख होत होतें, हें **ईश्वरास** मात्र माहीत आहे. त्यानेंच मला अशी कृपाळू आई दिली आहे. माझा स्नेहभाव तिच्या पसंतीस पडला. आतां तीच मला या कामीं सदुपदेश करून मार्ग दाखवील. तिच्या साहाय्यामुळें मला आतां पुष्कळ बळ आलें. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां असें वाटतें कीं, सध्याची काळजी न करितां, व पुढलें भय न बाळगितां मीं स्वय आईजवळच रहावें, हें चांगलें.' "

"आपल्या गुप्त भाषणाचा परिणाम **लातूरबाईला** वाटला होता त्याच्या उलट झाला. असें पाहून ती म्हणाली, 'मुलां, मी आतां तुझ्या इच्छेविरुद्ध तुला कांहीं एक सांग-

---

* यूरोपांतील लग्नाच्या चालीस अनुलक्षून हा प्रकार आहे हें वाचकानीं ध्यानांत आणिलें पाहिजे.

णार नाहीं. रिकामपणीं पुरता विचार कर. परंतु आपला मनोभाव पाल यास कळूं देऊं नको."

"संध्याकाळच्या वेळेस लातूरबाई आणि व्हर्जिनिया पुनः एके ठिकाणीं बसल्या होत्या. इतक्यांत तेथें एक धर्मोपदेशक आला. हा या बेटांतील धर्माध्यक्ष होता. त्यास सुभेदारानें यांजकडे पाठविलें होतें. तो घरांत येतांच ह्मणाला 'मुलींनो, ईश्वराचा धांवा करा. आतां तुह्मी श्रीमंत झालां. आतां तुमच्या शुद्ध अंतःकरणास योग्य वाटेल तसें वागा, आणि गरीबांवर परोपकार करा. मानशुअर लाबरदोने यांनीं तुह्मांस काय सांगितलें आहे, तुह्मीं त्यांस काय उत्तर दिलें आहे, तें मला माहीत आहे. बाई, शरीरप्रकृतीमुळें तुला येथें राहणें भाग पडलें, परंतु, मुली, तुला कांहीं एक सबब नाहीं. आपणास ईश्वराची आज्ञा अवश्य मानलीच पाहिजे. तशीच आपल्या वडिलांची आज्ञा गैर असली तरी, आपणांस शिरसा वंद्य आहे. या वेळेस तुला वियोगदुःख सोशिलें पाहिजे, हें खरें आहे; तथापि उपाय नाहीं, ही ईश्वराची आज्ञा आहे. त्यानें तुजवर कृपा केली, तर आतां त्वांही त्याप्रमाणेंच आपल्या कुटुंबांच्या कल्याणासाठीं, तन, मन, धन, हीं अर्पण केलीं पाहिजेत. फ्रान्स देशास जाण्याची सफर करण्याचा शेवट गोड होईल. मुली, तूं जाण्याचें कबूल करशील अशी माझी पक्की खातरी आहे.' "

"व्हर्जिनिया खालीं पाहून कांपूं लागली, आणि रडत रडत ह्मणाली, 'देवाचीच आज्ञा असेल तर तिला आड येण्याचें साहस मी करीत नाहीं. त्याचे इच्छेप्रमाणेंच होऊं द्या.' "

"धर्माध्यक्ष परत गेला आणि आपण काम करून आलों, ह्मणून सुभेदारास त्यानें सांगितलें. व्हर्जिनिया हिला पाठविण्याविषयीं सल्ला विचारण्याकरितां लातूरबाईनें डोमिंगोस मला बोलवावयास पाठविलें. तिला पाठवूं नये असें माझें मत होतें. सुखाविषयीं माझें असें निश्चित मत होतें कीं, आपल्या नशीबानें प्राप्त झालें, तेवढ्यांत संतुष्ट राहावें, विशेष इच्छा करूं नये. परंतु, लक्ष्मीच्या भुलीपुढें माझ्या असल्या साध्या विचाराचें काय चालणार आहे! सर्व जगाचा अभिप्राय असल्या साधारण तर्कशक्तीच्या विरुद्ध पडावयाचा. शिवाय माझें मत त्या उपदेशकाच्या अभिप्रायाविरुद्ध. लातूरबाईला तर त्याचें वचन धर्मशास्त्राप्रमाणें मान्य. मला तिनें उगीच मोठेपणा देण्याकरितां विचारिलें. वस्तुतः उपाध्याचें भाषण ऐकल्यापासून तिचा निर्णयच झाला होता. व्हर्जिनिया हिला संपत्ति मिळाल्यास आपल्या मुलाचें प्रतिपालन होईल हें मार्गारिटला माहीत होतें. तथापि, तिला पाठविण्याविषयीं तिचें मत या वेळेपर्यंत प्रतिकूळ होतें. परंतु आतां तीही कांहीं एक बोलेनाशी झाली. यांचा काय निर्णय झाला वगैरे पाल यास कांहींच कळेना. लातूरबाई मुलाशीं एकीकडे बोलत असे; त्यामुळें त्यास भय वाटूं लागलें; तो नेहमीं खिन्नवदन दिसूं लागला. तो ह्मणाला, 'इतका गुप्तपणा आहे, यावरून यांची कांहीं तरी मला दुःखांत घालण्याची मसलत चालली आहे.'"

"इतक्या वेळांत या झोंपड्यांवर लक्ष्मीची कृपादृष्टि झाली, अशी बातमी सर्व बेटांत पसरली. पुष्कळ प्रकारचे व्यापारी उदमी हिंदुस्थानांतील मौल्यवान् पदार्थ घेऊन, त्या उंच डोंगरावर चढून येऊं लागले. मच्छलीपट्टण, ढाका

वगैरे शहरांतून, दुमटी, मलमल, वगैरे चमत्कारिक कशीदा काढलेलीं पट्टेदार व प्रकाशासारखीं तेजस्वी, तलम अशीं कापडें येऊं लागलीं. तशींच साटीण वगैरे तांबडीं भडक व हिरवीगार चीनदेशांतील रेशमी कापडें, गुलाबी तापते वगैरे अनेक प्रकारचीं चित्रविचित्र वस्त्रें व्यापारी विकावयास आणूं लागले."

"**लातूरबाईनें** जें आवडेल तें विकत घेण्यास मुलीला सांगितलें. **व्हर्जिनिया** हिनेंही आपल्या आईच्या, **मार्गा-रेटच्या**, व **पाल** याच्या, आवडीच्या वस्तु विकत घेतल्या. तिनें आपणाशीं ह्मणावें," ही वस्तु घरांत उपयोगीं पडेल, ती **मेरी** आणि **डोमिंगो** यांच्या उपयोगीं पडेल. असें करितां करितां, आपल्या गरजेच्या वस्तु विकत घेण्यापूर्वींच सर्व पैसे सरून गेले. शेवटीं घरांतील माणसांस देणग्या दिल्या होत्या, त्यांतून कांहीं पैसे तिला परत द्यावे लागले."

"ह्या मौल्यवान् वस्तु **पाल** याच्या हृदयांत बाणासारख्या सलत; हीं **व्हर्जिनिया** हिच्या जाण्याचीं पूर्व चिन्हें आहेत. असें त्यास समजलें होतें. एके दिवशीं निराशेनें खिन्नवदन होऊन तो माझ्या घरीं आला, आणि मला ह्मणूं लागला, 'माझी ताई दूर जाते. तिच्या निघण्याची तयारी चालली आहे. हात जोडितों, तुह्मांला शपथ आहे; तिच्या आणि माझ्या आईला कांहीं तरी सांगून तिला राहवून घ्या."

"माझ्या भिडेचा कांहीं उपयोग होणार नाहीं अशी माझी खात्री होती. तथापि, त्या मुलाची विनंती माझ्यानें नाकबूल करवेना."

"नुसतें अगदीं साधें, निळें, तांबडें, कापड अंगावर घाई, तेव्हांसुद्धा **व्हर्जिनिया** मला सुन्दर दिसे. मग श्री-

मंतासारखे डागदागिने आगावर घातल्यावर किती रूपवान् दिसत असेल! ती पांढरी मलमल नेसली होती. आणि गुलाबी ताफ्ता पांघरली होती. तिचा लहान नाजूक बांधा व सिंहकटि हीं फारच सुंदर दिसत. कुरळ्या केसांनीं तर तिच्या मस्तकास उत्तम शोभा आणिली होती. तिचे सुंदर काळे कुळकुळीत डोळे, खिन्नतेनें उदास दिसूं लागले. अंतःकरणातील क्षोभानें गाल तांबडे लाल झाले. व बोलणें कंठ दाटून गहिंवर आल्यासारखें येऊं लागलें."

"तिची चिन्ताक्रांत मुद्रा, व आनंदाच्या वेळेचा पोषाक, यामुळें तिला कांहींएक विलक्षण प्रकारची शोभा आली होती. तिला पाहिल्याबरोबर पाहाणाराच्या पोटांत खळबळून येई. **पाल** दिवसेंदिवस अधिक उद्विग्न दिसूं लागला. त्याची अवस्था पाहून **मार्गारेट** फार कष्टी झाली. आणि कोवटीं मुलास एकीकडे बोलावून ह्मणाली, 'कां! माझ्या लाडक्या, उगीच व्यर्थ आशा कशाला मनांत बाळगितोस! या योगानें तुझी निराशा मात्र फार दुःसह होईल. तुझ्या आणि माझ्या आयुष्याची गुप्त गोष्ट तुला समजविण्याची वेळ आली. **व्हर्जिनिया** मोठ्या भाग्यवान् कुळांतल्या बाईची मुलगी आहे. तूं एका भिकार शेतकऱ्याच्या पोरीचा मुलगा आहेस. शिवाय तूं लग्नाच्या बायकोपासून झालेला नाहींस. हें फारच वाईट आहे."

"**पाल** यानें हे शेवटले शब्द कधींच ऐकिले नव्हते. तो मोठ्या नेटानें त्याचा अर्थ विचारूं लागला. त्याची आई ह्मणाली, 'तुझा कायदेशीर बाप नाहीं. स्त्रिया स्वभावतः भयाळू. त्यांत मी तर लहान अज्ञान होतें. त्या वेळेस मला एकानें प्रीति दाखवून फुसलावून नेलें. त्या माझ्या अपराधा-

पासून तुझी उत्पत्ति आहे. . माझ्या अपराधामुळें लालन-पालन होण्यास तुला बापाचें घर नाहींसें झालें, आणि पळण्यामुळें आजोळही नाहींसें झालें. हे हतभाग्यमुला, या जगांत तुला मजशिवाय कोणी आप्त नाहीं.' असें बोलून ती ढळढळां रडूं लागली. पाल दोन्ही हातांनीं तिला कवटाळून ह्मणाला 'आई, मला ह्या जगांत तुजशिवाय कोणी नाहीं ह्मणूनच मी तुजवर अधिक प्रीति करीन. पण आई, त्वां मला आज केवढी गुप्त गोष्ट कळविली! व्हर्जिनिया आतांशी दोन महिने मजपासून कां दूरदूर पळते त्याचें कारण मला आतां कळलें. ती माझा धिक्कार करिते, हें मला आतां पक्कें समजलें.' "

"जेवणाची वेळ झाली तेव्हां, आह्मी सगळीं जेवण्यास बसलों. परंतु, सर्वांचीं अंतःकरणें दुःखानें उचंबळलीं असल्यामुळें कोणासही कांहीं खावेंसें वाटेना. सर्व जेवण मुकाट्यानें झालें. व्हर्जिनिया पहिल्यानें बाहेर गेली, आणि आह्मीं बसलों आहों येथेंच येऊन बसली. पाल तिच्या पाठीमागून धांवत आला आणि तिच्याजवळ बसला. त्या दिवशीं रात्र फारच शोभिवंत होती. क्रांतिवृत्तावरील देशांत रात्रीची शोभा इतकी उत्तम असते कीं, तिचें वर्णन सुद्धां करितां यावयाचें नाहीं. नक्षत्रमंडलांत चंद्र दिसूं लागला. प्रस्मतः किंचित् अभ्रानें आच्छादित होता; परंतु, हळूहळू आवरण जाऊन किरण फांकूं लागले, तेव्हां एकाएकीं बेटांतील सर्व पर्वत प्रकाशित झाले; आणि त्यांचीं शिखरें रुप्यांत बसविलेल्या पाचेप्रमाणें चमकूं लागलीं. वारा अगदीं शांत होता. खिंडींत, रानांत, आणि गिरिशिखरांवर पक्ष्यांचे गुंजारव ऐकूं येऊं लागले. रात्रीची शोभा व आकाशाचा

स्वच्छपणा पाहून ते जसा काय आनंदघोषच करीत आहेत कीं काय, असें वाटे. गवतांतून जीवजंतु गुणगुण करूं लागले; आकाशांत नक्षत्रें चकाकत त्यांचीं लखलखीत प्रतिबिंबें समुद्रांत हालत होतीं. व्हर्जिनिया हिनें बेटाजवळील अखाताच्या पलीकडे पाहिलें तेव्हां काळ्या धारेकडील लांब येलेल्या होड्यांवरील दिवे तिच्या दृष्टीस पडूं लागले. बंदराच्या मुखाजवळ तिला एक उजेड व सावली दिसली. युरोपखंडांत जाण्यास तिला ज्या गलबतावर चढावयाचें होतें, त्यावरील हा दिवा होता. व त्या गलबताचीच ती सावली होती. गलबत हाकारण्याची तयारी झाली होती; परंतु वाऱ्याची वाट पाहण्याकरितां नांगर टाकिला होता. गलबताकडे पाहून व्हर्जिनिया हिला मोठा हुंदका आला. आपले अश्रुपात पाल याच्या दृष्टीस पडूं नयेत म्हणून तिनें तोंड एकीकडे फिरविलें."

"लाटूरबाई, मार्गारेट आणि मी थोड्याच अंतरावर केळीखालीं बसलों होतों. रात्रीस जिकडे तिकडे सामसूम असल्यामुळें आह्मीं त्यांचें सम्भाषण स्पष्टपणें ऐकिलें. अजून मी तें विसरलों नाहीं."

पाल ह्मणाला "तूं दोन तीन दिवसांतच जाणार ह्मणून मीं ऐकिलें. ज्या समुद्राचें तुला इतकें भय वाटतें त्यावरून पार पडून जाण्याचा तुला कांहीं धोका वाटत नाहीं ना?"

व्हर्जिनिया—"आईची आज्ञा मानणें हें माझें कर्तव्य आहे."

पाल—"कधीं देखील न पाहिलेल्या दूरच्या नातलगांकरितां तूं आम्हांस टाकितेस!"

व्हर्जिनिया—"हाय हाय! मी जन्मभर येथें राहिलें

असतें. पण, माझ्या आईची इच्छा अशी नाहीं. माझ्या गुरूनें सांगितलें कीं, मीं जावें ही ईश्वराचीच इच्छा आहे. असले प्रसंग सोसणें हें ईश्वराच्या कसोटीस उतरणें आहे."

पाल—"काय! जाण्याविषयीं इतकीं अनुकूल कारणें तुला सांपडलीं! परंतु, येथें राहण्यास एक देखील सांपडत नाहीं! हँ, हँ, आणखी एक जाण्याचें कारण आहे, तें अद्याप त्वां मला सांगितलें नाहीं. संपत्तीच्या अंगीं मोठी आकर्षण शक्ति आहे. आतां तूं नव्या देशांत जात आहेस, तेथें तुला दुसरा भाऊ मिळेल. आतां तूं मला दादा, भाऊ ह्मणणार नाहींस. मी भिकारी आहें. तुझ्या संगतीस योग्य अशा कुलीन आणि धनवान् मंडळींपैकीं कोणास तरी तूं आपला भाऊ ह्मणशील. परंतु, तेथें जाऊन तूं अधिक सुखी होशील काय? आपली जन्मभूमि टाकून सुखी होण्यास कोणत्या ठिकाणीं जातेस? तुजवर इतकी प्रीति करणाऱ्या या माणसांशिवाय कोणती अधिक कळकळीची मंडळी तुला सांपडेल? नेहमीं आई तुझे मुके घेत असते, त्या आईशिवाय तूं कशी राहशील! आधींच ती वृद्ध झाली आहे. घरांत जेवणाच्या वगैरे वेळेस तूं दृष्टीस पडणार नाहींस तेव्हां तिला काय वाटेल! चालतांना तिला हात कोण देईल? माझ्या आईची काय आवस्था होईल! तीहि तुझ्या आईप्रमाणेंच तुजवर प्रीति करते. तुजकरितां त्या रडूं लागतील तेव्हां, कोणत्या शब्दांनीं मी त्यांचें सांत्वन करूं! हाय! हाय! मी आपल्याविषयीं तुला कांहींच सांगत नाहीं. पण, सकाळीं तूं माझ्या दृष्टीस पडणार नाहींस, तेव्हां माझी काय दशा होईल! आपल्या जन्मकाळीं लाविलेलीं, आणि आजपर्यंत आमच्या स्नेहभावाचीं साक्षी, अशा त्या नारळीच्या झाडांकडे पाहीन तेव्हां

मला काय वाटेल! असो! ज्या अर्थी नशीबाचें तुला बोलावणें आलें, आणि ज्या अर्थी दूर परदेशीं जाऊन तूं माझ्या श्रमांच्या फळाशिवाय दुसऱ्या ऐश्वर्याची इच्छा करितेस, त्या अर्थी तूं ज्या गलबतावरून जाणार त्यांत बसून मला तुजबरोबर येऊं दे. किनाऱ्यावर असतांही ज्यास तूं भितेस अशा वादळाच्या वेळेस तुला मी धीर देईन. मी आपल्या मांडीवर तुझें डोकें ठेवीन. थंडीच्या वेळेस उबाऱ्याकरितां पोटाशीं धरीन. **फ्रान्सदेशांत** गेल्यावर ऐश्वर्याच्या डामडौलांत वागूं लागलीस ह्मणजे, चाकरासारखा मी तुजबरोबर असेन. केवळ तुझ्या सुखानेंच मी सुखी राहीन. त्या राजमंदिरीं तुझा मानमरातब व सन्मान पाहून मी खुष होईन, आणि सर्वांत प्रिय जो जीव तो सुद्धां तुजकरितां देण्यास सिद्ध असण्याचा तरी मोठेपणा माझ्या आंगीं आहे, असें दाखवीन.” असें बोलत आहे तों गहिंवरानें, त्याचा कंठ दाटून आला. नंतर व्हर्जिनिया स्फुंदत स्फुंदत बोलूं लागली, तेंही आह्मीं ऐकिलें.

ती ह्मणाली, “केवळ तुजकरितांच माझें जाणें आहे. दोन अशक्त कुटुंबें पोसण्यास तुला फार श्रम करावे लागतात, म्हणून मीं जाणार. हा श्रीमंत होण्याचा प्रसंग मीं आणिला आहे, तरी तो केवळ त्वां आह्मांवर केलेल्या उपकारांबद्दल तुझें हजारोंपट हित करावें ह्मणून. तुझ्या स्नेहापेक्षां आणखीं दुसरें कोणतें ऐश्वर्य मोठें आहे! आपल्या जन्माविषयीं तूं बोलतोस! ‘तुला कोण मित्र पाहिजे’ असें मला कोणीं विचारिलें, तर मी तुजशिवाय कोणाचें नांव घेईन काय? पाल, तूं भावापेक्षां देखील मला फार अधिक आवडतोस. तुझी नजर चुकवून दूर राहण्याचें मला किती दुःख होतें! ईश्वरकृपेनें आपला पुनःसमागम होईपर्यंत प्राणापेक्षां अधिक

आवडत्या वस्तूचा वियोग सहन करण्यास तूंच मला साहाय्य कर! मी राहीन किंवा जाईन, वांचेन किंवा मरेन. तुला वाटेल तशी माझी व्यवस्था कर. मी मोठी दुर्दैवी आहें. तुझ्या लाडांपासून मला दूर जाववतें. पण तुझें दुःख कमी करण्यास मला सामर्थ्य नाहीं."

"असें बोलत आहे तों **पाल** यानें तिला दोन्ही हातांनीं पोटाशीं कवटाळून धरिलें. आणि अंतःकरणास वेधणाऱ्या स्वरानें मोठ्यानें ओरडला. 'मी तिजबरोबर जाईन. कांहीं झालें तरी आह्मी एकमेकांपासून दूर राहणार नाहीं.' त्या वेळीं आह्मी त्यांजकडे धांवत गेलों. **लातूरबाई** त्यास ह्मणाली, 'मुला, तूं गेलास तर आमचें कसें होईल?' "

"तो कांपतकांपत ह्मणाला, 'मुला! मुला? तूं माझी आईना! वाः! चांगली आई! बहिणभावंडांची तुटातूट करण्यास इच्छितेस. आम्ही दोघें तुझें स्तनपान करून वाढलों. तुझ्या मांडीवर खेळलों. एकमेकांवर प्रीति करण्यास तुजपासूनच शिकलों. आणि हजारोंवेळां एकमेकांस ताई, भाऊ, अशा हाका मारिल्या. आणि तूं आतां तिला मजपासून दूर पाठविणार!! जेथें तुला आश्रय मिळाला नाहीं अशा त्या क्रूर युरोपखंडांत, जिनें तुला टाकून दिलें तिजकडे तूं हिला पाठविणार! तूं मला ह्मणशील, 'तुझी काय सत्ता तिजवर आहे. ती तुझी बहीण नव्हे.' पण, मी तुला एकच सांगतों कीं, संपत्ति, कुलीनपणा, इष्टमित्र, हित, जें माझें सर्व काय तें ती आहे. मला दुसरें कांहींएक माहीत नाहीं. आह्मांस एक झोंपडी आणि एकच पाळणा होता. त्याप्रमाणें थडगेंही एकच असलें पाहिजे. ती गेली कीं मी पाठीमागून चाललोंच. मला सुभेदार अटकाव करील काय! समुद्रांत

उडी टाकण्यास, तर त्याच्यानें अटकाव करवणार नाहीं. तिजकडे पोंहून जाण्यास तो अडथळा कराल काय? बरें तर जमिनीपेक्षां समुद्र मला अधिक भयंकर वाटत नाहीं. जर मी तिजशिवाय वांचत नाहीं, तर निदान तिच्या डोळ्यांपुढें तरी मरेन. पण अशा क्रूर आईजवळ राहणार नाहीं. तूं मोठी निर्दय बायको आहेस. ईश्वर करो आणि ज्या समुद्राच्या स्वाधीन तिला तूं करतेस त्यापासून तुला ती प्राप्त न होवो. किनाऱ्यावरील दगडांवर आमचीं प्रेतें मागें आणणाऱ्या लाटा, पुत्रशोकानें तुला अक्षय्य खेदास पात्र करोत!"

"हे शब्द ऐकतांच मीं त्यास धरून ठेविलें. निराशेनें तो अगदीं बेशुद्ध झाला होता. डोळे आगीसारखे तांबडेलाल झाले होते, कपाळावर मोठमोठे घर्मबिंदु आले होते, पाय लटलटां कांपत होते, हात लावून पाहिलें तों, ऊर कढत होऊन धडधड उडत होता."

"व्हर्जिनिया फारच भ्याली, आणि म्हणाली, 'मित्रा, आपण बाळपणीं किती सुखें भोगिलीं तीं सर्वांस माहित आहेत. आतां आम्हां उभयतांस काय दुःख होत आहे हें ही सर्व पाहत आहेत. असे दोन्ही हतभाग्य प्राणी एकेठिकाणीं कधीं जन्मास आले नसतील. आमच्या सर्व गोष्टी यांस माहीत आहेत. जर मी राहिलें तर फक्त तुजकरितां राहीन. आणि गेलें तर कधींतरी तुझी म्हणविण्यास परत येईन. हें मी, ज्या तुम्हां मला लहानाची मोठी केलें, ज्यांच्या हातीं माझें आयुष्य आहे, जीं माझे अश्रुपातही पहात आहेत, त्या तुह्मां सर्वांदेखत, जो माझें बोलणें ऐकत आहे त्या ईश्वराची, व ज्यांत मी श्वासोच्छ्वास करितें, व असत्य भाषणानें ज्यास मीं दूषित केलें नाहीं त्या वायूची, शपथ घेऊन सांगतें.'"

"जसें सूर्याच्या किरणांनीं पर्वतशिखरांवरील कठोर बर्फ मऊ होऊन वितळूं लागतें; त्याप्रमाणें जीवर ती प्रीति करीत होता तिचा शब्द कानीं पडतांच, त्या मुलाचा मनःक्षोभ कमी झाला. खालीं मान घालून तो ढळढळां रडूं लागला. त्याची आईही मुलास पोटाशीं कवटाळून धरून रडूं लागली. डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या; परंतु, तिच्या तोंडांतून शब्द उमटेना. लातूरबाई भांबावून अर्धवेडी झाली, आणि मला ह्मणाली, 'आतां माझ्यानें हें पाहवत नाहीं. माझें काळीज फुटून गेलें. ही हतभाग्य सफर करण्याची कांहीं गरज नाहीं. माझ्या मुलास आपल्या घरीं घेऊन जा. आंठ दिवसांतें आमच्या घरीं कोणाचा डोळा लागला नाहीं.' "

"मी पाल यास ह्मणालों, 'मित्रा, तुझी बहीण जात नाहीं. उद्यां आपण सुभेदारापाशीं गोष्ट काढूं. घरांतल्या माणसांना अंमळ विसावा घेऊंदे. रात्रीस आमच्या घरीं रहावयास चल.' "

"तो कांहीं न बोलतां माझ्या पाठीमागून चालूं लागला. सगळ्या रात्रभर तळमळ तळमळ करून, मोठ्या पहांटेस उठला आणि घराकडे चालता झाला."

"पण आतां कशाला मी हा इतिहास सांगत बसूं? मनुष्याच्या सर्व आयुष्यांत केवळ सुखात्मक अशी एकही गोष्ट नाहीं. ज्या भूगोलाबरोबर आपण भ्रमण करीत आहों, त्यावरील दिवसाप्रमाणें आपली क्षणिक स्थिति आहे. एका भागावर उजेड पडला कीं दुसऱ्यावर काळोख पडलाच."

मी ह्मणालों बाबा, हात जोडितों, हा मनोवेधक इतिहास शेवटपर्यंत सांगा. सुखाच्या गोष्टी इतक्या मनोरंजक

आहेत तर, दुःखाच्या तशाच उपदेशपर असतील. त्या दुर्दैवी मुलाचें काय झालें तें मला सांगा.

"घरीं येतांना पहिल्यानें मेरी त्याच्या दृष्टीस पडली. ती खडकावर चढून मोठ्या उत्सुकतेनें समुद्राकडे पहात होती. तिला पाहतां क्षणींच दुरून हाक मारून, 'व्हर्जिनिया कोठें आहे?' ह्मणून त्यानें विचारिलें. मेरी त्याकडे पाहून रडूं लागली. पाल अर्धवेडा झाला, आणि परतून धांवून बंदराकडे जाऊं लागला. व्हर्जिनिया पहांटेसच गलबतावर चढली आणि लागलेंच गलबत चालूं लागलें. आतां तें दिसत देखील नाहीं, असें त्यानें तेथें ऐकिलें, तेव्हां तो लागलाच तोंडांतून कांहीं एक शब्द न काढितां मुकाट्यानीं बागेकडे परतला."

"ते आपल्या पाठीमागले खडक अगदीं उभे दिसतात. त्यांवर जाऊं लागलें असतां, मध्यें पुष्कळ हिरवीगार लहान लहान मैदानें लागतात. त्यांतील खडकाळ वाटेनें गेलें ह्मणजे त्या विकट सुळक्यापाशीं मनुष्य जाऊन पोंहोचतें. त्या सुळक्यास अंगुष्ठ असें म्हणतात. त्या सुळक्याच्या पायथ्याशीं एक निमुळता उतरता जमिनीचा तुकडा आहे. तो अगदीं वृक्षांनीं आच्छादित असल्यामुळें, भोंवतालीं उंच उंच कड्यांनीं वेष्टित असें एक अरण्यच आकाशांत लोंबत आहे कीं काय, असें दिसतें. उंच पर्वतांच्या शिखरांवर मेघांचें आकर्षण लौकर होतें. यामुळें पुष्कळ पर्जन्य पडून तेथें अनेक नद्या उत्पन्न होतात. त्या मोठ्या जोरानें ह्या डोंगरा पाठीमागल्या खोल दरींत इतक्या उंचावरून पडतात कीं उंचावर बसलों आहों ह्मणून, आपणांस त्यांचा आवाज सुद्धां ऐकूं येत नाहीं. त्या जाग्यावरून, दरी, अ-

रण्यें यांनीं भूषित अशा पिटरबोथ, त्रिकूट वगैरे पर्वतांच्या भव्य शिखरांनीं सुशोभित अशा या बेटाचा बहुतेक प्रदेश तुह्मांस पाहतां येईल. तेथून समुद्रांत लांब दृष्टि पोंहोचते. पश्चिमेकडे साठ कोसांवर बोर्बोन बेट आहे, तें सुद्धां तेथून दिसतें. त्या खडकाच्या उंच टोंकावरून, ज्या गलबतावरून व्हर्जिनिया गेली, तें गलबत पाल न्याहाळून पहात होता. तें इतक्या वेळांत पंधरा कोस लांब गेलें होतें. तें समुद्रावर उगाच काळ्या टिकलीप्रमाणें दिसत होतें. त्या टिकलीकडे नजर लावून पाल मोठा वेळ तेथेंच होता. ती दिसत नाहींशी झाली तरी त्याला वाटे दिसतच आहे. शेवटीं, क्षितिजाकडे धुकें येऊन त्या टिकलीचा भासही नाहींसा झाला, तेव्हां तो त्या भयंकर जागीं खालीं बसला. तेथें वारा नेहमीं सोसाट्यानें भणभण वाहतो. झाडांचीं पानें फणफण वाजूं लागलीं ह्मणजे दूर कोणी गुणगुण करीत आहे असें वाटून मन अगदीं उदास होऊन जातें. मी तेथें जाऊन पोंहोंचलों, तों पाल दगडावर डोकें टेकून खालीं पहात बसलेला माझ्या दृष्टीस पडला. मी सकाळपासून त्याच्या मागें मागें होतों. पुष्कळ विनवणी केल्यावर तो खालीं उतरून घरीं जाण्यास निघाला. मी त्यास घरीं घेऊन गेलों. तेथें पोंहोंचल्यावर प्रथमतः लातूरबाई त्याच्या दृष्टीस पडली. आपणास फसविल्याबद्दल तो तिची निर्भर्त्सना करूं लागला. लातूरबाईनें आह्मांस सांगितलें कीं, पहांटेस तीन वाजतां वारा चांगला वाहूं लागल्यामुळें गलबत हाकारण्यास तयार झालें. सुभेदार आपल्या हाताखालचे कामगार व तो धर्मोपदेशक यांस बरोबर घेऊन व्हर्जिनिया हिला बसविण्याकरितां, मेणा बरोबर घेऊन येथें आला. ती हट्ट घेऊन मोठ्यांनीं

रडूं लागली. मार्गारिटही रडूं लागली; तरी कोणाचें न ऐकतां, 'तुमच्या सर्वांच्या बऱ्याकरितां,' असें म्हणून प्रेतासारखी तिला उचलून तें चालते झाले."

पाल—"निदान मीं तिला येहो इतकें म्हटलें असतें, तरी कांहींसा शांत झालों असतों. मीं तिला म्हटलें असतें, व्हर्जिनिये आजपर्यंत आपण एके ठिकाणीं राहिलों. इतक्या वेळांत जर माझ्या तोंडांतून तुला वाईट वाटण्यासारखा शब्द निघाला असला तर मला निरंतर सोडण्यापूर्वी क्षमा केली असें सांग. मीं तिला म्हटलें असतें, माझे लाडके व्हर्जिनिये पुनः तुला पाहाण्याचें माझ्या नशीबीं नाहीं, परंतु तुझें कल्याण असो. सुखासंतोषानें मजपासून दूर रहा."

"आपली आई आणि लातूरबाई यांस, रडतांना त्यानें पाहिलें; तेव्हां तो म्हणाला, 'आतां तुमचे अश्रु पुसण्यास मजशिवाय दुसरा कोणी तरी बोलाविला पाहिजे.' असें म्हणून घरांतून झपाट्यानें धांव मारून, बागेंत वर खालीं धांवूं लागला. व्हर्जिनिया हिच्या फार आवडत्या जागा होत्या, त्यांकडे तो मोठ्या त्वरेनें पळत गेला. करडें आणि कोंकरें बें बें करीत पाठीमागें आलीं त्यांस म्हणाला, 'तुम्ही मजजवळ काय मागतां! जी आपल्या हातानें तुम्हांस भरवीत असे ती आतां तुमच्या दृष्टीस सुद्धां पडणार नाहीं.' व्हर्जिनिया हिच्या विश्रामबागेजवळ गेला तेव्हां पक्षी भोंवतालीं किलबिल किलबिल करूं लागले. त्यांस म्हणाला, 'गरीब पाखरांनो, जिनें तुम्हांस पोशिलें, तिजकडे उडून जाण्याचा प्रसंग आतां तुम्हांस येणार नाहीं.' बांड्याकुत्रा, हिकडे तिकडे फिरून तिला शोधीत आहे; असें पाहून मोठा सुसकारा टाकून

ह्मणाला; 'ती तुला अशतां कधीं भेटणार नाहीं.' शेवटीं पूर्व दिवशीं ज्या जागीं तिच्याजवळ बसून भाषण करीत होता, तेथें जाऊन बसला आणि ज्या समुद्रावरून तिला नेणारें गलबत दूर जाऊन दिसत नाहींसें झालें, त्याकडे पाहून मोठ्यानीं रडूं लागला."

"मनांतील क्षोभानें भलतेंच होईल, ह्मणून आह्मी नेहमी त्याच्या पाठीवर होतों. त्याची आई आणि लातूरबाई यांनीं त्यास शपथ घालून सांगितलें कीं, अशी निराशा करून आमच्या दुःखांत भर घालूं नको. शेवटीं लातूरबाईनें बाबा, पुता, करून गोंजारून त्याचें सांत्वन केलें. ती ह्मणाली, 'मी आपल्या लाडक्या बाळाला आपला जांवई करीन.' अशीं आर्जवें करून कांहींतरी थोडें खाऊं घालण्यास, त्याला घेऊन कशी तरी एकदा ती घरीं आली. तो आमच्याबरोबर जेवावयास बसला, त्याची बाळपणची खेळगडी जेथें बसत असे, त्या जाग्याच्या शेजारींच बसला. ती जशी काय तेथेंच आहे असें समजून, तिच्याशीं बोलूं लागे; आणि जे पदार्थ तिच्या आवडीचे ह्मणून त्यास माहीत होते ते तिला देऊं लागे. इतक्यांत शुद्धीवर आला ह्मणजे रडूं लागे. कांहीं दिवसपर्यंत तो व्हर्जिनिया हिची जी वस्तु सांपडेल, ती जमा करीत होता. तिनें घातलेले जुने गजरे, तिचीं प्यावयाचीं बेलीं, वगैरे सर्व वस्तु त्यानें गोळा केल्या. त्या मैत्रिणीच्या वस्तु त्यास जगांतील मोठमोठ्या मूल्यवान् रत्नांपेक्षां अधिक वाटत. त्यांचे मुके घेऊन, त्यांस घट्ट उराशीं आंवळून धरी. आपल्या प्रीतिपात्रांच्या वस्तु मनुष्यांस अत्तरापेक्षां देखील अधिक सुगंधी वाटतात. शेवटीं आपल्या संतापानें आईला व लातूरबाईला अधिक

यातना होतात, व कुटुंबाच्या निर्वाहा करितां नेहमीं श्रम केले पाहिजेत; हें मनांत येऊन डोमिंगोबरोबर तो बागेचें काम करूं लागला." -

"आजपर्यंत हा मुलगा अमेरिकेंतील मूळच्या राहणाऱ्या लोकांप्रमाणें जगांत काय चाललेलें आहे, याविषयीं उदासीन असे; परंतु व्हर्जिनिया हिला पत्र पाठवितां यावें ह्मणून,-मला लिहिणें वाचणें शिकवा-असें मजपाशीं ह्मणूं लागला. ती गलबतांतून कोणत्या देशीं उतरली असेल, तें बरोबर कळावें ह्मणून भूगोलविद्या शिकण्याची, व ज्या लोकांत ती राहाणार त्यांच्या रितीभाती कळाव्या ह्मणून इतिहास शिकण्याची, त्यास इच्छा झाली. प्रीतीच्या योगानें उत्तेजित असल्यामुळें त्याचा अभ्यास भराभर होऊं लागला. प्रीतीमुळेंच तो शेतकीच्या कलेंत निपुण झाला होता. एकादी भिकार, वांकडीतिकडी जमीन असली तरी, ती त्यास सुशोभित करितां येत असे. ही गोष्ट खरी आहे कीं, प्रीतीच्या योगानेंच बहुतेक कला व शास्त्रें जगांत उत्पन्न झालीं आहेत. तसेंच ज्यांच्या योगानें आपण वैराग्ययुक्त होऊन संसारांतील दुःखें सोशितों, असे तत्वज्ञानाचेही बहुतेक ग्रन्थ निराशेपासून उत्पन्न झाले आहेत. याप्रमाणें परमेश्वरानें सर्व प्राणी एकमेकांशीं प्रेमपाशानें बांधून टाकिले आहेत. यामुळें संसार, ज्ञान व सुख, यांचें आदिकारण प्रीति आहे, असें सिद्ध होतें."

"भूगोल शिकण्याकडे पाल याचें विशेष मन लागेना. त्यांत प्रत्येक देशाच्या स्वाभाविक स्थितीचें वर्णन नसतां, राजकीय संबंधानें कल्पित सीमांच्या वगैरे गोष्टी सांगितल्या असतात. इतिहासाची त्यास बरीच गोडी लागली. त्यांत

अर्वाचीन इतिहास त्यास विशेष आवडे. कांहीं कारण नसतां लहानमोठीं दुःखें प्राप्त होणें, कारण व लाभ यांशिवाय लढाया होणें, आडाणी लोकांचे देश व क्रूर राजे; यांच्या गोष्टी इतिहासांत त्यास सांपडल्या. त्यास कल्पित कादंबऱ्या तर फारच आवडत; कारण, त्यांत मनुष्यांच्या मनाच्या भिन्नभिन्न स्थिति वर्णिलेल्या असतात; त्यामुळें एखाद्या वेळेस त्यांत स्वतःच्या सारखी गोष्ट त्यास आढळे. एका पुस्तकांत अरण्यांत राहणाऱ्या धनगर वगैरे लोकांच्या स्थितीचें व मनुष्यांच्या स्वाभाविक मनोविकारांचें वर्णन केलें होतें. तें पुस्तक त्यास फारच आवडलें होतें. कित्येक चुटके मनोवेधक वाटत, तें, तो, आपली आई आणि लातूरबाई यांस मोठ्यानीं वाचून दाखवी. वाचतांना एकादी करुणरस प्रधान गोष्ट येऊन आपल्या बाललीलेचें स्मरण झालें ह्मणजे, गहिंवरानें कण्ठ दाटून डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागत. आलीकडील चावट गोष्टींचीं प्रचारांतील पुस्तकें त्यास आवडत नसत. यांत यूरोपांतील लोकांचें यथार्थ वर्णन केलें आहे; असें त्यास कळलें, तेव्हां त्यास फारच भीति वाटली. कारण, त्यास असें वाटलें कीं, व्हर्जिनिया ही या गोष्टींतल्या लोकांप्रमाणें बिघडून आपणास विसरेल. कांहीं अंशीं हा त्याचा तर्क गैर नव्हता."

"दीड वर्ष झालें तरी लातूरबाईला मुलीचा कांहीं समाचार कळेना. ती फ्रान्स देशामध्यें खुशाल पोंहोचली म्हणून एकादे वेळेस कोणी सांगे; शेवटीं हिंदुस्थानकडे जाणाऱ्या एका गलबतानें तेथें वरवा केला, त्यावरून एक पुडकें व व्हर्जिनिया हिनें आपल्या हातानें लिहिलेलें एक पत्र लातूरबाईला कोणीं आणून दिलें. आपल्या आईला

दुःख होऊंनये म्हणून त्या शहाण्या मुलीनें मोठ्या सावधगिरीने तें पत्र लिहिलें होतें. तथापि, ती सुखी नाहीं, हें त्यावरून सहज दिसे. त्या पत्रावरून तिची वर्तणूक व स्थिति ह्या इतक्या स्पष्ट दिसत कीं, तें अक्षरशः माझ्या ध्यानांत राहिलें आहे."

"प्रिय मातोश्री आजपर्यंत मीं तुला स्वदस्तूरचीं बरींच पत्रें पाठविलीं. परंतु, उत्तर न आल्यामुळें तीं तुला पोंहोचलेंीं नसावीं, असें वाटतें. मी आपलें वर्तमान कळवून तुझा समाचार ऐकण्याकरितां, चांगली तजवीज योजिली आहे; त्यावरून उत्तर येण्याची आतां मला आशा आहे. तुझा वियोग झाल्यापासून मला वारंवार रडूं येतें. आजपर्यंत दुसऱ्याच्या दुःखाशिवाय मला रडणें माहित नव्हतें. येथें आल्यावर 'तुला काय काय येतें,' म्हणून आजीबाईनें मला विचारिलें. 'मला लिहितां वाचतां येत नाहीं, असें सांगितलें, तेव्हां तिला मोठें आश्चर्य वाटलें. तिनें मला विचारिलें, 'जन्मास आल्यापासून त्वां केलें तरी काय?' त्यावर, घरांतलें काम करण्यास आणि अंाई सांगेल त्याप्रमाणें वागण्यास शिकलें असें सांगितलें; तेव्हां ती म्हणाली, 'हें एकाद्या चाकरास सुद्धां येत असतें.' दुसरे दिवशीं, पारीस शहराजवळ एक मोठा मठ आहे, त्याजवळील विद्यालयांत तिनें मला पाठविलें. तेथें जेवणाची वगैरे सर्व तर्तूद केली होती. इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, घोड्यावर बसणें, वगैरे विषय मला शिकविण्यास वेगळाले शिक्षक आहेत. परंतु, या शास्त्रांत माझी बुद्धि लौकर शिरत नाहीं. यामुळें माझा अभ्यास अगदींच थोडा होतो.

तथापि आजीबाईची ममता मजवर कामी आहे असें नाहीं.

वरच्यावर ती मला नवेनवे पोषाक देते. तिनें माझ्या तैनातीस दोन दासी दिल्या आहेत; त्यांच्या अंगावर देखील श्रीमंतांसारखीं उंचीं वस्त्रें आहेत. तिने मला मोठ्या पदवीचा किताब दिला आहे. परंतु लातूर हें नांव सोडून देण्यास ताकीद दिली आहे. तुजशीं विवाह करण्याकरितां माझ्या बापानें जीं दुःखें भोगिलीं, तीं त्या मला सांगितलीं; त्यांवरून हें नांव तुजप्रमाणेंच मला फार प्रिय झालें आहे. तुझें आडनांव टाकून तिनें मला तुझ्या माहेरचें आडनांव दिलें आहे. तेंही मला फार आवडतें. कारण, लहानपणीं तूं तेंच नाम धारण करीत होतीस. मी अशा उत्तम स्थितींत आहें असें समजून, तुला कांहीं साहाय्य पाठविण्याविषयीं मीं तिजपाशीं विनंति केली. पण, तिनें काय उत्तर केलें, तें माझ्यानें सांगवत नाहीं. परंतु, नेहमीं तुजपाशीं खरें सांगण्यास त्वां मला शिकविलें आहे ह्मणून सांगतें. ती ह्मणाली, थोडें पाठवून उपयोग नाहीं. पुष्कळ पाठवावें तर, तिच्या साध्या संसारास उगीच ओझें होईल."

"येथें आल्यावर कोणाकडून तरी आपलें वर्तमान लिहवून तुला पाठविण्याचा विचार केला. परंतु कोणी विश्वासू माणूस मला सांपडेना. तेव्हां रात्रंदिवस श्रम करून लिहिणें वाचणें शिकण्याचा यत्न केला. ईश्वरकृपेनें दोन्ही मला थोड्या दिवसांत येऊं लागलीं. माझा उद्देश जाणून त्यानेंच मला साहाय्य केलें, यांत संशय नाहीं. पहिलीं कांहीं पत्रें येथील बायांजवळ रवाना करण्याकरितां दिलीं, तीं त्यांनीं बहुतकरून आजीबाईजवळ नेऊन दिलीं, असें वाटतें. हल्लीं स्वयंपाकीणबाईशीं माझा स्नेह झाला आहे. कोणत्या मार्गानें उत्तर पाठवावें त्याविषयीं तिनें सांगितल्याप्रमाणें लिहिलें

आहे. त्या पत्र्यावर उत्तर आलें ह्मणजे मला पोहोंचेल. कोणाशीं पत्रव्यवहार ठेवण्याविषयीं आजीबाईनें मनाई केली आहे. तिचें ह्मणणें असें आहे कीं, असें केल्यास माझें कोटकल्याण करण्याविषयीं जी तिची इच्छा आहे, ती कमी होईल. ती आणि एक ह्मातारा बडा सरदार तिचा स्नेही आहे, यांशिवाय कोणास मजकडे दुरून दारांतून डुंकून पाहण्याचीसुद्धां परवानगी नाहीं. तो सरदार तुजवर मी मोठा खुष आहें, असें ह्मणतो. परंतु, मला तो मुळींच आवडत नाहीं. अशा वेळेस मला कोणीच आवडत नाहीं; त्यांत त्याचें तर दर्शन देखील नको."

"मी या ऐश्वर्यांत गढून गेलें आहें. परंतु, मजजवळ दमडी देखील नाहीं. मी पैशाचा भलताच उपयोग करीन असें म्हणतात. माझीं वस्त्रें देखील माझ्या दासींचींच आहेत असें ह्मटलें तरी चालेल. कारण, तीं टाकून दिलीं नाहींत तोंच त्या त्यांसाठीं भांडूं लागतात. मी तुजजवळ होतें त्यापेक्षां, या लक्ष्मीच्या मंदिरांत अधिक भिकारी आहें. कारण, दुसऱ्यास देण्यास मजजवळ कांहीं नाहीं. ज्या विद्या, कला, येथें शिकवितात; त्या दुसऱ्याचें हित करण्यास तिळमात्रही उपयोगीं पडावयाच्या नाहींत; असें मनांत आलें ह्मणजे, मी सुई घेऊन शिवीत बसतें. त्वां मला शिवणकाम शिकविलें, हें फार चांगलें झालें. मीं स्वतः तयार केलेले कांहीं पायमोज्यांचे जोड तुला आणि **मार्गारेट** आईला पाठवून दिले आहेत. **डोमिंगोला** एक टोपी पाठविली आहे. आणि **मेरीला** एक मी आपला तांबडा रुमाल पाठविला आहे. बागेंत निवडलेल्या फळझाडांच्या पुष्कळ प्रकारच्या बियांची पिशवी पाठविली आहे. आपल्यापेक्षां

या देशांतील रानांत पुष्कळ प्रकारचीं छानदार फुलें आहेत; पण, त्यांकडे कोणी पाहत देखील नाहीं. माझी खात्री आहे कीं, जी रुपयांची पिशवी आमच्या वियोगास व अश्रुपातास कारण झाली; तीपेक्षां ही पिशवी तुला आणि **मार्गारेट** आईला अधिक संतोष देईल. आपल्या कौलीं जवळ *आपलें झाडें झालीं आहेत; आणि *एल्म् झाडाच्या खांद्या नारळींच्या झावळ्यांत मिसळलेल्या तुझ्या दृष्टीस पडत आहेत; असें ऐकिलें तर मला फार आनंद होईल. हीं झाडें पाहून आपल्या आवडत्या **नार्मंडी** प्रांतांतच मी आहें, असें तुला वाटेल."

"मीं आपलीं सुखदुःखें कळवावीं, असें त्वां मला सांगितलें होतें. तुझ्यापासून दूर असलें म्हणजे मला सुख मुळींच होत नाहीं. दुःखांविषयीं म्हटलें तर **ईश्वराच्या** इच्छेनें ज्या स्थितींत त्वां मला ठेविलें; तींत मी आहें, असा विचार करून मी त्याचा उपशम करितें. पण सर्वांपेक्षां हें दुःख मोठें वाटतें कीं, येथें तुझी गोष्ट कोणी काढीत नाहीं. व मलाही कोणाजवळ तुझें नांव काढितां कामा नये. एके दिवशीं गोष्टी सांगत असतां माझ्या अतिप्रिय वस्तूंविषयीं मी कांहीं बोलणार इतक्यांत माझ्या दासींनीं (माझ्या कोठल्या, माझ्या आजीच्या) सांगितलें कीं, 'बाईसाहेब, लक्षांत ठेवा; आपण **फ्रान्सदेशां**तील नायको आहां. तो रानटी लोकांचा देश आपण विसरला पाहिजे.' हाय! हाय! मी आपल्या देहास लौकर विसरेन. पण, ज्या ठिकाणीं माझें जन्म झालें व जेथें तूं वास करीत आहेस, ती जागा कधीं विसरणार नाहीं. हाच मला रानटी लोकांचा देश वाटतो!

* हीं झाडें यूरोप खंडांत पुष्कळ असतात.

कारण, तुझ्या प्रेमाचे उद्गार काढण्यास सुद्धां मला कोणी भेटत नाहीं. त्यांचें ओझें देहांत होईपर्यंत मला मनांतल्या मनांत बाळगिलें पाहिजे. प्रिय माते लोभ असावा."

तुझी

आज्ञाधारक

व्हर्जिनिया, लातूर."

"आई, **डोमिंगो** आणि **मेरी** यांचा सांभाळ कर. तीं दोघेंही लहानपणीं मला फार जपत असत; मजबद्दल बांड्या-ला कुरवाळीत जा. तो माझा माग काढीत रानांत मला शोधण्यांस आला होता."

"घरांतील कुत्र्यास देखील **व्हर्जिनिया** विसरली नाहीं, असें असून, आपल्याबद्दल एक शब्द देखील नाहीं, हें पाहून **पाल** यास मोठें आश्चर्य वाटलें. पत्र किती जरी लांब असलें तरी आपल्या अत्यंत आवडीची गोष्ट शेवटीं लिहि-ण्याचा बायकांचा स्वभाव आहे, हें **पाल** यास माहीत नव्हतें."

"शेवटीं ताजाकलम घालून त्यांत **पाल** यास **व्हर्जिनिया** हिनें असें लिहिलें होतें कीं, ह्या दोन प्रकारच्या बिया पाठ-विल्या आहेत. त्या मोठ्या काळजीनें लावाव्या. त्यांस जमीन कशी पाहिजे, व पाणी वगैरे कसें द्यावें; याविषयीं तिनें लिहिलें होतें. आणि असें लिहिलें होतें कीं, 'एका झाडास तांबडीं लाल फुलें येतात. हीं फुलें झुडपाच्या आंत असतात; पण उत्तम सुवासाच्या योगानें तेव्हांच सांपडतात. पाणवठ्याजवळच्या नारळीच्या झाडांपाशीं हीं झाडें लावावीं. दुसऱ्या झाडाविषयीं असें लिहिलें होतें कीं, या झाडास फार सुंदर निळें फूल येतें. त्याच्या काळ्या पाकळ्यांवरून पांढरे ठिपके असतात. ते पाहून तुला असें वाटेल कीं, हें रंडतचं

आहे. यांवरूनच यास *विधवाकुसुम असें ह्मणतात. फार वारा असेल ती जागा यास चांगली मानवते. आपण शेवटच्या दिवशीं बोलत बसलों होतों तेथें हें लावावें आणि या जाग्यास **अंत्यदर्शनें** असें नांव द्यावें."

"त्या दोनप्रकारच्या बिया लहानशा वेगळ्याच पिशवींत घातलेल्या होत्या. ती पिशवी एका भिकार कापडाची होती. पण जेव्हां तीवर **पा** आणि **व्ह** हीं अक्षरें एकमेकांत गुंतवून दोऱ्यानें काढलेलीं **पाल** याच्या दृष्टीस पडलीं, तेव्हां ती त्यास फारच उत्तम अमोलिक वाटली."

"त्या सद्गुणी मुलीनें लिहिलेलें पत्र ऐकत असतां, सर्वांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या. तिच्या आईनें सर्वांच्या वतीनें पत्राचें उत्तर लिहिलें; आणि तुझी मर्जी असल्यास तेथें रहा, नाहीं तर योग्य वाटल्यास परत ये, असें कळविलें. आणि असें लिहिलें कीं, माझ्या मनास सुख केधीं प्राप्त होणें नाहीं, हें खरें आहे तथापि, तूं गेल्यापासून सुख आमच्या झोंपडीपासून लांब पळालें."

"**पाल** यानेंही तिला एक लांबच लांब पत्र लिहिलें. तुझ्या आवडीप्रमाणें मी बागेची व्यवस्था करितों, आणि **आफ्रिकें**तील झाडांमध्यें **यूरोपां**तील झाडें लावितों, ह्मणून लिहून पाठविलें. त्यानें, पाणवठ्यावरील माड लागास आले होते त्यांचे कांहीं नारळ तिला पाठविले, आणि लिहिलें कीं, बेटांतील आणखी दुसरे पदार्थ पाठवीत नाहीं. कारण, ते पाहून तुला इकडे लौकर येण्याची इच्छा होईल. आणि शपथ वाहून असें सांगितलें कीं, घरांतील माणसें काम सांगतील तें लागलेंच मी करीन. आणि

* Widow's flower.

वियोगदुःख सहन होत नसल्यामुळें सर्वकाळ उद्योगांत घालवीन."

"पाल यानें मोठ्या काळजीनें यूरोपांतील झाडांच्या बिया रुजत घातल्या. तो विशेषेंकरून हाकडे पाठविलेल्या दोन प्रकारच्या झाडांस फार जपत असे; त्यास वाटे कीं, कांहीं अंशीं व्हर्जिनिया सारखा यांच्या फुलांचा स्वभाव आहे. समुद्रावरच्या हवेनें बीं नासलें ह्मणा, अगर आफ्रिकेकडील जमीन त्यांस मानवली नाहीं ह्मणा, त्यांपैकीं फारच थोड्या बिया उगवल्या. मोठें झाड तर एकही झालें नाहीं."

"कोणासही सुखी पाहिलें ह्मणजे लोक हेवा करूं लागतात. पाल यास वाईट वाटेल, अशा बातम्या लोक उठवूं लागले. ज्या लोकांनीं व्हर्जिनिया हिचें पत्र आणिलें त्यांनीं सांगितलें कीं, एका बड्या सरदाराबरोबर लवकरच तिचें लग्न होणार आहे. कोणीं सांगितलें कीं आम्ही तिच्या लग्नास हाता व्यापाराच्या गलबतावरील लोक वाटेंत खोट्या बातम्या उठवितात हें पाल यास माहीत होतें; त्यामुळें पहिल्यानें अशा बातम्या त्यास खऱ्या वाटल्या नाहींत. परंतु कित्येक दुष्ट मनुष्य तुजबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें, असें ह्मणून हळहळूं लागत, त्यामुळें या बातम्यांत कांहीं तथ्यांश असावा असें त्यास वाटूं लागलें. नुकतींच कांहीं पुस्तकें वाचलीं होतीं त्यांवरून त्यास असें दिसलें होतें कीं, लुच्चेगिरी हा एक लोक शहाणपणाचाच प्रकार समजतात. या पुस्तकांत यूरोपांतील लोकांच्या रीतीभातीचें यथार्थ वर्णन आहे असें त्यास माहीत होतें, त्यामुळें व्हर्जिनिया बिघडून आपलें पूर्वीचें दर्शन विसरली असेल, असें त्यास वाटूं लागलें. याप्रमाणें त्याची विद्या त्यास अधिक दुःखी करण्यास मात्र कारण झाली.

त्यास विशेष भय वाटण्यास असें कारण झालें कीं, सहा महिन्यांत पुष्कळ गलबतें यूरोपांतून आलीं. परंतु एकावर देखील व्हर्जिनियाकडील कांहीं वर्त्तमान आलें नाहीं."

"हा दुर्दैवी मुलगा वारंवार अंतःकरण संतापानें क्षुब्ध झालें ह्मणजे मजकडे येई. त्यास असें वाटे कीं, मीं जगांत पुष्कळ दिवस वागलों आहें, त्यामुळें मला अनुभव फार आहे, तेव्हां तुझा संशय खरा आहे, किंवा कांहीं भिण्याचें कारण नाहीं, असें मला त्यास सांगतां येईल."

"मीं तुह्मांस मघाशींच सांगितलें आहे कीं, येथून दोन कोसांवर, त्या उतरत्या डोंगराच्या कड्यावर एक ओढा वाहतो, त्याच्या कांठच्या निर्जन प्रदेशांत मी एकटा राहतों. मला बायको, मुलें, किंवा चाकर, यांपैकीं कोणीही नाहीं."

"समानशील, सुस्वभाव अशा माणसांच्या समागमांत राहण्यांत मोठें सुख आहे. परंतु दैवयोगानें तें नाहींसें झाल्यास एकांतीं राहून मनुष्यानें काळ घालवावा, हें बरें. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, राज्यव्यवहारसंबंधानें, अथवा राज्यसत्तेच्या संबंधानें, रीतीभातींच्या संबंधानें, कलह उत्पन्न होऊन आजपर्यंत जीं राष्ट्रें हतभाग्य झालीं, त्यांतील शेंकडों नागरिक लोक एकांतीं जाऊन जोगी होऊन राहिले. **मिसरदेशास** उतरती कळा लागली तेव्हां, तेथील लोक असेंच करीत होते; ग्रीक लोकांच्या वैभवाचा ऱ्हास होऊं लागला तेव्हां त्यांनींही असेंच केलें. सांप्रतकाळींही हिंदु, चिनी, आणि हल्लींचे ग्रीक लोक, **इटाली** देशांतले लोक व **यूरोपखंडाच्या** पूर्वेकडील व दक्षिणेकडील देशांतले लोक या प्रकारचें आचरण करितात."

"ज्यां लोकांवर उपकार करावे; आणि त्यांनीं मला त्रास

द्यावा. असें पाहिलें तेव्हां त्यांची संगति सोडून दूर जाऊन रहावें असें मला वाटूं लागलें. यूरोपखंडांतील बहुतेक देशांत आणि **अमेरिका व आफ्रिका** यांतील कांहीं प्रदेशांत, प्रवास केल्यावर शेवटीं मीं येथें राहण्याचा विचार केला. या बेटांत वस्ती थोडी आहे, हवा चांगली आहे, आणि एकान्त स्थलें पुष्कळ आहेत. यामुळें ही जागा माझ्या मनास आली. एका झाडाच्या बुडाशीं मीं लहानशी झोपडी बांधिली आहे. तिच्या पुढेंच लहानसें शेत आहे. त्याची मशागत मी स्वतः आपल्या हातांनीं करितों. जवळच लहानसा ओढा आहे. या गोष्टींनीं माझा निर्वाह होऊन, मला मोठा आनंद वाटतो. मीं कांहीं निवडक पुस्तकें जवळ बाळगिलीं आहेत, वर सांगितलेल्या सुखांत यांपासून झालेल्या सुखाची भर पडली म्हणजे मला मोठाच आनंद होतो; हीं मला शहाणपण शिकवितात; ज्या जगाचा मीं त्याग केला, त्यापासूनच तीं मला सुखप्राप्ति करून देतात; ज्या कामक्रोधादि मनोधर्मांनीं जगांतील मनुष्यांस दुःखी केलें आहे; त्या मनोधर्मांचीं ढळढळीत चित्रें तीं पुस्तकें मजपुढें मांडितात. त्यावरून मी आपल्या व लोकांच्या स्थितींची तुलना करून पाहतों. त्यामुळें मला दुःखाभावरूप सुखाचा अनुभव प्राप्त होतो. लोकांपासून मित्रत्वाचें वगैरे सुख मला प्राप्त होत नाहीं तरी त्यांच्या दुष्ट स्वभावाची पीडाही होत नाहीं; असें मनांत आणून समाधान मानून घेतों. गलबत फुटून सांपडलेला एखादा मनुष्य दूरच्या एखाद्या खडकावर जाऊन लागतो, आणि बाकीच्या ठिकाणीं उठलेलीं तुफानें पाहत असतो, याप्रमाणें येथें एकांतीं राहून जगांतील अनर्थ पाहतों, त्यामुळें मी अधिक स्वस्थ आहें असें मला वाटतें."

"मी स्वस्थपणें हळूहळू कालरूपनदीवरून निर्मर्याद भविष्यत्समुद्राकडे वाहत चाललों आहें; सृष्टिरचनेचें चिंतन करूं लागलों ह्मणजे, तिच्या परम गुणसंपन्न, परमैश्वर्ययुक्त निर्माणकर्त्याच्या स्वरूपाकडे लक्ष लागून असें वाटूं लागतें कीं, परलोकीं मला मोठ्या सुखाचा लाभ होणार आहे."

"तुह्मांस माझी पर्णकुटिका येथून दिसत नसेल. ती झाडीच्या मध्यभागीं आहे. येथून तेथपर्यंत मध्यें पुष्कळ वस्तु आड येतात. जागा चमत्कारिक रीतीनें शोभिवंत केलेली आहे. मोठमोठ्या मौजा पाहणारांस कदाचित् येथें चमत्कार वाटणार नाहीं; परंतु, मजसारखा आपल्या घराचीच शोभा नेहमीं पाहणारा असेल त्यास, येथें मोठा आनंद होईल ह्यांत संशय नाहीं. माझ्या दारापुढें नदी वाहते ती रानांतून समोर जाते. त्यामुळें जसा काय दोहों बाजूंनीं अनेक प्रकारचीं झाडें लावून पाटच बांधून आणिला आहे, असें दिसतें. काळीं द्राक्षें, *ओलिव्हें, दालचिनी, कोबी, वगैरे सर्वप्रकारचीं झाडें येथें आहेत. कित्येक झाडें इतकीं उंच वाढतात कीं, बाकीच्या झाडांच्या शेंड्यांवर गेल्यामुळें वृक्षांच्या शिखरांवर दुसरा बागच केला आहे, असें दिसतें. हिरव्यागार छतांखालीं फुलांच्या ताटव्यांची फारच उत्तम शोभा दिसते. कांहीं झाडांपासून इतका मोठा सुवास चालतो कीं, तिकडून जाणाऱ्या वाटसरांचीं वस्त्रें बराच वेळ सुवासिक राहतात. पांढऱ्या फुलांचा भर आला ह्मणजे सर्व झाडी बर्फानें आच्छादित असल्याप्रमाणें दिसूं लागते."

"उन्हाळा संपत आला ह्मणजे राघु, निळे पारवे, वगैरे अनेक रंगांचे लहानमोठे नानाप्रकारचे पक्षी लांबलांबच्या

* एक प्रकारचें फळझाड आहे.

देशांतून अफाट समुद्र ओलांडून, दाणे टिपण्यास या बेटांत येतात. त्यांस या वेळेसच यावें हें कसें कळतें कोण जाणे. उन्हानें पिंगट झालेल्या झाडांवर त्यांच्या विस्तृत लांब पिसाऱ्याची विलक्षण शोभा दिसते."

"वानर झाडांवरून उड्या मारूं लागतात. झाडांच्या काळ्या खाद्यांवर बसले ह्मणजे, करडा रंग व काळें तोंड यामुळें मात्र वेगळे ओळखूं येतात. कित्येक शेंपूट वर अडकवून झोंके घेतात; कित्येक पिलें पोटाशीं धरून ह्या खांदीवरून त्या खांदीवर उड्या मारितात; या गरीब प्राण्यांस घातुक बंदुकीच्या आवाजाचें भय नाहीं. एखादा वेळेस दक्षिणेकडून आलेल्या नवीन पक्ष्यांच्या आवाजाची लकेरी झाडींतून दुरून ऐकूं येते. नदीचा ओघ फेंसाळून धबधब खडकाखालीं पडतो. तिच्या निवळ पाण्यांत झाडांचीं आणि माणसांचीं सुन्दर प्रतिबिंबें दिसतात. जवळच हजार पांचशें पावलांवर ती पुनःखडकावरून खालीं खोल उडी घेते. तेथें स्फटिकासारखी स्वच्छ पाण्याची चादर दिसूं लागते. पण, खालीं गेली ह्मणजे पुनः फेंसाळून मोठमोठ्या लाटा उठतात. पाण्याच्या आपटण्यानें एकामागून एक असंख्यात अव्यक्त ध्वनि उठतात. वाऱ्याच्या योगानें कित्येक मुळींच नाहींतसे होतात. व कित्येक मोठे होतात, त्यामुळें दूरचदूर घंटा वाजल्यासारखा आवाज ऐकूं येतो."

"वारा पाण्याच्या योगानें गार होतो. त्यामुळें उन्हाळ्यांत देखील नदीच्या कांठची जमीन हिरवी गार असते. या बेटांत पर्वतांवर सुद्धां असा देखावा फारच थोड्या ठिकाणीं असेल."

"तेथून कांहीं अंतरावर एक टेंकडी आहे. तीवर बसलें

ह्मणजे पाण्याची मौज दृष्टीस पडते. यारेक्ष्यानें समाधान होतें. दूर असल्यामुळें कर्कश आवाजानें कानठाळे न बसतां, बारीक मंजुळ ध्वनि ऐकूं आल्यामुळें संतोष होतो. उन्हाळ्यांत मी, लातूरबाई, मार्गारेट, पाल, आणि व्हर्जिनिया अशीं आह्मी खडकाच्या सावलीत विश्रांतीस जाऊं; व तेथेंच जेवायास बसूं. कांहीं यःकश्चित् दररोजचें काम करतेवेळेस सुद्धां व्हर्जिनिया हिचें चित्त परोपकार करण्याकडे असे. कांहीं एखादें फळ खालें ह्मणजे लागलीच त्याची बी तिनें रुजत घालावी; आणि ह्मणावें, 'याचें झाड होईल, आणि त्याचीं फळें वाटसरांस मिळतील. निदान पाखरांस तरी तीं खावयास सांपडतील.' एके दिवशीं पोपया खाल्ला, त्याच्या बिया तिनें खडकाजवळच पेरिल्या. लौकर तेथें बरींच झाडें उगवलीं आणि एकावर पोपयेही लागले. व्हर्जिनिया गेली तेव्हां हें झाड अगदीं सखल होतें, परंतु त्याची वाढ जोराची असल्यामुळें दोन वर्षांत वीस हात उंच झालें आणि त्याच्या शेंड्याजवळ पोपयांचे थरावर थर लागले. पाल एके दिवशीं तिकडे गेला होता; तेव्हां आपल्या आवडत्या मैत्रिणीनें लावलेल्या लहानशा बीचें एवढें मोठें झाड झालें, हें पाहून त्यास मोठा आनंद झाला. परंतु त्यामुळें त्यास तिच्या चिरकाल वियोगाचें स्मरण होऊन, तो लागलाच खिन्न झाला. जे पदार्थ आपल्या दृष्टीपुढें सर्व काळ असतात, त्यांच्या योगानें आपलें आयुष्य कसें जलद धांवत आहे हें कळत नाहीं. आपल्या सारखाच न कळत त्यांचाही ऱ्हास होत असतो. पूर्वी पाहिलेली वस्तु कांहीं वर्षे गेल्यावर पुनः पाहिली ह्मणजे आपले दिवस कसे भराभर संपताहेत हें पक्कें ध्यानांत येतें. एखादा प्रवासी फार दिवसांनीं स्वदेशीं

आला म्हणजे त्यांचे समवयी कोणी आढळत नाहींत. जीं तान्हीं मुलें स्तनपान करीत होतीं, तींच आई, बाबा, होऊन, संसार करूं लागतात; त्यांस पाहून, तो जसा चकित होऊन गुंगून जातो, त्याप्रमाणें पाल याची अवस्था झाली. व्हर्जिनिया हिच्या दुःखकारक चिरकाल वियोगाचें स्मरण करविणारें तें झाड तोडून टाकावें, असें पाल यास वाटलें. कधीं कधीं तें तिच्या परोपकारबुद्धीचें स्मारक आहे, असें मनांत येऊन तो त्याचे मुके घेऊं लागे, आणि मोठा पश्चात्ताप झाल्याप्रमाणें त्याशीं बोलूं लागे. खरोखर रोमशहरांतील विजयस्तंभांपेक्षांही हें झाड पाहिलें म्हणजे मला अधिक गहिंवर येतो, आणि याविषयीं विशेष पूज्यबुद्धि होते."

"आमच्या इकडच्या बाजूला आला असला म्हणजे या खोपयाजवळ पाल भेटावयाचाच, अशी माझी पूर्ण खात्री असे. एक दिवस तो अगदीं खिन्नवदन झालेला माझ्या दृष्टीस पडला. त्याचें माझें संभाषण झालें, तें मी तुम्हांस पाहिजे तर सांगतों. पण उगाच लांबचलांब विषयांतर करितों, असें तुम्हांस वाटेल. म्हातारपणामुळें व त्याचा माझा दृढ स्नेह होता, यामुळें, कदाचित् तुम्ही विषयांतराबद्दल फारसा दोषही लावणार नाहीं."

"पाल म्हणाला—मला अगदीं चैन पडत नाहीं. दोन वर्षें आणि दोन महिने व्हर्जिनिया हिला जाऊन झाले. गेल्या साडे आठ महिन्यांत तिच्याकडील कुशल वृत्त कांहीं कळत नाहीं. ती झाली श्रीमंत आणि मी आहें भिकारी. ती मला विसरली. तिच्याकडे जाण्याची मला फारच इच्छा आहे. मी फ्रान्स देशांत जाईन. राजाच्या दरबारीं रोजगार करीन. मग मी मोठा श्रीमंत वडा सरदार

झालें ह्मणजे, व्हर्जिनिया हिची आजी मोठ्याशीं तिचें लग्न करील."

"मीं ह्मटलें मित्रा, पण मी मोठ्या कुळांतला नाहीं, असें त्वां मला सांगितलें आहे."

"पाल—'माझ्या आईनें मला सांगितलें, बाकी मला मोठें कुळ ह्मणजे काय, हें देखील कळत नाहीं.'"

"मीं ह्मणालों,— कुलीनपणाशिवाय फ्रान्स देशांत मोठा रोजगार मिळण्याचीच पंचाईत. विशेष काय, पण, प्रतिष्ठित मंडळींत सुद्धां तुला कोणी घेणार नाहीं."

"पाल— 'किती करंटा मी आहें! प्रत्येक गोष्ट मला प्रतिकूळ होते. व्हर्जिनियापासून दूर राहून मोठ्या श्रमानें आंगाचें पाणीं करून, या हतभाग्य आयुष्याचे दिवस मला लोटले पाहिजेत.' असें बोलून त्यानें मोठा सुस्कारा टाकिला; आणि पुनः ह्मणाला, 'तिचे इष्टमित्र कुलीन गृहस्थास तिला देणार काय? बरें, ठीक आहे. विद्येच्या योगानें मनुष्य शहाणे आणि नामांकित होतात. मी रात्रंदिवस अभ्यास करून शास्त्रांमध्यें प्रवीण होईन, आणि आपल्या ज्ञानाला योग्य अशा रीतीनें देशाचें कल्याण करीन. स्वतंत्रतेनें वागून स्वसंपादित कीर्तीनें प्रसिद्ध होईन.'"

"मुला, कुलीनपणा आणि कीर्ति यांपेक्षांही बुद्धि फारच दुर्मिळ आहे. खरोखर बुद्धीसारखी हितकारक वस्तु दुसरी कोणतीच नाहीं. ती कोणालाही आपणापासून हरण करितां येत नाहीं. आणि तिच्या योगानें मनुष्य सर्व ठिकाणीं पूज्य व प्रिय होतो. पण तीपासूनसुद्धां कधीं कधीं पीडा होते. बुद्धिमान मनुष्यांस मान, अपमान, यांची चाड फार असते. त्यामुळें कित्येक प्रसंगीं त्यांस पुष्कळ त्रास होतो.

तूं मला सांगतोस कीं, मी लोकांचें कल्याण करीन; पण, मला असें वाटतें कीं, जो आपल्या निर्वाहापेक्षां शेतांत एक पेंढी जास्त उत्पन्न करितो तो ग्रंथकारापेक्षां लोकांवर पुष्कळ उपकार करितो."

"पाल—'असें आहे तर जिनें हा पोपया लाविला तिनें पुस्तकालय स्थापणाऱ्यांपेक्षां या जंगलांत राहणाऱ्या लोकांवर फार चांगला उपकार केला असें ह्मटलें पाहिजे.' असें बोलून आनंदानें दोन्ही हातांनीं त्या झाडास मिठी मारून त्याचे मुके घेऊं लागला. आणि ह्मणाला, 'व्हर्जिनिया हिच्या करितांच मी मोठेपणाची इच्छा करितों. तिला जगन्मान्य करावें असें मला वाटतें. पण तुह्मास पुष्कळ माहिती आहे, खरेंच सांगा बरें आमचें कधींतरी लग्न होईल काय? भविष्य जाणण्यास शिकलों असतों तर बरें झालें असतें, असें मला वाटतें. व्हर्जिनिया खचित परत येईल. तिला श्रीमंत नातलगांचें काय करावयाचें आहे? त्या झोंपड्यांमध्यें ती नेहमीं सुंदर आणि पूर्णसुखी असे. नुसता तांबडा रुमाल पांघरली आणि डोकींत फुलें घातलीं ह्मणजे ती चांगली सुशोभित दिसे. व्हर्जिनिया परत ये, ते आपले राजवाडे आणि ऐश्वर्य टाकून दे. त्या खडकाजवळ झाडांची सावली घेण्यास आणि आपलीं नारळीचीं झाडें पाहण्यास परत ये. हाय हाय! तुलाही कदाचित् तेथें चैन पडत नसेल.' असें बोलून रडूं लागला आणि पुनः ह्मणाला 'बाबा, मजपासून कांहीं लपवूं नका. तिच्याशीं माझें लग्न होईल किंवा नाहीं, हें तुह्मास सांगतां येत नसेल तर राहूं द्या. पण, एवढें सांगा कीं, तेथें तिच्या भोंवतालीं बडे लोकांचा गराडा असेल; राजाच्या पदरचे मोठमोठे लोक तिला पाह-

ण्यास येत असतील; अशा ठिकाणीं राहून ती मजवर प्रीति करीत असेल काय?' "

"मित्रा, माझी खात्री आहे कीं, ती अद्याप तुजवर खास प्रीति करिते, तिनें तुजवर प्रीति करावी यास पुष्कळ कारणें आहेत. सर्वांत हें मोठें कारण कीं ती सद्गुणी आहे. हें ऐकतांच तो आनंदानें माझ्या अंगावर लोळूं लागला."

"कांहीं वेळानें पुनः ह्मणाला, 'तुह्मी सद्गुण ह्मणालां तें काय?' "

"मुला निढळाच्या घामानें कुटुंबाचें पोषण तूं करितोस. तुला सद्गुणाचें लक्षण सांगण्याची गरज नाहीं. ईश्वरास संतुष्ट करण्याच्या इच्छेनें दुसऱ्याचें बरें करण्यास जो आपण यत्न करितों, त्याचेंच नांव सद्गुण. "

"तो ह्मणाला, 'तर मग व्हर्जिनिया ही फारच सद्गुणी आहे. सद्गुणांमुळेंच तिला संपत्ति मिळावी असें वाटतें. तिला वाटतें, संपत्ति मिळाली ह्मणजे, आपणास अधिक परोपकार करितां येतील. सद्गुणांमुळेंच ह्या बेटाचा तिनें त्याग केला. सद्गुणच तिला येथें परत आणितील. तिच्या परत येण्याची कल्पना मनांत येतांच, त्याचें मन उत्साहयुक्त होऊन, चेहरा प्रफुल्लित दिसूं लागला. त्याला वाटलें कीं, लौकरच परत यावयाचें आहे ह्मणून, व्हर्जिनिया हिनें पत्र पाठविलें नसेल; वारा चांगला लागला ह्मणजे, यूरोपांतून येण्यास फार वेळ लागत नाहीं. नंतर, कित्येक गलबतें पांच सहा हजार कोसांपासून दोन अडीच महिन्यांत देखील परत येतात; ह्मणून मला सांगूं लागला, त्याला वाटलें कीं, व्हर्जिनिया ज्या गलबतावरून येत आहे, तें कदाचित् दोन कोसांवर सुद्धां आलें असेल. गलबतें बांध-

णारे मोठे कुसबी व खलाशी फार हुशार असतात; असें त्या वेळेस त्यास वाटूं लागलें. नंतर व्हर्जिनिया आली ह्मणजे तिचें आगतस्वागत करण्याची तयारी कशी करावयाची, त्याच्या गोष्टी मजपाशीं बोलूं लागला. तिला एक नवीन घर बांधून द्यावयाचें, व ती आपली बायको झाल्यावर कशी ख्याली खुशाली करावयाची तें सांगूं लागला. ती आपली बायको होईल हें मनांत येतांच, तो आनंदसागरांत निमग्न झाला. आणि मला ह्मणाला, 'बाबा, मग मौजा मारण्याखेरीज तुह्मांस दुसरें कांहीं करावयास नको. व्हर्जिनिया श्रीमंत असल्यामुळें आपणांस हवे तितके शिद्दी लोक चाकरीस ठेवितां येतील. ते तुमचें सगळें काम करतील. तुह्मी नेहमीं आमच्या घरीं राहा. आणि स्वतःला रंजविणें व सुखोपभोग घेणें यांशिवाय दुसरी कोणतीही काळजी करूं नका.' असें बोलून घरांतील माणसांस हे मनोरथ कळविण्याकरितां आनंदाच्या भरांत त्यानें धांव मारिली."

"थोडक्याच वेळानें वरील मनोरथाचें भुरळ जाऊन, नानाप्रकारचे खेदकारक तरंग त्याच्या मनांत उठूं लागले. तीव्र मनोविकारांचा परिणाम बहुश: उलट असतो. हिरमुसलेलें तोंड करून पाल माझ्या घराकडे आला, आणि मला ह्मणाला, 'व्हर्जिनियाकडील कांहीं वर्त्तमान कळत नाहीं. ती यूरोपांतून निघाली असती तर निघाल्याबद्दल तिनें मला कळविलें असतें. तिच्याविषयीं मी बातम्या ऐकिल्या आहेत; त्या खऱ्या असाव्या, यांत संशय नाहीं. कोण्या एका बड्या सरदाराबरोबर तिच्या आजीनें तिचें लग्न केलें. लोकांप्रमाणेंच ती धनलोभानें फसली असेल. ज्या पुस्तकांत बाय-

कांचें हुबेहुब वर्णन केलें आहे, त्यांवरून सद्गुण हा विषय गोष्टींत लिहावयाचा मात्र असें दिसतें. व्हर्जिनिया सद्गुणी असती तर तिनें आपल्या आईला आणि मला टाकून दिलें नसतें. माझ्या मनांत नेहमीं तिच्याविषयींचे विचार घोळत असून, ती मुला कशी विसरली असती ? मी दुःखी आहें तरी ती सुखी आहे. हाय हाय! ह्या विचारानें तर माझें धैर्य अगदींच खचून जातें; कामाचा कंटाळा येतो; आणि कोणी मनुष्य जवळ नकोसें वाटतें. ईश्वर करील आणि हिंदुस्थानांत एकादी लढाई उत्पन्न होईल तर बरें होईल. मी तिकडे जाईन आणि मरेन.' "

"मी सांगितलें, 'मुला, ज्या धैर्यानें आपण मृत्यूला जवळ बोलावितों तें क्षणिक आहे. कित्येक वेळा मेल्यावर मागें कीर्ति व्हावी अशा शुष्क इच्छेनें तें उत्पन्न होतें. दुसरा एक प्रकारचा धीटपणा आहे तो मनुष्यांच्या अंगांत अवश्य पाहिजे. तो फार थोड्यांच्या अंगीं असतो. त्याच्या योगानें कोणाच्या मदतीशिवाय, अथवा वाखाणणी शिवाय, आपणांस संसारांतील नानाप्रकारचीं दुःखें सोसतां येतात, यालाच धीर असें ह्मणतात, लोकांच्या ह्मणण्याकडे लक्ष न देतां धीर धरून ईश्वराच्या इच्छेप्रमाणें वागतो, त्यासच सद्गुणी असें ह्मणावें.' "

"पाल—एकून तर मग माझ्या अंगांत सद्गुण नाहींत. हाय हाय! प्रत्येक गोष्ट मला दुःखानें दडपून टाकिते."

"मीं सांगितलें—सद्गुण एकसारखा स्थिर कोणाच्याच मनुष्याच्या ठायीं वसत नाहीं. मनाचा क्षोभ करणारे बहुत विषय आपल्या भोंवतालीं आहेत, त्यांच्या योगानें बुद्धीचा भ्रंश होऊन कांहीं कळत नाहींसें होतें. परंतु क्रियारूप

सतत प्रदीप्त दिव्याची आपणाजवळ ज्योत आहे, तिच्या योगानें बुद्धि पुनः प्रज्वलित करितां येते."

"मुला, विद्या ही ईश्वराची देणगी आहे; ज्या ज्ञानानें तो जगाचें नियमन करितो, त्या ज्ञानाचाच हा अंश आहे. दैविक प्रेरणेनेंच मनुष्यांस भूलोकीं ही प्राप्त झाली आहे. सूर्याप्रमाणेंच ही प्रकाश पाडिते; आनंद देते; आणि ज्ञानोष्णानें अज्ञान शैत्याचा नाश करून टाकिते. त्या तेजोरूप मूलतत्वाप्रमाणेंच हिच्या योगानें सर्व सृष्ट पदार्थ मनुष्यांस आपल्या उपयोगास लावितां येतात. विद्येच्या साहाय्यानें, सर्व वस्तु, सर्व स्थलें, सर्व माणसें, व सर्व काल, आपल्या डोळ्यांसमोर आणितां येतात. तिच्याच योगानें आपणांस विषयवासनेचें दमन करितां येतें; दुर्गुणांचा क्षय करितां येतो; आणि सद्गुणांची वृद्धि करितां येते. विद्या ही ईश्वराची कन्या आहे. दुःखाचें सांत्वन करून, मनुष्यांस आनंद देण्यास हिनें भूमीवर अवतार घेतला आहे."

"मुला, विद्येचा असा महिमा आहे; यासाठीं पुस्तकांचा आश्रय कर. ज्या सत्पुरुषांनीं पूर्वी पुस्तकें लिहून ठेविलीं आहेत, ते दुर्दैवाच्या मार्गांत आपल्यापुढें गेलेले प्रवासी होत. आपण निराश्रय झालों ह्मणजे, ते आपल्या तारल्या हाताचा आधार देऊन, आह्मांस आपल्या मंडळींत बोलावितात. चांगलें पुस्तक ह्मणजे चांगला मित्र होय."

पाल— "हाय हाय! **व्हर्जिनिया** येथें होती त्या वेळेस मला पुस्तकांची गरज नव्हती. मजप्रमाणेंच तीही कांहीं शिकली नव्हती. परंतु तिनें मजकडे पाहून, भाऊ अशी हाक मारिली ह्मणजे, मला दुःखाची वार्ताही नसे."

"मीं सांगितलें.— खरोखर, प्रीति करणाऱ्या स्त्रीसारखा

दुसरा मनाजोगता मित्र कोणताच नाहीं. स्त्रीच्या स्मितललित मुखाकडे पाहिलें ह्मणजे, सर्व चिंता अस्तंगत होतात, तिच्या कोमल मुखावर कांहीं चमत्कारिक मोहक शक्ति, आणि विश्वसनीयता आहे. असें कोणतें सुख आहे कीं, स्त्री विभागी असल्यावर तें वृद्धिंगत होत नाहीं? असा कोण पुरुष आहे कीं, स्त्रीचें हास्य पाहिल्यावर त्याची वक्र भ्रुकुटी नम्र होत नाहीं! स्त्रीच्या अश्रूंपुढें कोणाचा राग टिकणार आहे! व्हर्जिनिया तुजपेक्षां अधिक विद्वान् होऊन येईल. आजीच्या त्रासांत, आईपासून आणि तुजपासून दूर, असें असूनही ती बागेची काळजी करिते. तूं तर अजून बागेची कांहींच सुधारणा करीत नाहींस. ती आली ह्मणजे तूं अगदीं चकित होऊन जाशील."

"व्हर्जिनिया हिच्या लौकर येण्याची कल्पना मनांत येतांच तिच्या प्राणसख्यास उत्तेजन येऊन, तो पुनः धैर्यानें बागेचें काम करूं लागला. मनाप्रमाणें आपल्या श्रमांचें सार्थक होईल असें मनांत येऊन तो हौसेनें मेहनत करी."

"सन १७७४ दिसेंबर तारीख २४ रोजीं पाल सकाळीं निजून उठला. त्यावेळेस प्रेक्षणोच्चस्थल पर्वतावर पांढरा बावटा उभारलेला त्याच्या दृष्टीस पडला. समुद्रांत, दूर गलबत दिसूं लागलें ह्मणजे, लोकांस कळण्याकरितां, तेथें बावटा उभारण्याची वहिवाट होती. या गलबतावरून व्हर्जिनिया हिच्याकडील कांहीं वर्तमान कळेल ह्मणून पाल शहराकडे धांवत गेला. गलबत बन्दराजवळ आलें ह्मणजे किनाऱ्यावरील खलाशी लोक, कोणतें गलबत आलें वगैरे पाहण्याकरितां, होड्या घेऊन तिकडे जातात. ते परत येत तोंपर्यंत पाल वाट पाहत होता. होडीवाल्यांनीं येऊन

सुभेदारास वर्दी दिली कीं, **सेन्ट्जेरन** हें गलबत आलें आहे, त्यावर **ऑबिन तांडेल** आहे. या वेळेस सहा कोसांवर समुद्रांत गलबत आहे. वारा चांगला असल्यास उद्यां दोन प्रहरांनंतर **लुईस** बंदरात नांगर टाकण्यास येईल. या वेळेस समुद्र शांत आहे. नंतर त्यानें **फ्रान्सदेशां**तून आलेलीं कांहीं पत्रें सुभेदारास दिलीं. त्यांत एक **व्हर्जिनिया** हिच्या स्वदस्तूरचें **लातूरबाई**च्या नांवाचें पत्र होतें. पत्र पाहून **पाल** यास मोठा आनंद झाला. पत्र हातांत घट्ट धरून त्यानें घराकडे धांव मारिली. घरांतील माणसें **अत्यंतदर्शन** या जागीं उभीं राहून **पाल** याची वाट पहात होतीं; त्यांस पाहतांच पत्र दाखविण्यास त्यानें वर हात केला; धांवतांना दम कोंडल्यामुळें त्याच्या तोंडांतून शब्द उमटेना; लागलींच सर्व माणसें पत्र ऐकण्यास **लातूरबाई**च्या भोंवतालीं जमलीं. **व्हर्जिनिया** हिनें आईस असें लिहिलें कीं,– 'मला आजीनें फारच गांजिलें. माझ्या इच्छेविरुद्ध ती मला लग्न करण्यास आग्रह करीत होती; परंतु मी ऐकिलें नाहीं; तेव्हां तिनें दौलतीवरून माझा वारसा काढून टाकिला; आणि मुद्दाम अशा वेळेस मला परत पाठविलें कीं, तुफानाच्या वेळेस मीं **मोरिशिअस** येथें पोंचावें. मला आईचा लळा फार आहे, माझ्या लहानपणच्या संवयी वेगळ्या आहेत, वगैरे सांगून, तिचा क्रोध शमविण्यास मीं यत्न केला; तरी ती ह्मणाली कीं, 'तूं विलक्षण मुलगी आहेस; कल्पित कादंबऱ्या वाचून तुझ्या डोक्यांत वेड शिरलें आहे;' सगळ्या माणसांना डोळ्यांनीं पाहून, कडकडून भेटावें, या आनंदाशिवाय मला सध्या दुसरें कांहीं सुचत नाहीं. तांडेलानें होडींत बसण्यास परवानगी दिली असती तर हा माझा प्रिय

मनोरथ आजच सफळ झाला असता. समुद्र शांत आहे, तरी भरती असल्यामुळें व किनारा लांब असल्यामुळें तो हुकूम देईना.' "

"पत्र संपलें नाहीं तोंच सर्व माणसें '**व्हर्जिनिया** आली, **व्हर्जिनिया** आली,' असा आनंदघोष करून एकमेकांस आलिंगन देऊं लागलीं. **लातूरबाई पाल** यास ह्मणाली, 'मुला जा, आणि **व्हर्जिनिया** आली ह्मणून आपल्या शेजाऱ्याला सांग;' लागलींच **डोमिंगोनें** चूड लाविली आणि दोघेही माझ्या घरीं आले."

"या वेळेस सुमारें रात्रीचे दहा वाजण्याची वेळ होती. मी दिवा मालविणार होतों; इतक्यांत झरोक्यांतून रानांत उजेड दृष्टीस पडला. मी वर उठून पांघरूण वगैरे घेतों, इतक्यांत **पाल** आनंदानें अर्धवेडा झालेला धापा टाकीतच आला आणि मला कडकडां कवटाळून ह्मणाला, 'चला चला, **व्हर्जिनिया** आली आहे; आपण बंदराकडे जाऊं; सकाळीं गलबत नांगर टाकील.' "

"आह्मी लागलेच निघालों. डोंगराच्या वळचणीवरील रानांतून जाऊन **जंबीरबनो**कडून बंदरावर रस्ता जातो तिकडे गेलों, तों मागें कोणी चालत आलें, असें मला वाटलें. इतक्यांत एक शिद्दी धांवत धांवत आमच्या जवळ येऊन पोंहोचला. इतक्या घाईनें कोठें जातोस? ह्मणून मी त्यास विचारिलें. तो ह्मणाला, *स्वर्णधूलि ह्मणून जो या बेटाचा प्रदेश आहे तिकडून आलों. **फ्रान्सदेशां**तून एक गलबत आलें आहे, त्यानें **आंबर** बेटाजवळ नांगर टाकिला आहे; समुद्रांत मोठें तुफान उठलें आहे, आणि गलबतावरून दगा

* Golden Dust.

असल्यासारखे तोफांचे आवाज ऐकूं येत आहेत. ही बातमी सुभेदारास कळविण्याकरितां मला पाठविलें आहे. इतकें बोलून तो धांव मारून आमच्या पुढें लांब गेला."

"मीं **पाल** यास सांगितलें, चला, आपण व्हर्जिनिया हिला भेटण्यास तिकडे जाऊं. येथून तो प्रदेश सगळा चार कोस आहे. असें ह्मणून आह्मी तिकडे निघालों. उष्णतेनें आंगाची आग फार होत होती. चन्द्र उगवला होता; परंतु त्याच्या भोंवतालीं दोन तीन काळीं वर्तुळें होतीं. आकाश अंधकारानें आच्छादित झालें होतें. क्षणोक्षणीं विजा चमकत, त्यामुळें मात्र मोठमोठ्या भयंकर काळ्या कुळकुळित लांबचलांब ढगांच्या ओळींच्या ओळी दिसत. हे ढग वाऱ्यानें समुद्राकडून बेटाच्या मध्यभागीं एका ठिकाणीं भराभर धांवत येत होते. जमिनीवर तर आह्मांस वाऱ्याची झुळूक सुद्धां लागेना. चालत असतां विजेचा गडगडाट झाला, असें आह्मांस वाटे; परंतु लक्ष देऊन ऐकिलें तेव्हां असें ध्यानात आलें कीं, लांब तोफांचे आवाज होत आहेत; त्यांचा हा प्रतिध्वनि असावा. आकाशांत भयंकर वादळाचा देखावा पाहून व हे तोफांचे आवाज ऐकून, माझा थरकांप झाला. गलबतास धोका असल्याचे आवाज आहेत, अशी माझी खातरी झाली. अर्ध्या तासानें तोफा बंद झाल्या. तोफांच्या आवाजां पेक्षां त्यांच्या थांबण्याचेंच मला फार भय वाटलें."

"गुपचुप निमुटपणें आह्मीं पुढें चालूं लागलों. मध्यरात्रीस आह्मी किनाऱ्यावर जाऊन पोंहोचलों. लाटा धाड-धाड असा भयंकर शब्द करून किनाऱ्यावर आपटत होत्या; त्यांच्या फेसानें किनाऱ्यावरील दगड पांढरे शुभ्र होत, आणि

मधून मधून *ठिणग्या निघत, त्यामुळें आह्मांस काळोखांत मासे मारणारांच्या होड्या वाळूवर ओढलेल्या होत्या, त्या दिसत."

"किनाऱ्याजवळच्या झाडींत आह्मांस एक परसा दिसला. त्या भोंवतालीं कित्येक कोळी बसलेले होते. सकाळपर्यंत विश्रांति घेण्यास आह्मी तेथें गेलों. त्या मंडळीपैकीं एक ह्मणाला, 'पाण्याच्या भोंवऱ्यानें एक गलबत बेटाकडे वाहत येत आहे, असें संध्याकाळीं माझ्या दृष्टीस पडलें. पुढें रात्र झाल्यामुळें तें मला दिसेनासें झालें. पुढें चार घटकांनीं धोका असल्यासारखे तोफेचे आवाज ऐकूं येऊं लागले. परंतु समुद्र फार खवळलेला असल्यामुळें, कोणासही होडी लोटण्याची छाती होईना. थोड्याच वेळानें गलबतावरील अन्धक दिवा दिसूं लागला. त्यावरून असें वाटतें कीं लुईसबंदरांत शिरण्याकरितां प्रयत्नाधारभूशिराकडून गलबतें ज्यावीं लागतात, ती वाट चुकून किनाऱ्याच्या आणि आंबरबेटाच्या मधून हाकारल्यामुळें अगदीं कांठाजवळ आलें असावें. त्यास सांगतां येत नाहीं. परंतु असें असल्यास बारकसास मोठीच भीति आहे.' दुसऱ्या एकानें आह्मांस सांगितलें कीं, "मी या किनाऱ्याच्या आणि आंबर बेटाच्या मधल्या खाडींत पुष्कळदां गेलों आहें. आणि पाण्याचा ठावही काढिला आहे. तेथें गलबतास नांगर टाकण्यास कांहीं हरकत नाहीं. बंदरांत असल्याप्रमाणें गलबत तेथें सुरक्षित राहील.' तिसरा ह्मणाला, 'या खाडींत होडी देखील न्यालण्यास पंचाईत पडते. तेथें गलबत मुळीं या-

* फास्फरस हा एक रसायन शास्त्रांत प्रसिद्ध पदार्थ आहे. त्याच्या योगानें समुद्रकिनाऱ्यावर ह्या ठिणग्या उत्पन्न होतात. रात्रीस समुद्रकिनाऱ्यावरून चालतांना हा चमत्कार दृष्टीस पडतो.

वयांचेंच नाहीं. आंबरबेटाच्या पलीकडे गलबत नांगरलेलें मीं पाहिलें आहे. सकाळच्या प्रहरीं वारा चांगला लागला तर बंदरांत येईल, नाहींतर अवजार हाकारून चालूं तरी लागेल.' याप्रमाणें वेगळालीं मतें काढून ते अडाणी लोक खुशाल स्वस्थपणानें वादविवाद करीत होते. पाल आणि मी मात्र गपचुप बसलों होतों. पहांटपर्यंत आम्हीं तेथेंच होतों. पहांटेस धुकें फार पडलें त्यामुळें आम्हांस समुद्रांत कांहीं दिसेनासें झालें. किनाऱ्यापासून पाऊण कोसावर एक काळा ढग दिसत होता. लोकांनीं सांगितलें कीं, तेंच आंबरबेट. आम्ही बसलों होतों तेथल्या किनाऱ्याचें टोंक मात्र आम्हांस दिसत होतें; व ढग दूर झालें म्हणजे बेटामधल्या पर्वतांचीं शिखरें मात्र मधून मधून दिसत."

"सांत वाजण्याच्या सुमारास स्वारीचा पडघम वाजूं लागला. इतक्यांत सुभेदार **मानशुअर लाबरदोने** घोड्यावर बसून बरोबर एक बंदुकवाल्या शिपायांची टोळी व कांहीं दुसरे लोक आणि शिद्दी घेऊन आला. त्यानें शिपायांची रांग किनाऱ्यावर उभी केली; आणि सर्वांस आवाज काढण्यास सांगितलें. आवाज होतांच आम्हास पाण्यांत लहानसा उजेड दिसूं लागला. आणि तेथूनही तोफेचे आवाज होऊं लागले. गलबत फार लांब नाहीं, असें आम्हास कळलें. तेव्हां उजेड दिसत होता त्या बाजूकडे जाण्यास धांव मारिली. मोठें एक गलबत व त्याजवरील अवजारें, शीड वगैरे सामान आम्हांस दिसूं लागलें. गलबत इतकें जवळ होतें कीं, लाटांची गर्जना चालली होती तरी सुकाणावरील खलाशांचें बोलणें आम्हांस दुरून ऐकूं येत होतें. आपणांस मदत करण्यास लोक अगदीं जवळ आले आहेत.

असें गलबतावरील लोकांनीं पाहिलें, तेव्हां ते नेमानें तीन तीन मिनितांनीं तोफ मारूं लागले. थोड्याच्या अन्तरानें सर्व किनाऱ्यावर मोठमोठे परसे पेठविण्यास सुभेदारानें हुकूम दिला; आणि तक्ते, शेडे, पिपें, वगैरे सामान घेऊन यावें ह्मणून सर्व लोकांस बोलावणें पाठविलें. शिद्दी लोकांच्या डोक्यावर सामानाचीं ओझीं देऊन लोकांचे थव्यांचे थवे येऊन पोंहोचले. एक फार ह्मातारा गृहस्थ सुभेदाराजवळ येऊन ह्मणाला, 'रात्रभर डोंगरांतून व रानातून सोसाटा ऐकूं येत आहे; वाऱ्याशिवायच झाडांचीं पानें हालतात; समुद्रावरचे पक्षी जमिनीकडे येऊं लागले; हीं सर्व वादळाचीं पूर्व चिन्हें आहेत.' "

"सुभेदार --गडेहो, 'बेतली खरी, आतां आपण तयारच आहों- आणि खरोखर कल्लाशीही तयारच असतील."

"वादळाचीं पूर्व चिन्हें झालीं; खस्त्रिकाजवळचे ढग भयंकर काळे दिसूं लागले; कांहींच्या बाजू तांबूस रंगाच्या दिसूं लागल्या; धुक्यामुळें साफ दिसत नव्हतें तरी सर्व पक्षी क्षितिजाकडून बेटाच्या मध्यभागीं जमूं लागले; त्यांच्या शब्दांनीं आकाश गजबजून गेलें."

"डोंगरावरून पाण्याचा लोंढा आपटत यावा आणि त्यांतच विजेचा गडगडाट व्हावा. याप्रमाणें नऊ वाजण्याच्या सुमारास समुद्राकडून एक मोठी दणक्याची गर्जना ऐकूं आली. 'वादळ आलें, वादळ आलें,' ह्मणून एकच चोहोंकडे ओरड झाली. लागलीच मोठी एक वाहुटळ उठली तिनें आंबरबेट आणि खाडी यांवरील सर्व धुकें उडवून टाकिलें. सेन्टजेरन आह्मांस स्पष्ट दिसूं लागलें. त्याच्या सज्जावर लोकांची गर्दी झाली होती. लहानमो-

त्या सर्व डोलकाठ्या तोडून फळ्यांवर आडव्या टाकिल्या. गलबतावरील बांबूंचे फडाफड उडून फाटून तुकडे होऊन दोऱ्यांतून गुरपटले. किनारा आणि आंबरबेट यांमधील खाडींत गलबत नांगरलें होतें. त्या बेटाभोंवतालीं मोठमोठे खडक आहेत. आजपर्यंत या जागीं एकही गलबत गेलें नव्हतें. लाटांकडे नाळ फिरविली होती. लाट समूर आंगावर घुसून आली ह्मणजे उंच उडून गलबताचा तळ असा काय आकाशांतच आहे, असें दिसे. आणि लाट गेली ह्मणजे वरची बाजूही खालीं बसून दिसत नाहींशी होऊन गलबत बुडालेंसें वाटे. अशा स्थितींत वाऱ्यानें आणि लाटांनीं किनाऱ्याकडे लोटून दिल्यामुळें गलबतास आल्या वाटेनें परतही जातां येईना. एकापेक्षां एक लाटा मोठ्या उठून गर्जना करीत गलबतावरील फळ्यावगैरे पन्नास हातांवर जमिनीवर आणून टाकीत. आणि जोरानें घुसून परत जाऊं लागल्या ह्मणजे मोठमोठाले धोंडे लोटून परत नेत. आणि लागलाच किनारा उघडा पडे. वाऱ्याच्या सोसाट्यानें समुद्र अधिकाधिक फुगून उंच होऊं लागला. हें बेट व आंबरबेट यांमधील खाडी फेसाळून एक मोठें पांढरें मैदानच दिसूं लागलें. लाटांमुळें मात्र मध्यें मध्यें काळे खडक दिसत. फेस खदखदून पांचपांच सहासहा हात उंच होई आणि वाऱ्यानें किनाऱ्यावर अर्ध कोस पर्यंत उडून जाई. यावेळेस समुद्र अगदीं आकाशास लागल्यासारखा दिसे. त्यांतून, फेसाचे पांढरे शुभ्र पुंजके निघून पर्वतापर्यंत जात, त्यामुळें बर्फ पडल्यासारखें दिसे; मोठाले भयंकर ढग पाखराच्या वेगानें खस्वस्तिकाकडे धांवत होते. कित्येक खडकांसारखे स्तब्ध दिसत होते. आकाशतळ तिळमात्रही

स्वच्छ दिसत नव्हतें. एक फिकट पिंवळा तेजोमय गोलक दिसत होता. त्याच्या उजेडानें पृथ्वी, समुद्र व आकाश यांवरील पदार्थ दिसत होते."

"गलबत मोठ्यानें झटके खाऊं लागून ज्यास आम्ही भीत होतों तेंच झालें. नांगराच्या दोऱ्या तुटल्या. एका नांगरावर गलबत राहिलें; तेव्हां किनाऱ्यापासून थोड्याच अंतरावर एकाएकीं ताडकन खडकावर आदळलें. पाहुणाऱ्यांनीं भयानें एकच ओरडाओरड करून सोडिली. पाल समुद्राकडे धांवूं लागला, त्याचा हात धरून मी ह्मणालों, 'तुला मरावयाचें आहे काय?' तो ह्मणाला, 'मेलों तरी बेहत्तर आहे. परंतु, तिचें रक्षण करण्यास मला जाऊं द्या.' निराशेनें त्याचें देहभान सुटलेंसें पाहून, त्याला वांचविण्याकरितां **डोमिंगो** व मी दोघांनीं त्याच्या कंबरेस दोरी बांधिली, आणि दोघे दोन शेवटें धरून बसलों. पाल गलबताकडे जाण्यासाठीं धांव मारून समुद्रांत उडी टाकूं लागला. पाणी आलें ह्मणजे पोहूं लागे आणि लाट परत गेली ह्मणजे खडकावर चालूं लागे. लाट परत जाऊन जमीन उघडी पडली ह्मणजे त्यास वाटे आतां आपण गलबताजवळ जाऊं. परंतु पुनः दुसऱ्या लाटा जोरानें आल्या ह्मणजे तेथें ताडभर पाणी होई; आणि गलबत आकाशांत उंच जाई; लाटा पुनः हतभाग्य पाल यास दूर, मागें आणून टाकीत. त्याचे पाय रक्तबंबाळ झाले. छातीवर जखमा पडून अर्धमेला झाला."

"शुद्धीवर आलानआला, ह्मणजे लागलाच पुनः वेगानें गलबताकडे जाऊं लागे. गलबताचे तर या वेळेस लाटांच्या धक्यांनीं दोन तुकडे होत होते. संरक्षणाची निराशा

होऊन खलाशी लोकी फळ्या, तक्ते, टेबलें, पिपें, जें सांपडेल तें घेऊन एकामागून एक भराभर समुद्रांत उड्या टाकूं लागले. या वेळेस संतत कळवळा उत्पन्न करण्यासारखी एक वस्तु आमच्या दृष्टीस पडली. सेंटजेरनच्या परच्या बाजूच्या सज्जावर, जो आपल्यास तारण्यास इतके प्रयत्न करीत आहे त्याकडे हात लांब करून, उभी राहिलेली एक तरुण स्त्री आम्हीं पाहिली. ही व्हर्जिनियाच होती. धाडसावरून तिनें आपल्या प्रिय सख्यास ओळखिलें. ही सुन्दर स्त्री अशा धोक्यांत सांपडलेली पाहून, निराशेनें आमची बोबडी वळून गेली. व्हर्जिनिया निग्रही व धैर्ययुक्त मुद्रेनें हात हालवीत होती; जशी काय ती आह्मांस शेवटला सलाम करीत होती. सगळ्या खलाशांनीं उड्या टाकिल्या, एक मात्र धिप्पाड धैर्यवान् पुरुष नागवा उघडा वरती राहिला. तो मर्यादेनें व बहुमानानें तिच्याजवळ गेला. आणि पायांवर डोकें ठेवून नाक घांसून वस्त्रें टाकण्याविषयीं विनंती करूं लागला. व्हर्जिनिया हिनें नम्रतेनें त्यास झिटकारून दुसरीकडे तोंड फिरविलें. तेव्हां 'तिला तार, तिला सोडूं नको' अशी पाहणाऱ्या लोकांनीं एकच गर्दी केली. इतक्यांत आंबर बेट व किनारा यांमध्यें एक पर्वतासारखी मोठी फेंसाळलेली लाट आली आणि गर्जना करीत गडबडत त्या फुटक्या गलबताकडे चालली. हें महाभयंकर प्रकरण पाहून त्या मनुष्यानें समुद्रांत उडी टाकिली. व्हर्जिनिया हिनें मृत्यु अनिवार्य आहे असें पाहून, आपला एक हात वस्त्रावर व दुसरा हृदयावर ठेविला. आणि आपले रमणीय नेत्र आकाशाकडे लाविले. या वेळेस ही आकाशांत उड्डाण करण्यास

"हाय हाय ! काय तो भयंकर दिवस ! त्या निर्दय लाटांनीं सर्व गर्क करून टाकिलें ! कित्येक धाडशी लोक दयेनें व्हर्जिनिया हिला तारण्यास पुढें गेले होते. त्यांस, व तिचा जीव वांचविण्याकरितां यत्न करीत होता त्या खलाशास, लाटांनीं किनाऱ्यावर फेंकून दिलें. हा मनुष्य मृत्यूच्या तोंडांतूनच सुटला. परंतु किनाऱ्यावर आल्यावर साष्टांग नमस्कार घालून ह्मणाला, 'देवा, त्वां मला वांचविलें. पण त्या गरीब मुलीकरितां, मी आपला जीव हौसेनें देईन ' पाल तर अगदीं बेशुद्ध झाला. त्याच्या नाकातोंडांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. डोमिंगो आणि मी दोघांनीं त्यास किनाऱ्यावर आणिलें. सुभेदारानें त्यास वैद्याच्या स्वाधीन केलें. आह्मी व्हर्जिनिया हिचें प्रेत शोधूं लागलों, परंतु बहुतकरून तुफानाच्या वेळेस वारा वरच्यावर बदलतो त्यामुळें आमचें शोधणें व्यर्थ झालें. तेव्हां आह्मांस वाटलें कीं, या मुलीचे प्रेतसंस्कार करण्याचें देखील आमच्या कपाळीं नाहीं."

"भयानें आमचें हृदय व्यापून टाकिलें. शेंकडों लोक गलबत फुटून बुडाले, तरी आह्मांस त्या एका भयंकर नाशामुळेंच फार शोक झाला."

"इतक्यांत पालही कांहींसा शुद्धीवर आला. घरीं नेण्यासारखा होईपर्यंत त्यास जवळच्या एका घरीं नेलें होतें. तेथें डोमिंगो व मी, गेलों आणि लातूरबाई व तिची मैत्रीण यांस ही भयंकर वार्त्ता कळविण्यास जाण्याचा निश्चय केला. ताल्न्यजनीं नदीच्या खिंडीजवळ जाऊन पोंहोंचलों तों तेथें कांहीं शिद्दी लोक भेटले. त्यांनीं सांगितलें कीं,

चीं पुष्कळ प्रेतें लागलेलीं आहेत. आह्मी तिकडच्या बाजूस उतरून किनाऱ्याकडे गेलों, तों पहिल्यानेंच व्हर्जिनिया हिचें प्रेत माझ्या दृष्टीस पडलें. आंग वाळूनें भरलें होतें तरी बुडण्याचा वेळेस ज्या स्थितींत आम्ही तिला पाहिलें होतें, तशीच्या तशीच ती होती. तिची मुद्रा बदललेली नव्हती. डोळे मात्र मिटलेले होते. चेहरा अगदीं शांत होता. परंतु गालांवरील तारुण्याचा प्रफुल्लितपणा जाऊन प्रेतकळेचा फडफडीतपणा आला होता. एका हातानें वस्त्र धरलेलें होतें; व दुसरा हात उरावर इतका चिकटलेला होता कीं, मोठ्या जोरानें तिच्या मुठींतून मीं एक डबी काढिली. जीवांत जीव आहे तोंपर्यंत याला विसरणार नाहीं, असें ज्या विषयीं तिनें वचन दिलें होतें तें, पाल यानें दिलेलें चित्र त्या डबींत पाहून, मला मोठा गहिंवर आला. त्या दुर्दैवी मुलीचें तें विश्वसनीयतेचें व कोमलपणाचें चिन्ह पाहून, मला ढळढळां रडूं येऊं लागलें. डोमिंगोनें तर धडाधड छाती बडवून घेऊन, ओरडून ओरडून, आकाश पाताळ एक करून टाकिलें. व्हर्जिनिया हिचें प्रेत आम्हीं एका कोळ्याच्या झोंपडीजवळ नेलें, आणि तेथें एक गरीब मलबारकडील बाई होती, तिला वाळू वगैरे धुऊन साफ करण्यास सांगून, आह्मी कांपत कांपत घराकडे जाण्यास निघालों."

"गलबतावरील बातमी लौकर कळावी ह्मणून, लातूरबाई व मार्गारेट ईश्वराची प्रार्थना करीत बसल्या होत्या. मला पाहतांच 'माझी मुलगी, माझी लाडकी मुलगी कोठें आहे!' असें लातूरबाई मोठ्यानें बोलली. माझा निमूटपणा व अश्रुपात पाहूनच तिला आपलें नशीब फुटलें, असें सम-

जलें. श्वास कोंडून ती अगदीं गुदमरून गेली. तिचें रडणें देखील कन्हण्यासारखें बारीक येऊं लागलें. इतक्यांत 'माझा मुलगा कोठें आहे? मुलगा दिसत नाहीं.' असें ओरडून मार्गारिटही मूर्छित झाली. तिला सावध करण्यास आह्मी गेलों, आणि थोड्या वेळानें ती सावध झाल्यावर तिला सांगितलें कीं, तुझा मुलगा सुरक्षित आहे. सुभेदारानें त्याची तजवीज नीट केली आहे. इतकें ऐकिल्याबरोबर ती आपल्या मैत्रिणीला सावध करूं लागली. तीही मोठा वेळ मूर्छित होती. लातूरबाई रात्रभर असे विलाप करित होती कीं, त्यांवरून मातृदुःखासारखें दुसरें कोणतेंच दुःख नाहीं, अशी माझी खात्री झाली. शुद्धीवर आल्यावर ती ग्लानमुख करून एकसारखी आकाशाकडे पाहूं लागली. तिची मैत्रीण आणि मी यांनीं तिचे हात धरून, पुष्कळ विनवण्या केल्या; पुष्कळ सांत्वन करणारीं भाषणें बोललों, पण, सर्व व्यर्थ. एकसारखा ऊर धड धड उडून ती सुसकार टाकीत होती."

"सकाळीं मेन्यांत बसवून पाल यास घरीं आणिलें. तो शुद्धीवर आला होता; तथापि, त्याच्यानें एक शब्द देखील बोलवेना. आईला व लातूरबाईला पाहिल्यावर काय पंचाईत होईल कोण जाणे, अशी मला दहशत पडली होती. परंतु एकंदर मला वाटलें होतें, त्यापेक्षां, बराच परिणाम झाला. त्याला पाहिल्यावर आयांचें कांहींसें लेशमात्र सांत्वन झाल्यासारखें वाटूं लागलें. तो येतांच त्या त्यास भेटण्यास धांवून गेल्या आणि शोकानें नेत्र शुष्क झाले होते, तरी दोन्ही हातानीं कवटाळून त्याचें सर्वांग त्यांनीं अश्रूनीं न्हाणिलें. पालही त्यांजबरोबर रडूं लागला. याप्रमाणें

रोदनानें शोकक्षोभ कमी झाल्यावर पुष्कळ वेळपर्यंत तीं मुर्छा आल्याप्रमाणें निचेष्ट पडलीं होतीं."

"मानशुअर लाबरदोने यानें मला गुप्तपणें सांगून पाठविलें कीं, 'व्हर्जिनिया हिचें प्रेत शहरांत नेण्यास मीं हुकूम केला आहे. तेथून त्यास जंबीरबनच्या देवळाजवळ नेऊं' मी मोठ्या त्वरेनें लुईसबन्दराकडे गेलों, तेथें प्रेतावरोबर जाण्यास हजारों लोकांचे घोळकेचे घोळके चोहोंकडून जमा झाले होते. सर्व बेटाचा एक उत्तम अलंकारच गेला, असें सर्वांस वाटत होतें. बंदरांतील गलबतें बावटे उभारून कांहीं नेमलेल्या अंतरानें तोफांचे आवाज काढीत होतीं. संत्री बंदुकी आडव्या करून पुढें चालूं लागले. पडघम वगैरे वाद्यें शोकस्वराच्या नादावर वाजूं लागलीं; बेटांतील मोठ्या कुलीन घराण्यांतील आठ स्त्रिया हातांत ताडाचे पंखे घेऊन, आपल्या प्रियकर मैत्रिणीची तिरडी धरून चालल्या. खंड्यावर फुलें घालून तिरडी सुशोभित केली होती. त्यांच्या मागून मुलें गाणीं ह्मणत चाललीं होतीं. त्यांच्या मागून सुभेदार, लष्करी शिपाई बरोबर घेऊन चालला, व त्यांच्या मागून बेटांतील सर्व मुख्य मुख्य बडे लोक व इतर लोक चालूं लागले."

"व्हर्जिनिया हिच्या सद्गुणांस योग्य मान मिळावा ह्मणून बेटांतील पुढारी लोकांनीं हा थाट मुद्दाम करविला होता. या डोंगराच्या पायथ्याजवळ आल्यावर ज्या झोपड्यांस अलंकारभूत आणि पूर्ण सुखदायक ही मुलगी झाली होती; व जिच्या नाशानें त्यांतील माणसें ह्या वेळेस निराश झालीं होतीं; त्या झोंपड्यांकडे नजर जातांच सर्व गीतें, वाद्यें बंद झालीं. जिकडे तिकडे दुःखाचे सुसकारे व विलापाच्या

आरोळ्या चोहोंकडे ऐकूं येऊं लागल्या. जवळच्या वस्तींतील मुलींचे थव्यांचे थवे साधूप्रमाणें व्हर्जिनिया हिची स्तुति करीत, वस्त्रें, फुलांच्या जाळ्या, माळा, वगैरे घेऊन कल्याणार्थ तिच्या दर्शनास आल्या. असें मूल असावें म्हणून आया देवाची प्रार्थना करूं लागल्या. अशी पतिव्रता, विश्वासू बायको मिळावी म्हणून, पुरुष प्रार्थना करूं लागले. असा दयाळू मित्र मिळावा म्हणून, गरीब लोक प्रार्थना करीत, आणि चाकर लोक अशी कृपाळू धनीण मिळावी म्हणून देवाजवळ मागणें मागत."

"प्रेत पुरावयाच्या जागीं येऊन पोहोंचलें. तेव्हां **मादागास्कर** बेटांतील शिद्दिणी व **मोझांबिक** ऐथील **काफ्री** लोकांच्या बायका फळांनीं भरलेल्या टोपल्या प्रेतापुढें ठेवून, आपल्या देशचालीप्रमाणें जवळच्या झाडांवर वस्त्रें टांगून ठेवूं लागल्या. **बंगाल** व **बहार** प्रांतांकडील लोक, पिंजरे आणून बंदींत टाकिलेल्या पक्ष्यांस तिच्या प्रीत्यर्थ मुक्त करूं लागले. याप्रमाणें अनेक देशांतील लोकांस या सुंदर मुलीच्या मरणानें वाईट वाटलें. अनेक प्रकारच्या धर्माप्रमाणें प्रेतसंस्कार या दुर्दैवी सद्गुणी मुलीचे झाले."

"**जंबीरबन**च्या देवळाजवळ बांबूच्या झाडीच्या पश्चिम बाजूस तिला पुरलें. प्रार्थनेहून परत येतांना आई आणि **मार्गारेट** यांबरोबर, ज्यास आपला भाऊ म्हणे त्याजवळ बसून ती तेथें विश्रांति घेत असे."

"स्मशानांतून परत येते वेळेस सुभेदार येथें आला; त्याबरोबर आणखी पुष्कळ लोक होते. माझ्यानें होईल तितकें साहाय्य करीन, असें त्यानें **लातूरबाई** व तिची मैत्रीण यांस सांगितलें. तुमच्या क्रूर मावशीनें फारच वाईट आचरण

केलें, याबद्दल आम्हांस फार वाईट वाटतें. असें बोलून तो पाल याजकडे वळला; आणि त्याचें सांत्वन करण्याकरितां पुष्कळ समजावून सांगूं लागला. तो ह्मणाला, 'परमेश्वरास माहीत आहे. तुझें आणि तुझ्या कुटुंबाचें कल्याण करावें, अशी माझी इच्छा होती. मित्रा, तूं फ्रान्स देशास जा. मी शिफारस करून तुला रोजगार देववीन, आणि तुझ्या पाठीमागें मी आपल्या आईसारखा तुझ्या आईचा सांभाळ करीन,' असें बोलून हातावर हात देण्यास तयार झाला, तों पाल मागें सरला आणि त्याजकडे पाहवेना ह्मणून त्यानें एकीकडे तोंड फिरविलें."

"आपल्या हतभाग्य मैत्रिणीला आणि पाल याला कांहींसें बरें वाटावें ह्मणून मी त्यांच्याच घरीं राहिलों. मित्राच्या सान्निध्यानें दुःख नष्ट न झालें तरी किंचित् सुसह्य होतें. तीन महिन्यांनीं पाल यास पाऊल टाकण्याची शक्ति आली. परंतु त्या मानानें त्यांचें मन अधिकाधिक खचत चाललें. त्याला कांहीं कळेनासें झालें. त्याचे डोळे वेड्यासारखे दिसूं लागले. कोणी बोललें तरी त्यानें उत्तरच करूं नये. लातूरबाई मरणोन्मुख झाली होती; ती त्यास ह्मणाली, 'मुला, तुला पाहिलें म्हणजे व्हर्जिनियाच आली असें मला वाटतें.' व्हर्जिनिया हिचें नांव घेतांच अंगावर कांटा उभा राहून तो, थरथरां कांपूं लागला, आणि आई आपल्या मैत्रिणीजवळ जाऊन बसावयास विनवण्या करीत असतां तिच्या पासून झटकर दूर पळूं लागला. बागेंत इकडे तिकडे भडकून 'व्हर्जिनिया' हिच्या नारळाजवळ पाण्याकडे पहात स्तब्ध बसे. सुभेदाराचा एक वैद्य होता; तो पाल व त्याचीं माणसें यांविषयीं फार दयाळू असे; त्यानें

सांगितलें होतें कीं, कांहीं एक अडथळा न करितां त्याला वाटेल तें करूंद्या. एरव्हीं त्याच्या मनांतील खिन्नता भोंवून तो बोलूं लागणार नाहीं. त्यानें सांगितल्याप्रमाणें करण्याचा आह्मीं निश्चय केला. थोडी शक्ति आल्याबरोबर पहिल्यानें पाल घरापासून दूर जाऊं लागला. त्याला आपल्या डोळ्यां आड होऊं द्यावयाचें नाहीं; असा निश्चय करून मीही त्याच्या मागून फिरण्यास निघालों; आणि कांहीं खावयास घेऊन आमच्या बरोबर असण्यास डोमिंगोस सांगितलें. डोंगरावरून खालीं उतरला तेव्हां पाल यास कांहीं अधिक शक्ति व उत्साह आलासें दिसूं लागलें. तो जंबीरबनच्या रस्त्याकडे जाऊं लागला; आणि देवळाजवळ गेल्यावर कळकांच्या बेटाजवळ नवीन केलेला मातीचा ढिगारा जेव्हां त्याच्या दृष्टीस पडला तेव्हां साष्टांग नमस्कार घालून आकाशाकडे डोळे लावून मोठा वेळ देवाची प्रार्थना करूं लागला. त्यावरून मला वाटलें कीं, हा आतां चांगला शुद्धीवर आला. कारण, सर्वशक्तिमान् परमेश्वरावर विश्वास बसणें ही चित्तवृत्ति नीट असण्याची खूण आहे. याप्रमाणें डोमिंगो आणि मी दोघेही नमस्कार घालून, प्रार्थना करूं लागलों. प्रार्थना करून उठल्यावर तो आमच्याकडे लक्ष न देतां, बेटाच्या उत्तर बाजूकडे चालला. मला ठाऊक होतें कीं, व्हर्जिनिया हिला कोठें पुरलें हें त्याला माहीत नव्हतें. इतकेंच नाहीं; पण, तिचें प्रेत सांपडलें किंवा नाहीं हेंही त्यास कळलें नव्हतें. ह्मणून मीं त्यास बांबूच्या झाडीजवळ प्रार्थना करण्याचें कारण विचारिलें. तेव्हां तो ह्मणाला 'आह्मी तेथें पुष्कळ वेळ बसत होतों.' तो एकसारखा पुढें चालतच होता; रान संपत आलें; तेथें रात्र झाली. आग्रह करून

मीं त्यास थोडें खाऊं घातलें, आणि झाडाच्या बुडाशीं गवतावर सर्व अराम्स निजलों. दुसरे दिवशीं लॅबोरडोनचें देऊळ व त्याच्या भोंवतालची मैदानावरील झाडी यांकडे बराच वेळ पहात होता. नंतर चालूं लागलों. त्यावेळेस आम्हांस वाटलें कीं, आतां हा परत घराकडे चालला. परंतु रानांत गेल्यावर पुनः उत्तरेकडेच वळला. त्याचा बेत मला कळून आला, ह्मणून मी त्यानें तिकडे न जावें, याविषयीं प्रयत्न करूं लागलों. परंतु, कांहीं उपाय चालेना. दुपारच्या प्रहरीं आह्मी स्वर्णधूलि नांवाच्या जाग्यापाशीं पोहोंचलों, तेव्हां तो सेंटजेरन जेथें फुटलें होतें त्याच्या समूरच्या किनाऱ्याकडे जाऊं लागला. या वेळेस खाडीचें पाणीं अगदीं संथ होतें. त्याकडे व आंबर बेटाकडे पाहतांच 'व्हर्जिनिया, व्हर्जिनिया' असें ह्मणून पाल बेशुद्ध होऊन पडला. डोमिंगो आणि मी दोघांनीं उचलून त्यास झाडांत नेलें. तेव्हां मोठ्या पंचाईतीनें तो पुनः शुद्धीवर आला, आणि पुन्हा किनाऱ्याकडे जाऊं लागला. मीं त्यास शपथ घालून सांगितलें कीं; पुनः पुन्हा असें दुःखकारक स्मरण करून आपल्या व आमच्या यातना वाढवूं नको. असें सांगितल्याबरोबर तो दुसरीकडे जाऊं लागला. आठ दिवसांत तो आपल्या बालपणच्या मैत्रिणीबरोबर जेथें जेथें ह्मणून गेला होता, त्या सर्व ठिकाणीं फिरला. दासीसाठीं क्षमा मागण्यास काळे नदीवर ज्या वाटेनें ती गेली होती तेथें गेला; तेथून पुनः त्रिकूट पर्वताकडे न्याहाळून पाहूं लागला. तेथेंच तीं वाट चुकल्यामुळें पुष्कळ चालून थकून विश्रांतीस बसलीं होतीं. त्या सर्व त्याचें मन अस्वस्थ करणाऱ्या बसण्याच्या जागा, खेळ, जेवणें, त्याच्या लाडक्या व्हर्जिनियानें केलेले परोप-

कार, उतरत्या पर्वताच्या कड्यावरील नदी, माझें घर, जवळचा धबधबा, तिनें लावलेलें पपयाचें झाड, ती ज्या शेवाळलेल्या जमिनीवरून धांवत असे तीं पाणोठ्याजवळची जमीन, जेथें ती गात बसे तीं लतागृहें, या सर्व वस्तु निराश झालेल्या पालास एकसारख्या रडवूं लागल्या. एकमेकांच्या शब्दांचे प्रतिध्वनि ऐकून जेथें त्यास मोठा आनंद होत असे, तेथें 'व्हर्जिनिया, अगे माझे लाडके व्हर्जिनिया'! असा दुःखकारक प्रतिध्वनि मात्र ऐकूं येऊं लागला."

"तो असा भ्रमिष्टासारखा वागत असतां, त्याचे डोळे खोल गेले; अंगावर अगदीं फिकट पिंवळेपणा आला; आणि दिवसेंदिवस त्याची शक्ति क्षीण होत चालली. पूर्व सुख आठवलें ह्मणजे वर्तमान दुःख फारच असह्य होतें, व एकांत स्थलीं मनोविकारांस फारच जोर येतो; अशी खात्री होऊन मीं आपल्या दुर्दैवी मित्रास, त्याच्या दुःखाचें स्मरण करणाऱ्या वस्तूंपासून दूर बेटांत भरवस्तीच्या प्रदेशांत कोठें तरी घेऊन जाण्याचा निश्चय केला." या उद्देशानें मी त्यास **वुइलियम** नांवाच्या प्रदेशाकडे घेऊन गेलों. हा प्रदेश यानें कधींही पाहिला नव्हता. तेथें शेतकी व व्यापार यांचे पुष्कळ प्रकारचे कारखाने असल्यामुळे चोहोंकडे गजबजलेला असे; एकीकडे सुतार लांकडें तासीत होते; दुसरीकडे आरेकस तक्के चिरीत होते; रस्त्यांतून गाड्या इकडून तिकडे जात येत होत्या; मैदानांत शेकडों झोंपड्या बांधिल्या होत्या; त्यांच्या भोंवतालून हजारों बैल व घोडे चरत होते, कित्येक ठिकाणीं उंचवट्यावरून **यूरोपां**तील झाडें लाविलीं होतीं. शेतें पिकून पिंवळीं लोंबरें व कणसें वाऱ्यानें झुळझुळ हालत होतीं. रस्त्यांच्या बाजूस नानाप्रकारच्या वेली वाढलेल्या

होत्या. हवा चांगली असल्यामुळें तेथें राहणाऱ्या यूरोपियन लोकांच्या प्रकृति सुदृढ होत्या. ही उंचवट्याची जागा कांहींशी मध्यभागीं असून भोंवतालीं मोठमोठालीं अरण्यें आहेत, यामुळें तेथून लुईसबंदर, जंबीरबैनचें देऊळ, वगैरे व्हर्जिनिया हिचें स्मरण करणारी कोणतीही वस्तु पाल यास दिसत नव्हती. लुईसबंदराकडे गेलें ह्मणजे, पर्वताच्या अनेक प्रकारच्या आकृति दिसूं लागतात; परंतु, या मैदानांतून एक लांबचलांब सरळ, उंच, लंबाकृति, भूशिर मात्र दिसून त्यावरील मोठमोठाल्या खडकांच्या शिखरांवर मेघ विश्रांति घेत आहेत असें दिसतें."

"या जागीं मीं पाल यास नेलें, आणि नेहमीं कांहीं तरी उद्योग काढून त्यास स्वस्थ वसूं दिलें नाहीं. फिरे झाडींत, रानांत औसाडींत जाऊन, चालण्यामुळें पुष्कळ श्रम झाले; आणि वाट माहीत नाहींशी झाली ह्मणजे, मनांतले चालू दुःखकारक विचार नाहींतसे होऊन दुसरीकडे त्याचें मन लागावें; ह्मणून, पावसांत, उन्हांत, रात्रीस, दिवसास, नेहमीं त्यास घेऊन मीं फिरत असें. पण अतिशय प्रीति असल्यामुळें कांहीं पदार्थ पाहिला ह्मणजे आवडत्या माणसाची आठवण होते. दिवस, रात्र, एकांतस्थलाचा स्तब्धपणा, भरवस्तीचा कलकलाट, व सर्व वस्तूंचा विसर पाडणारा काल, यांतील कोणाच्यानेही कोमल अंतःकरणांतील प्रीतीचें स्मरण दूर करवत नाहीं. जशी होकायंत्राची लोहचुंबकास स्पर्श केलेली लोहशलाका, कोणीकडे फिरविली तरी पुनः ध्रुवाकडे वळते; त्याप्रमाणेंच प्रीतिपूर्ण कोमल अंतःकरणाची स्थिति आहे. वुइलियम पदेशाच्या मैदानांत फिरत असतां आह्मी कोठें जात आहों! ह्मणून मीं त्यास विचारलें. तेव्हां उत्तरेकडे

बोट दाखवून तो ह्मणाला, 'इलीकडे आपले डोंगर आहेत, चला आपण परत जाऊं.' "

"ह्याप्रमाणें त्याची खिन्नता मोडण्यास जितके उपाय केले तितके सर्व व्यर्थ झाले. वाद करून बुद्धीच्या योगानें कोट्या करून अडवून त्याच्या मनांतील वेड घालवावें; याशिवाय दुसरा मार्ग उरला नाहीं; असें पाहून मी त्यास ह्मणालों, 'होय तेथें डोंगर आहेत त्यांवर तुझी व्हर्जिनिया राहत होती. हें पहा त्वां तिला दिलेलें चित्र. मरेपर्यंत हें तिनें आपल्या हृदयाजवळ बाळगिलें होतें, जें हृदय शेवटपर्यंत तुझी काळजी करीत होतें.' असें ह्मणून नारळीच्या झाडाजवळच्या पाणोठ्याजवळ जें त्यानें व्हर्जिनिया हिला लहान चित्र दिलें होतें, तें चित्र मीं पाल यास दिलें. तें पाहिल्याबरोबर सखेदानंदानें त्याचे डोळे भरून आले. उत्सुकतेनें तें चित्र घेऊन त्यानें उराशीं घट्ट धरिलें. गहिंवरानें त्याचा ऊर धडधड उडूं लागला. डोळे रडून रडून शुष्क होऊन गेले होते, तरी अश्रूंनीं भरून आले. तेव्हां मी त्यास ह्मणालों: —

"मुला, जो तुझा व व्हर्जिनिया हिचा मित्र आहे, व जो मनोराज्यांत तुझें अंतःकरण गर्क झालें असतां, पुढें कांहीं अनर्थ झाल्यास सोशितां यावा ह्मणून तुझ्या अंतःकरणास धैर्य देत होता, त्याचे दोन शब्द ऐकशील तर बरें होईल. तुला इतका मोठा शोक कशाकरितां होतो? तूं मोठा हतभाग्य आहेस हें खरें; कारण जिनें तुझ्या सुखाकरितां आपलें सुख सोडून दिलें, संपूर्ण ऐश्वर्यसुखापेक्षां जी तुला अधिक मानीत होती; आणि तुझ्याशीं संयुक्त होणें हेंच काय तें आपल्या सद्गुणांचें फळ, असें जिला वाटत होतें, अशी सुंदर

प्रियकर ललना आज तुझी व्हर्जिनियाशीं झाली, ही मोठीच हानि होय. तथापि ह्या वस्तुस तूं केवळ शुद्ध सुखाचें साधन असें मानीत होतास तीच मोठ्या भयंकर दुःखास कारण झाली नसती कशावरून! ऐश्वर्याच्या आशेनें जाऊन ती निराश होऊन जशीची तशीच परत आली होती. पुढें जें तिजबरोबर तुला सुख भोगावयाचें होतें तें केवळ तिच्या बरोबर श्रम करणें याशिवाय कांहीं नव्हतें. ती आधींच नाजूक, त्यांत हाल होऊन अशक्त झालेली, आणि तुझे श्रम कमी करण्याकरितां अधिक मेहनत करती. असें झालें असतें ह्मणजे दररोज क्षीण होत चालली आहे, असें नेहमीं तुझ्या दृष्टीस पडलें असतें. तुजपासून तिला मुलें झालीं असतीं तरी मोठी पंचाईत. वडिलांचें आणि मुलांचें पालन करण्याच्या काळजींत तुह्मी दोघेंही पडलां असतां. तूं ह्मणशील कीं, सुख होण्यास संपत्ति कशास पाहिजे? स्त्री जितकी जितकी निराश्रित असेल तितकी तितकी अधिकच प्रीति करिते, व अशा प्रियकर मनुष्याचें संरक्षण केल्यापासून आपणांसही अतिशय सुख होतें. व दोघेंही दुःखी असल्यामुळें एकमेकांस अधिकच आवडलों असतों. तारुण्यामुळें एकमेकांस धैर्य देण्यास अधिक समर्थ झालों असतों. गोष्ट खरी आहे. स्त्रीपुरुष सद्गुणी असून एकमेकांवर परम प्रीति करणारीं असलीं ह्मणजे, कोणतेंही दुःख प्राप्त झालें तरी त्यांस एकमेकांपासून सुख होत असतेंच. परंतु, व्हर्जिनिया तर आतां नाहींच. तुझ्या खालोखाल ज्यांवर तिची प्रीति असे तीं माणसें, तिची आई, आणि तुझी, ह्या उरल्या आहेत. त्या तुझ्या अनिवार्य दुःखानें मृत्युपंथास लागल्या आहेत. त्यांस सुख देणें यांतच ती सुख मानीत आहे, असेंच तूं मान." तुला

इतकें व्हर्जिनिया विषयीं काय वाईट वाटतें? ती अजून आहे. तुला खचित सांगतें कीं, सद्गुणाचें फळ जेथें प्राप्त होतें, असें स्थळ आहे. गलबतावरून जशी तुला तिनें सलाम केला, त्याप्रमाणें स्वर्गांतून तिला बोलतां येतें तर ती ह्मणाली असती; "पाल, अरे, आयुष्य हें क्षणभंगुर आहे. एवढ्यांतच ईश्वर आपली परीक्षा करितो. मी सृष्टिनियमाप्रमाणें प्रीतीनें आणि सद्गुणानें वागलें. आपलें कर्त्तव्य कर्म योग्य रीतीनें बजाविलें, असें पाहून, स्वतः दुःख भोगणें अथवा दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी होणें, या सर्व यातनेपासून सोडवून मला ईश्वरानें एथें आणिलें. आतां मला मानवी दुःखाचा वारा सुद्धां लागणार नाहीं. असें असून तूं मजकरितां हळहळतोस! मी आतां पवित्र, अक्षय, ज्ञानप्रकाशित झालें. आणि तूं मला संसारांधकारांतून हाका मारतोस! प्रिय मित्रा, स्मरण कर; सकाळच्या प्रहरीं उठून आनंददायक सृष्टीचे चमत्कार पाहिले ह्मणजे आह्मांस किती मौज वाटत असे! प्रकाशित झालेलीं पर्वतांचीं शिखरें, व अरण्यांत झाडांवर प्रसृत झालेले सूर्यकिरण पाहिले ह्मणजे आह्मास किती संतोष होई! प्रातःकाळचें चकचकीत उन्ह, वनस्पतींचे सुवास, व पक्ष्यांचे गुंजारव यांच्या योगानें आपण किती रममाण होत असूं! भूलोकीं आनंदकारक सौंदर्याचा उपभोग अशक्त इंद्रियांच्या योगानें आपण घेत होतों. मी आतां अंतर्ज्ञानी होऊन, या सौंदर्याच्या प्रभवस्थानांपासून, शब्दस्पर्शरूपरसगंधांचें सुख अनुभवित आहें. ज्या अक्षय, अनंत, आनंदमय समुद्राच्या तीरीं मी रहात आहें, तेथील सुख शब्दांनीं काय वर्णावें! समानशील, समानसुखी, अशा असंख्यात प्राण्यांच्या मित्रत्वापासून जें सुख होतें तें, मला येथें प्राप्त होत आहे. विशेष काय

पण, अमानुषऔदार्ययुक्त अनंतशक्ति परमेश्वर जेथें दाता आहे; तेथें कोणत्या गोष्टीची उणीव असणार आहे? येथें आह्मी दुःखानें अस्पृष्ट असें केवळ शुद्ध सुख भोगितों. याकरितां तूंही या परीक्षेच्या वेळीं धैर्यानें वागून अशा सुखास योग्य आहेस, असें परमेश्वरास दाखीव, ह्मणजे आपण पुनः संयुक्त होऊं. मग आपली प्रीति अक्षय्य होईल. मग तुझी व्हर्जिनिया, हिचें सुख अतिशयित वृद्धिंगत होईल आणि आपण विवाहोत्साहाच्या आनंदांत सतत निमग्न असूं. येथें मी तुझे डोळे पुसून सांत्वन करीन. हे प्रियमित्रा, प्राणनाथा, अक्षय सुखाकडे लक्ष दे; आणि क्षणिक दुःखाचें धैर्यानें सहन कर."

"असें बोलतां बोलतांच गहिंवरानें कंठ दाटून माझें बोलणें बंद झालें. पाल एकसारखा मजकडे पहात होता; तो ह्मणाला, 'ती आतां नाहीं, ती आतां नाहीं.' असें बोलून मूर्छित होऊन मोठ्यानें बराच वेळ शोक करीत होता. शुद्धीवर आल्यानंतर ह्मणाला, 'ज्या अर्थी मृत्यु चांगला आहे, आणि व्हर्जिनिया सुखी आहे तर मीही मरेन आणि तिच्याशीं संयुक्त होईन.' याप्रमाणें सांत्वन करण्याचा माझा उद्देश त्याची निराशा वाढविण्यास कारण झाला. एखादा मनुष्य आपला मित्र पुरांत वहात चालला आहे असें पाहून, त्यास तारण्यास जातो; पण तो मुळींच हातपाय हालवित नाहीं. त्याप्रमाणें माझी अवस्था झाली. त्याचें अंतःकरण दुःखानें ग्रासून टाकिलें होतें. लहानपणीं हाल झालेले असले ह्मणजे, मोठेपणीं मनुष्य संसारांतील दुःखें सहज सोशितो. परंतु पाल यास पूर्वीं, दुःख कसें असतें हे माहीत देखील नव्हतें."

"मी त्यास घेऊन त्याच्या घरीं परत गेलों. तेथें जाऊन पाहतों तों, त्याची आई आणि लातूरबाई हीं फारच क्षीण झाल्या होत्या. मार्गारेट अगदींच भुईस खिळून मरणोन्मुख झाली होती. अशीं उल्हासी माणसें लहानसान दुःखांस भोजीत नाहींत; परंतु, मोठ्या अनर्थापुढें तीं क्षणमात्र टिकत नाहींत."

"मार्गारेट मला ह्मणाली, 'मित्रा, व्हर्जिनिया पांढरें शुभ्र वस्त्र नेसलेली स्वर्गेतील सुंदर लतामंडपांत माझ्या दृष्टीस पडली. ती ह्मणाली—मी पूर्ण सुख अनुभवित आहें—नंतर हंसत हंसत पाल याजवळ जाऊन त्यास घेऊन गेली. मुलास जाऊं न देण्याविषयीं मी ओढाताण करीत होतें, तों मला वाटलें भूलोक सोडून मोठ्या आनंदानें त्यांच्या मागून मी जात आहें. मी आपल्या मैत्रिणीस येतें हो म्हणणार इतक्यांत तीही जलदीनें डोमिंगो व मेरी यांस घेऊन माझ्या मागून येण्यास निघाली. पण मोठी चमत्कारिक गोष्ट ही कीं, लातूरबाईला देखील त्याच रात्रीस असें हुबेहुब स्वप्न पडलें.'"

"मीं सांगितलें, बाई परमेश्वराच्या सत्तेशिवाय या जगांत कांहीं घडत नाहीं. स्वप्नें देखील कधीं कधीं खरीं होतात."

"नंतर लातूरबाईनें मला आपलें स्वप्न सांगितलें, तें अगदीं वर सांगितल्याप्रमाणेंच होतें. त्या उगाच शकून-भोळ्या नव्हत्या, हें मला माहीत होतें. त्यांच्या स्वप्नांचें चमत्कारिक सादृश्य पाहून माझा निश्चय झाला कीं, हीं लौकर खरीं होणार. मला वाटलें होतें त्याप्रमाणें घडून आलें. व्हर्जिनिया हिच्या मरणानंतर दोन महिन्यांनीं

पालयास देशाग झाली. मूरेपर्यंत एकसारखी त्यानें तिच्या नांवाची टकळी घेतली होती. पुत्राच्या मरणानंतर आठ दिवसांनीं मार्गारेट हिलाही वाटलें कीं, आपला प्राणोत्क्रमण-काल जवळ आला; तेव्हां ती लातूरबाईस ह्मणाली; 'मी जातें, आपण लौकरच एकत्र होऊन परस्परांच्या अक्षय्य समागमसुखांत राहूं. मृत्यु ही फार चांगली वस्तु आहे. आपण त्याची इच्छा करावी. जन्मास येणें ही शिक्षा असेल तर ती लवकर संपली ह्मणून आपण आनंद मानावा. संसार ही जर परीक्षा असली तर ती लौकर संपली, ह्मणून आपण उपकार मानले पाहिजेत.' "

"डोमिंगो व मेरी हीं अगदीं थकलीं होतीं. त्यांच्यानें आतां कांहीं काम करवेना. त्यांस सुभेदारानें आपल्या घरीं नेलें. तीं आपल्या धनिणींच्या मागें फार दिवस वांचलीं नाहींत. धनी नाहींसा झाल्यापासून वांड्या कुत्राही झुरून झुरून मेला."

"लातूरबाईला, मी आपल्या घरीं घेऊन गेलों. ती मोठ्या धैर्यानें दुःख सहन करीत होती. आपलें दुःख एकीकडे ठेवून, पाल आणि मार्गारेट यांचें ती शेवटपर्यंत सांत्वन करीत होती. तीं नाहींतशीं झाल्यावर त्यांच्या ती फार आठवणा काढी. तिला वाटे आपली मैत्रीण जवळच आहे. ती एक महिनाभरच त्यांच्या मागें वांचली. जी इतक्या अनर्थास कारण झाली. त्या आपल्या मावशीची तिनें तिळमात्र निंदा केली नाहीं. उलटी, वृद्धापकाळीं आपल्या क्रूरपणाचा पश्चात्ताप होऊन तिला दुःख होईल, तें कमी व्हावें ह्मणून, ती परमेश्वराची प्रार्थना करी."

"यूरोपांतून पुष्कळ गलबतें आलीं. ऑवरोल लोकांपा

सून मी असें ऐकिलें कीं; आपल्या नातीच्या आणि भाचीच्या मरणानें त्या दुष्ट म्हातारीला मोठा पश्चात्ताप झाला; तिचें मन तिला खाऊं लागलें. बुद्धिभ्रंश होऊन ती विक्षिप्ताप्रमाणें वागूं लागली. शुद्धीवर असून तिला आपल्या आचरणाचें दुःख होत असे; तरी जवळच्या लोकांनीं हिला वेड लागलें असें ठरवून मालमत्ता सर्व आपल्या ताब्यांत घेऊन वेड्याप्रमाणें तिला कोंडून टाकिलें. शेवटीं निराश होऊन शोकानें ती मरण पावली."

"व्हर्जिनिया जेथें पुरली होती, त्याच झुडुपाखालीं तिच्या बाजूसच पाल यास पुरिलें. आणि त्याच पवित्र स्थलीं त्यांच्या कृपाळू आया व विश्वासू चाकर यांस पुरिलें. थडग्यांवर संगमरवरी दगड पुरून त्यांचे सद्गुण लिहून ठेविलेले नाहींत. परंतु आमच्या मनावर त्यांची आठवण अशा अक्षरांनीं लिहून ठेविली आहे कीं, वज्रलेपाप्रमाणें ती कधींही पुसून जाणार नाहीं. खरोखर जर त्यांच्या पवित्र आत्म्यांस पृथ्वीवर काय चाललें आहे तें पहावें असें वाटत असेल तर ते या उद्योगी सद्गुणी मनुष्यांच्या झोंपड्यांतून दुर्दैवी भिकाऱ्यांचें सांत्वन करण्यास, स्त्रीपुरुषांच्या मनांत प्रीति व विश्वास ठसविण्यास, आणि ईश्वर देईल त्यांत सुख मानणें, उद्योगाची आवड आणि ऐश्वर्याची भीति, हीं मनुष्यांच्या मनांत भरविण्यास, येथें फिरत असतील यांत संशय नाहीं."

"बहुशः मोठमोठ्या राजरजवाड्यांच्या मात्र नांवाची लोक प्रसिद्धि करितात. परंतु या बेटांतील कित्येक स्थलांस लोकांनीं नावें दिलीं आहेत, त्यांवरून व्हर्जिनिया हिचें नांव येथें अमर होईल. आंबरबेटाजवळ वाळूच्या उंचवट्यावर जेथें सेन्टजेरेन फुटलें त्या जागेस सेंटजेरेनचा मार्ग

असें नांव दिलें आहे. तेथूनच चार कोसांवर समुद्रांत लांब गेलेलें भूशिर आहे; त्यास प्रदक्षिणा घालून वादळाच्या अगोदरच्या रात्रीस सेंटजेरन यास जातां येईना, त्यास दुर्भाग्यभूशिर असें नांव दिलें आहे. येथून आमच्या समोरच उपसागर आहे. त्यानें आपल्या किनाऱ्यास ही सद्गुणी मुलगी अलंकार होती, असें समजूनच काय अंत्यसंस्कार करावे ह्मणून, माणसांस सांपडण्याकरितां तिचें प्रेत वाळूवर टाकून दिलें. त्यास थडग्याचा उपसागर असें ह्मणतात."

"हे विश्वासू स्त्रिपुरुषांनो! अहो दुर्दैवी आयानो! रे झोपडयांच्या कुटुंबा! ज्या झाडांच्या सावलीस तुह्मी बसत होतां, ज्या झऱ्यांचें पाणी पीत होतां, ज्या टेंकड्यांवर बसून विश्रांति घेत होतां, तीं सर्व अजून तुमच्या नाशाकरितां रडत आहेत. तेव्हांपासून या ओसाड जमिनीवर लागवड करण्यास किंवा या पडलेल्या झोंपड्या नीट करण्यास कोणी झटत नाहीं. तुमच्या शेळ्या रानटी झाल्या; तुमचे बगीचे मोडून गेले; तुमचे पक्षी उडून गेले; ससाणा किंवा चिमण्या यांशिवाय कोणाचाच शब्द खिंडींत ऐकूं येत नाहीं. आतां तुह्मी माझ्या दृष्टीस पडत नाहीं. मुलेंबाळें मरून मागें बापानें रहावें, अथवा ओसाड अरण्यांत वाटसरानें एकटें भटकत फिरावें, त्याप्रमाणें माझी अवस्था झाली आहे."

असें बोलून तो गरीब ह्मातारा रडत रडत चालता झाला. ही दुःखकारक कथा ऐकतांना माझ्याही नेत्रांतून अश्रुधारा वहात होत्या.

समाप्त.